म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0000650

# GEOGRAPHY

## PART II.

( *For Standard V.* )


**RAMCHA** **.HALE, B. A.**

Teacher, Men, Poona.



REFBK-0000650


*Publ* *ra & Co.*

Poona City.

# भूवर्णन

## भाग २

**( मराठी पांचव्या इयत्तेकरितां )**

लेखक


**रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.**

शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.



**प्रकाशक—जी. रामचंद्र आणि कंपनी,**

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स, बुधवार पेठ पुणें.

**आवृत्ति पहिली.**

सन १९१०



६५०


*Price 4 Annas.* **किंमत ४ आणे.**

*Printed by K. R. Gondhalekar at his Jagadhitechu Press, Poona City.*

**मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर,**

'जगद्धितेच्छु' छापखाना, पुणें.

*All rights reserved by the Author.*

( पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

सुधारलेल्या इयत्तापत्रकाप्रमाणें मराठी पांचव्या इयत्तेस "हिंदु स्तानच्या भूपृष्ठासंबंधाची व राजकीय आणि औद्योगिक भूगोलासंबंधाची विशेष माहिती, आणि आशिया खंडाची सामान्य माहिती" हा भूगोलविषयाचा भाग आहे. तो शिकविण्यास उपयोगीं पडावें म्हणून भूवर्णन—भाग २ हें पुस्तक लिहिलें आहे. पांचव्या इयत्तेंत आशिया खंडाची सामान्य माहिती द्यावी म्हणून इयत्तेच्या अभ्यासपत्रकांत म्हटलें आहे; परंतु या खंडांतील देशांची विशेष माहिती पुढील इयत्तांच्या अभ्यासांत कोठेंच घातली नाहीं. म्हणून तो भाग वगळला जाऊं नये, यास्तव ही माहिती प्रस्तुत पुस्तकामध्यें थोडक्यांत दिली आहे.

प्रचलित भूवर्णनविषयक पुस्तकांपेक्षां या पुस्तकांत ज्या विशेष गोष्टी आहेत, त्या येणेंप्रमाणें:—( १ ) प्रदेशाची स्वाभाविक रचना, हवा, पिकें, उद्योगधंदे, व्यापार, लोकस्थिति इत्यादिकांसंबंधानें माहिती होतां होईतों सकारण ( कारणकार्यरूपानें ) दिली आहे; ( २ ) शक्य होतें तेथें मनोरंजक माहिती घातली आहे; ( ३ ) तुलनात्मक पद्धतीचा उपयोग ठिकठिकाणीं केला आहे; व ( ४ ) भूवर्णनात्मक माहिती नकाशाच्या साहाय्यानें मिळविण्याची संवय मुलांस लागावी अशी तजवीज केली आहे.

प्रस्तुत पुस्तक तयार करण्याचे कामीं मेसर्स मॅकिंडर्, किशोम्, मिल्, मीकलजॉन्, स्मिथ्, ब्लॅनफर्ड, आर्डन वुड्, कॅमेरॉन् मॉरिसन् वगैरे इंग्लिश ग्रंथकारांचे ग्रंथ, सरकारी रिपोर्ट व पुस्तकें, आणि व्यापारी भूगोल, कृषिकर्मविद्या, रा० ब० पटवर्धनकृत भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें वगैरे मराठी ग्रंथ यांचा फार उपयोग झाला आहे; शिवाय कांहीं विद्वान् व सन्मान्य गृहस्थ आणि स्नेही त्यांचेंही त्या कामीं पुष्कळ साहाय्य झालें आहे. म्हणून या सर्वांचा प्रस्तुत ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

**पुणें,**
१ आगष्ट १९१०.

**ग्रंथकर्ता.**

# अनुक्रमणिका.


प्रकरण १—हिंदुस्तान ( सामान्य वर्णन )..............१–४७
सीमा, क्षेत्रफळ...इ०..............................१
किनारा, आखातें, बेटें...इ०......................३
उंचसखल प्रदेश व स्वाभाविक विभाग..............६
पर्वत..................................................७
नद्या.................................................११
हवामान व पाऊस ....................................१९
सुपीकपणा............................................२३
पिकें व झाडें.........................................२४
प्राणी..................................................२७
खनिज संपत्ति.........................................२८
उद्योगधंदे, कारखाने वगैरे.............................३०
दळणवळणाचीं साधनें.................................३६
व्यापार................................................३८
लोकवस्ती ............................................४१
भाषा ..................................................४२
शिक्षण ................................................४३
राजकीय विभाग........................................४४
राज्यव्यवस्था...........................................४५
प्रकरण २—हिंदुस्तानच्या विभागांचें विशेष वर्णन......४८–७४
१ पंजाब................................................४८
२ वायव्य सरहद्दीवरील प्रांत...........................५०
३ संयुक्त प्रांत...........................................५०
४ बंगाल प्रांत...........................................५३
५ पूर्व बंगाल व आसाम प्रांत...........................५६
६ मध्यप्रांत..............................................५८

७ मुंबई इलाखा ........................................ ६०
८ मद्रास इलाखा ........................................ ६३
९ कूर्ग प्रांत ........................................ ६५
१० अजमीर—मेरवाडा प्रांत ........................................ ६६
हिंदुस्तान सरकारचे ताब्यांतील संस्थानें ........................................ ६६—७३
१ काश्मीर ........................................ ६६
२ राजपुताना एजन्सी ........................................ ६७
३ सेंट्रल इंडिया ( मध्य हिंदुस्तान ) एजन्सी ........................................ ६९
४ बडोदें ........................................ ७०
५ हैदराबाद ........................................ ७१
६ म्हैसूर ........................................ ७२
स्वतंत्र संस्थानें ........................................ ७३—७४
१ नेपाळ ........................................ ७३
२ भूतान ........................................ ७४
प्रकरण ३—आशियाखंडाचें सामान्य वर्णन ........................................ ७४
आशिया खंडांतील देशांचें सामान्य वर्णन ........................................ ८८
परिशिष्ट अ ........................................ ९४
परिशिष्ट ब ........................................ ९७
शुद्धिपत्र ........................................ शेवटीं.

# प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करणारांस सूचना.

१ प्रस्तुत पुस्तकांतील मजकुराचे जे तीन प्रकार आहेत ते व त्यांचा उद्देश खालीं दिल्याप्रमाणें आहे—

(१) मोठ्या टाइपांतील मजकूर. हा मुख्यतः विद्यार्थ्यांसाठीं आहे. यांतील बहुतेक माहिती मुलांना आवश्यक आहे. †

(२) चौकोनी कंसांत दिलेला मोठ्या टाइपांतील मजकूर: हा कधीं स्पष्टीकरणार्थ, तर कधीं अवान्तर माहिती देण्याकरितां घातलेला आहे. हा विद्यार्थ्यांनीं वाचावा, पण तो मुद्दाम लक्षांत ठेवण्याचें कारण नाहीं.

---

† तथापि या मजकुरासंबंधानें हें लक्षांत ठेवावें कीं, यांतील जो भाग वर्णनात्मक किंवा विस्तारात्मक आहे, तो मुलांनीं सविस्तरपणें किंवा शब्दशः लक्षांत ठेवण्याचें कारण नाहीं. कोणत्याही सामान्याचीं उदाहरणें डोळ्यापुढें आलीं, म्हणजे तें सामान्य चांगलें लक्षांत राहातें असा नियम आहे. या नियमास अनुसरून पर्वत, नदी, शहर वगैरे-संबंधाच्या ठळक गोष्टी मनावर ठसाव्या म्हणून त्यांसंबंधाचा विस्तार किंवा वर्णन प्रस्तुत पुस्तकांत दिलें आहे. अर्थात् अशा गोष्टी मनावर ठसल्या म्हणजे ह्या वर्णनाचें काम झालें. मग ह्यांतील माहितीच्या कांहीं भागाचें विस्मरण झालें तरी हरकत नाहीं. उदाहरणार्थ, हिमालय पर्वत, गंगा नदी, मुंबई, विजापूर, दिल्ली वगैरे शहरें यांच्या-पैकीं प्रत्येकासंबंधानें वर्णनपर असा १०।५ ओळींचा मजकूर प्रस्तुत पुस्तकांत आहे. यांतील माहिती हिमालयाची उपयुक्तता, गंगेची उपयुक्तता, कारखाने, व्यापार, संपत्ति या बाबतींत मुंबईचा अप्रतिम मोठेपणा, विजापूर व दिल्ली एथील इमारतींची भव्यता हीं सामान्यें किंवा ह्या ठोकळ गोष्टी मनावर ठसाव्या म्हणून दिली आहे. ही माहिती वाचून ह्या गोष्टी मुलांस चांगल्या समजल्या व त्या सांगतां आल्या म्हणजे ही माहिती वाचल्याचें सार्थक झालें. मग ह्यासंबंधानें पुस्तकांत जो विस्तार केला आहे (उदाहरणार्थ, मुंबईस अमुक गिरण्या आहेत...

पुढें चालू.

(३) बारीक टाइपांतील मजकूर. ह्यांतील बहुतेक माहिती शिक्षकांसाठीं आहे. ती शिक्षकांनीं वाचून तिचा योग्य तो उपयोग करावा. ह्यांतील जो भाग मुलांना समजण्यासारखा व मनोरंजक असेल तो शिक्षकानें मुलांना वाचून दाखवावा किंवा तोंडीं सांगावा. ह्या भागापैकीं जी माहिती अत्यावश्यक स्पष्टीकरणाच्या रूपाची असेल तिच्या शिवाय इतर कोणतीही माहिती विद्यार्थ्यांनीं मुद्दाम लक्षांत ठेवण्याची आवश्यकता नाहीं.

२ जी माहिती प्रथमतः नकाशावरून मिळविणें इष्ट आहे, त्या माहितीच्या हेडिंगचे पुढें * अशी फुली घातली आहे. अशी माहिती नकाशावरूनच मिळविण्याची संवय मुलांस लावावी.

---

मागील पृष्ठावरून

दिल्लींतील अमुक इमारती पाहाण्यालायक आहेत... अमुक इमारतीची उंची अमुक आहे... वगैरे) त्यांतील कांहीं गोष्टींचें विस्मरण झालें तरी बिघडत नाहीं. कारण, त्या पूर्णत्वानें लक्षांत ठेवण्याइतकें त्यांचें महत्त्व नाहीं. म्हणून अशा प्रकारच्या माहितींतील ५ गोष्टींपैकीं २-३ गोष्टी मुलांनीं साधारणपणें बरोबर सांगितल्या तरी त्यांचीं उत्तरें पूर्ण समजावीं. यावरून हें उघड होईल कीं, अशा प्रकारची माहिती मुलांना शब्दशः पाठ करण्यास लावण्याचें कारण नाहीं, व त्यांनीं ती तशी सांगावी अशी अपेक्षाही करूं नये. याचें उलट वर्तन घडल्यास घोकंपट्टी वाढून मुलांना विनाकारण फाजील श्रम पडतील.

मुलांना जे प्रश्न विचारावयाचे त्यांसंबंधानें पुढील गोष्टही लक्षांत ठेवावी. ज्यांचा अत्यंत निकट संबंध नाहीं अशा भूवर्णनविषयक नांवांच्या मालिका मुलांनीं लक्षांत ठेवण्याचें कारण नाहीं. तीं नांवें कोणांची आहेत, किंवा तीं नांवें ज्यांचीं आहेत त्या वस्तूंचें स्वरूप काय आहे, हें माहीत असलें म्हणजे झालें. म्हणून ज्या प्रश्नाचें उत्तर नाममालिकेच्या रूपानें द्यावें लागतें असे प्रश्न होतां होईतों विचारूं नये. 'पंजाबमधील सर्व शहरांचीं नांवें सांगा.' 'आशिया खंडांतील सर्व बेटें सांगा'... ...वगैरे प्रश्न वरील प्रकारचे होत. मुलतान हें शहर पंजाबांत आहे, हाँगकाँग हें बेट

पुढें चालू

३ या पुस्तकांतील बहुतेक यादी ( उदाहरणार्थ, विभागांचीं नांवें वगैरे ) व बहुतेक आंकडे ( क्षेत्रफळ, लांबी, लोकसंख्या वगैरेसंबंधाचे ) केवळ **तुलनेकरितां** व वाचकांची स्वाभाविक जिज्ञासा तृप्त करण्याकरितां दिले आहेत. ही माहिती मुलांकडून पाठ करवून घ्यावी असा ग्रंथकर्त्यांचा मुळींच हेतु नाहीं.

४ प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें पूर्वी प्रसिद्ध केलेल्या भूवर्णन–भाग १ या पुस्तकांत निराळ्या १–२४ पानांत दिलेल्या माहितीचा योग्य उपयोग प्रस्तुत पुस्तकांतील विषय शिकवितांनाही शिक्षकांनीं करावा. विशेषतः ' शिक्षकांस सूचना ' हा भाग चांगला लक्षांत ठेवावा.

---

मागील पृष्ठावरून

आशियांत आहे, हें एकाद्या मुलास माहीत असूनही वरील यादी देतांना त्यास ह्यांचें कदाचित् स्मरण होणार नाहीं. म्हणून या प्रश्नांऐवजीं ' पुढील बेटें कोठें आहेत,' ' पुढील शहरांसंबंधानें ठळक गोष्टी काय आहेत ' असे प्रश्न विचारणें योग्य होईल. पिकें, आयात-निर्यात माल यासंबंधाच्याही पुस्तकांतील संपूर्ण यादी मुलांना विचारूं नये. त्याऐवजीं ' पुढील जिनसांपैकीं कोणते जिन्नस हिंदुस्तानच्या आयात व निर्यात मालांत आहेत हें सांगा ' अशा प्रकारचे प्रश्न विचारावे. तथापि अशा यादींतील चार पांच **ठळक वस्तूंचीं** नांवें विचारणें गैर होणार नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे विनाकारण घोकंपट्टी न वाढूं देण्यास, पुस्तकांतील वर्णनात्मक किंवा विस्तारात्मक माहितीपैकीं किरकोळ गोष्टींसंबंधाचे, किंवा ज्यांचीं उत्तरें नाममालिकेच्या स्वरूपानें द्यावीं लागतील अशा प्रकारचे प्रश्न विचारतां कामा नये. भूगोल शिक्षणाचा खरा हेतु साध्य होण्यास, ' पुढील शहरांसंबंधानें ठळक गोष्टी सांगा ' अशा प्रकारचे स्थूल प्रश्न किंवा ' पंजाबपेक्षां बंगालमध्यें पाऊस जास्त कां पडतो ' अशा प्रकारचे कारणकार्यासंबंधाचे प्रश्न विचारणेंच जरूर आहे.


हिंदुस्तानचा नकाशा.
सीमा, पर्वत, नद्या वगैरे दाखविणारा.
स्केल
पूर्व तुर्कस्तान
अथवा पूर्व तार्तरी
तिबेट
अफगाणिस्तान
बलुचिस्तान
हिंदु कुश पर्वत
हिमालय प.
अटक
मिथनकोट
सक्कर
सांबर स.
लुनी न.
अरवली पर्वत
चंबळा न.
गोमती नदी
घोगरा नदी
ब्रम्हपुत्रा नदी
कैलास पर्वत
मानससरोवर
कच्छचें आखात
अहमदाबाद
मही नदी
नर्मदा न.
सातपुडा पर्वत
अमरकंटक डोंगर
कैमूर पर्वत
शोण नद
सुरत
महा नदी
पालमिरस भू.
राजमहेंद्री
कोलेर
मच्छलीपट्टण
पुलिकत स.
पेन्नार
दोडाबेटा
कोचीन
सिलोन
माल दीव बेटें
लख दीव बेटें
अंदमान बेटें
निकोबार बेटें
बंगालचा उपसागर


हिंदुस्तानांतील भिन्नप्रदेशाची उंची दारवविणारा
नकाशा.
०-६०० फुटांपर्यंत उंचीचा प्रदेश.
६००-१५०० फुटांपर्यंत उंचीचा प्रदे.
१५००-३००० फुटांपर्यंत उंचीचा प्रदे.
३०००-६००० फुटांपर्यंत उंचीचा प्रदे.
६००० फुटांपेक्षां जास्त उंचीचा प्रदेश
स्केल.


हिंदुस्तानच्या भिन्नभागांतील पावसाचें मान दाख
नकाशा.
जेथें १० इंचाचें आंत पाऊस पडतो असा प्रदे.
जेथें १०-२० इं० पाऊस पडतो असा प्रदेश.
जेथें २०-४० इं० पाऊस पडतो असा प्रदेश.
जेथें ४०-६० इं० पाऊस पडतो असा प्रदेश.
स्केल.

# हिंदुस्तानांतील
## पिकें, झाडें, प्राणी खनिज संपत्ति
## वगैरे दाखविणारा
# नकाशा.



# भूवर्णन-भाग २ रा.

## हिंदुस्तान.

स.क्र.५. ३८

### प्रकरण १ लें.

### (सामान्य वर्णन.)

अक्षांश ३६ ते ८; रेखांश ६७ ते ९७.

आशिया खंडाच्या दक्षिणेस जीं तीन द्वीपकल्पें दिसतात, त्यांतील मधलें द्वीपकल्प हिंदुस्तान * होय. आशिया खंडांतील मोठ्या देशांमध्यें हिंदुस्तान अतिशय दक्षिणेकडील देश होय.

* हिंदु याचा (फारशी भाषेंतील) अर्थ काळा, व स्तान (स्थान या संस्कृत शब्दाचें फारशी भाषेंतील रूप)=देश. हिंदुस्तान=काळ्या लोकांचा देश. इराणी लोकांचे मानानें हिंदू लोक काळे आहेत म्हणून या देशास हिंदुस्तान हें नांव त्यांनीं दिलें. अरबस्तान, बलुचिस्तान, अफगाणिस्तान वगैरे नांवें अशींच पडलीं आहेत.

पूर्व, पश्चिम व दक्षिण या तिन्ही दिशांनीं हिंदुस्तानास पाण्याचा (समुद्राचा) वेढा असल्यामुळें हिंदुस्तानास द्वीपकल्प असें म्हणतात.

**सीमा***—उत्तरेस हिंदुकुश, काराकोरम व हिमालय हे पर्वत असून त्यांचे पलीकडे पूर्व तुर्कस्तान व तिबेट हे देश आहेत; पूर्वेस आराकान व ब्रह्मदेशांतील इतर डोंगर (त्यांचे पलीकडे ब्रह्मदेश) व बंगालचा उपसागर; दक्षिणेस हिंदीमहासागर; पश्चिमेस अरबी समुद्र व हाला आणि सुलैमान पर्वत असून या पर्वतांचे पलीकडे अनुक्रमें बलुचिस्तान व अफगाणिस्तान हे देश आहेत.

हिंदुस्तानच्या सीमांचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हटलें म्हणजे हिंदुस्तानच्या एका आंगास अतिशय उंच व दुर्भेद्य अशा पर्वतांचा वेढा असून दुसऱ्या आंगास समुद्राचा वेढा आहे. अशा सीमा पृथ्वीवरील फारच थोड्या देशांस आहेत.

जींतून मोठ्या सैन्यास सहज जातां येईल अशी एकही खिंड हिमालय पर्वतास नाहीं. पूर्वेकडील प्रदेश अतिशय डोंगराळ असल्यामुळें त्यांतूनही सैन्य यावयास चांगलासा मार्ग नाहीं. हाला व सुलैमान पर्वतांस कांहीं खिंडी आहेत. त्यांपैकीं खैबर खिंड प्रसिद्ध आहे. हिंदुस्तानावर स्वारी करणारे बहुतेक लोक याच मार्गानें हिंदुस्तानांत आले.

हिंदुस्तानच्या सीमा अशा प्रकारच्या असल्यामुळें कोणत्याही परराष्ट्रास हिंदुस्तानावर सहज स्वारी करितां येत नाहीं. कारण, एकीकडे पर्वतांचा अभेद्य तट आहे व दुसरीकडे हिंदीमहासागररूपी प्रचंड खंदक आहे.

**इतर देशांच्या सीमांशीं तुलना**—हिंदुस्तानच्या सीमासंबंधानें ही विशेष गोष्ट आहे कीं, त्या सर्व स्वाभाविक आहेत. मुंबई इलाख्याच्या सर्व सीमा अशा नाहींत. ज्यांच्या सर्व सीमा स्वाभाविक आहेत असे फारच थोडे जिल्हे मुंबई इलाख्यांत आहेत.

**आकार***—हिंदुस्तानाचा आकार साधारणपणें पतंगासारखा आहे. सिलोन बेट या पतंगाचे गोंड्याप्रमाणें दिसतें.

हिंदुस्तानचा आकार त्रिकोणाप्रमाणें आहे असें म्हटलें असतांही चालेल. या त्रिकोणाचा पाया हिमालय पर्वत होय, व हिंदुस्तानचें दक्षिणेकडील टोंक या त्रिकोणाचा शिरोबिंदु होय. या त्रिकोणाची प्रत्येक बाजू सुमारें १९०० मैल लांब आहे.

**लांबी, रुंदी वगैरे***—हिंदुस्तानची जास्तींत जास्ती दक्षिणोत्तर लांबी २ हजार मैल आहे, व रुंदी १९०० मैल आहे.

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**—हिंदुस्तानचें क्षेत्रफळ सुमारें १४ लक्ष चौरस मैल आहे, व लोकसंख्या २८ कोट आहे. पैकीं सहा लक्ष तेहतीस हजार चौरस मैल मुलूख व सहा कोट लोकसंख्या एतद्देशीय संस्थानिकांचे ताब्यांत आहे. मुंबई इलाख्याच्या सुमारें आठपट हिंदुस्तानचें क्षेत्रफळ आहे.

**बाह्यरेषा***—हिंदुस्तानचें अत्यंत पश्चिमेकडील टोंक जें मांझ भूशिर त्यापासून आपण हिंदुस्तानच्या सरहद्दीनें उत्तरेकडे जाऊं लागलों, तर सरहद्दीची रेषा नागमोडीप्रमाणें वळणें घेत क्रमानें आंत व बाहेर जाते

असें आढळून येईल. ५।६ वळणें घेऊन ही रेषा हिंदुस्तानच्या उत्तर टोंकाजवळ गेल्यावर बहिर्गोल होते; व तेथें काश्मिरास वळसा घालून हिमालयाचे बाजूनें अंतर्गोल होऊन पूर्वेकडे जाते. हिमालय संपल्यावर आसामचे ईशान्येकडील टोंकास वळसा घालून ही रेषा फिरून अंतर्गोल होते; व मणिपूर संस्थानाजवळ बाहेरील बाजूनें वळण घेऊन किनाऱ्यास येऊन मिळते.

या रेषेनें आपण किनाऱ्यास येऊन पोहोंचलों असतां जी किनाऱ्याची रेषा लागते, ती प्रथम सुंदरबनाचे ( गंगानदीच्या अनेक मुखांमधील प्रदेशाचे ) कांठानें पश्चिमेकडे जाते; व हुगळी–( गंगेचा अगदीं पश्चिमेकडील फाटा ) जवळ नैर्ऋत्येकडे वळते. पुढें कृष्णा नदीच्या मुखाजवळ ही रेषा दक्षिणेकडे वळून थेट कॅलिमियर भूशिरापर्यंत जाते. तेथून आंतील बाजूनें दोन वळणें घेऊन ही रेषा नैर्ऋत्येकडे कामोरिन भूशिरापर्यंत जाते. हें भूशिर हिंदुस्तानचें अत्यंत दक्षिणेकडील टोंक होय. एथून किनाऱ्याची रेषा उत्तर दिशेनें बरीच लांबपर्यंत जाते. खंबायतचे आखातापर्यंत ही रेषा गेल्यावर प्रथम काठेवाडास व नंतर कच्छास वळसा घालून वायव्येकडे वळते व त्याच दिशेनें मॉझ भूशिरापर्यंत जाते.

जमिनीकडील ( वायव्य, उत्तर व ईशान्य या दिशांकडील ) हिंदुस्तानची सरहद्द एकंदर ५ हजार मैल आहे, व किनाऱ्याची एकंदर ( सर्व वळणें धरून ) लांबी ८ हजार मैल आहे.

**पूर्व किनारा व पश्चिम किनारा यांच्या बाह्यरेषांची तुलना**:–हिंदुस्तानचा पूर्व किनारा व पश्चिम किनारा यांच्या बाह्यरेषांसंबंधानें हा फरक दिसतो कीं, पश्चिम किनाऱ्याची बाह्यरेषा पुष्कळ भागीं बाह्यवक्र आहे, व पूर्व किनाऱ्याची बाह्यरेषा पुष्कळ भागीं अंतर्वक्र आहे. पहिल्या रेषेपेक्षां दुसऱ्या रेषेचीं वळणें अधिक मोठीं आहेत.

हिंदुस्तानचें दक्षिण टोंक बरोबर मध्यभागीं नसून थोडें पश्चिमेचे बाजूस आहे.

हिंदुस्तानच्या दक्षिणभागच्या पश्चिम किनाऱ्यास **मलबार किनारा** व पूर्व किनाऱ्यास **कारोमांडेल किनारा** म्हणतात.

**किनाऱ्याचें स्वरूप**:–हिंदुस्तानच्या किनाऱ्यास असाव्या तित-

ऱ्या खांडी नाहींत. यामुळें हिंदुस्तानच्या किनाऱ्यावर फारशीं बंदरें नाहींत.

नद्यांचीं मुखें बंदरांप्रमाणें उपयोगी पडतात, असा सामान्य नियम आहे. परंतु हिंदुस्तानांतील बहुतेक नद्यांचे प्रवाह मुखाजवळ संथ नाहींत. यामुळें त्यांतून जहाजांस जातां येत नाहीं. शिवाय या नद्यांचे प्रवाहाबरोबर पुष्कळ गाळ वाहून येऊन तो मुखाजवळ समुद्रांत सांठून राहतो. ह्या कारणामुळें तेथें चांगलीं बंदरें नाहींत.

**हिंदुस्तानच्या किनाऱ्याचे दोष**—( १ ) खांडी, आखातें वगैरे कमी आहेत. ( २ ) आसपास बेटें कमी आहेत. ( ३ ) किनाऱ्याजवळ पाणी उथळ आहे. यामुळें जहाजें किनाऱ्याजवळ येऊं शकत नाहींत. मोठें जहाज येण्याजोगें एकही आखात या किनाऱ्यास नाहीं. ( ४ ) समुद्रावरून नैर्ऋत्येकडील मान्सून वारे वाहातात, त्या वेळीं पाण्याच्या ईशान्यवाही अथवा उत्तरवाही प्रवाहामुळें किनाऱ्याजवळ वाळू सांचून पाण्याचा उथळपणा वाढत जातो. ( ५ ) गंगेचीं व इतर बऱ्याच नद्यांचीं मुखें गाळ सांचून उथळ होत जातात.

या सर्व कारणांमुळें हिंदुस्तानच्या किनाऱ्याचा उपयोग जहाजांना फारसा होत नाहीं.

**पश्चिम किनाऱ्याचा श्रेष्ठपणा**—हिंदुस्तानच्या पूर्व किनाऱ्यापेक्षां पश्चिम किनाऱ्यास खांडी अधिक असल्यामुळें या किनाऱ्याला बंदरें अधिक आहेत. पूर्व किनाऱ्यावरील कलकत्ता बंदराचा व्यापारास उपयोग होतो खरा; पण तें बंदर बरेंच धोक्याचें आहे. उत्कृष्ट असें एकही बंदर पूर्व किनाऱ्यावर नाहीं. गोदावरी व कृष्णा यांचे मुखांजवळील समुद्रांत पाण्याखालीं वाळूचीं टेकाडें असल्यामुळें, तेथें मोठीं जहाजें जाऊं शकत नाहींत; म्हणून या नद्यांचे मुखांजवळील बंदरें विशेष उपयोगी नाहींत. पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई बंदर उत्तम प्रकारच्या बंदरांपैकीं आहे. आशियाच्या दक्षिणेस असें बंदर दुसरें एकही नाहीं.

**आखातें, सामुद्रधुन्या वगैरे***–मॉंझ भूशिरापासून आग्नेयी दिशेस किनाऱ्याचे बाजूनें गेलें म्हणजे प्रथम **कच्छचें आखात** लागतें. तें कच्छ संस्थानचें दक्षिणेस आहे. कच्छचे उत्तरेस **कच्छचें रण** आहे. या रणाचें

दक्षिणेकडील टोंक कच्छचे आखाताचे पूर्वेकडील टोंकास मिळालें आहे. कच्छचें रण म्हणजे एक क्षारमय व पाणथळ दलदलींचें वाळूचें मैदान आहे. तें सुमारें ८००० चौरसमैल असून पावसाळ्यांत समुद्राचे पाण्यानें भरून जातें. पावसाळा संपल्यानंतर पाणी वाहून गेल्यावर एथील वाळवंटांत जे मासे अडकून रहातात, ते मरतात व कुजतात. त्यांची घाण इतकी सुटते कीं, त्या प्रदेशांत जाण्यास घोडीं देखील धजत नाहींत. रानटी गाढवें व काळवीट यांची या भागांत थोडीशी वस्ती आहे. पूर्वीं पावसाळ्यांत कच्छचे रणांतील पाणी व खंबायतच्या आखाताचें पाणी हीं एकमेकांस मिळून काठेवाडचें एक बेट बनत असे. कच्छचे आखाताचे पुढें **खंबायतचें आखात** लागतें. हिंदुस्तानचे दक्षिण टोंकाजवळ हिंदुस्तान व सिलोन यांमध्यें **मानारचें आखात व पाल्कची सामुद्रधुनी** हीं आहेत. मानारचें आखात व पाल्कची सामुद्रधुनी यांमध्यें **रामेश्वर व मानार** हीं बेटें व त्यांना सांधणारा **रामाचा सेतु** आहे. रामेश्वर व मानार यांचे दरम्यान पाण्याच्या खालीं थोड्या अंतरावर असणाऱ्या वाळूच्या टेकड्या व खडक मिळून जो एक तुटका बांध झालेला आहे त्यास रामाचा सेतु म्हणतात. या टेकड्या व खडक यांच्यामुळें सेतूच्या जागीं पाणी कमी खोल आहे. या कारणामुळें एथून मोठीं जहाजें जाऊं शकत नाहींत.

**बेटें***–हिंदुस्तानचे दक्षिणेस **सिलोन** बेट आहे. त्यास हिंदुलोक **सिंहलद्वीप** किंवा **लंका** असें म्हणतात. सिंहलद्वीपाचा आकार बदामासारखा आहे. सीलोनचा पश्चिम किनारा व मद्रासचा पूर्व किनारा हे साधारणपणें एका सरळ रेषेंत आहेत. सिलोन व हिंदुस्तान यांच्यामध्यें **रामेश्वर व मानार** हीं बेटें आहेत. मंगळूरच्या पश्चिमेस जो बेटांचा समूह दिसतो त्यास **लखदीव बेटें** असें म्हणतात. लखदीव याचा अर्थ लाख बेटें असा होतो. लखदीव हा ‘ लक्षद्वीप ’ याचा अपभ्रंश असावा असें वाटतें. लखदीव बेटांच्या दक्षिणेस दुसरा एक लहान बेटांचा समूह आहे त्यास **मालदीव बेटें** असें म्हणतात. मालदीव याचा अर्थ हजार बेटें असा आहे. लखदीव व मालदीव या बेटांखालील सर्व खडकांची उत्पत्ति पोंवळ्याच्या किड्यांपासून झालेली

आहे. ह्या बेटांत नारळांचें मोठें उत्पन्न होतें. लखदीव बेटांवर मद्रास सरकारचा अंमल आहे. मालदीव बेटें एका मुसलमान राजाचे ताब्यांत आहेत. तो राजा सिलोनच्या गव्हर्नराच्या अमलाखालीं आहे. या दोन्ही बेटांतून पुष्कळ कवड्या व शिंपले परदेशीं जातात. कारोमांडेल किनाऱ्याचे पूर्वेस बऱ्याच अंतरावर बंगालच्या उपसागरांत **अंदमान व निकोबार** हीं बेटें आहेत. हिंदुस्तानांतील काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी या बेटांत पाठवितात. अंदमान बेटें मद्रास शहराच्या पूर्व दिशेस आहेत. निकोबार बेटें सिलोनच्या पूर्व दिशेस आहेत. लखदीव व अंदमान बेटें साधारणपणें एकाच आडव्या सरळ रेषेंत आहेत. मालदीव, सिलोन व निकोबार हीं बेटेंही साधारणपणें एकाच रेषेंत आहेत.

**भूशिरें***—हिंदुस्तानचें अत्यंत पश्चिमेकडील टोंक **मॉंझ भूशिर** होय, व अत्यंत दक्षिणेकडील टोंक **कामोरिन भूशिर** होय. सिलोनच्या उत्तर टोंकासमोर हिंदुस्तानचें जें टोंक आहे त्यास **कॅलिमियर भूशिर** म्हणतात. कामोरिनपासून कॅलिमियरपर्यंत जातांना प्रथम मानारचें आखात व नंतर पाल्कची सामुद्रधुनी लागते. महानदीच्या मुखाच्या ईशान्येस जें भूशिर आहे त्याचें नांव **पाल्मिरस** होय.

**हिंदुस्तानांतील उंच सखल प्रदेश**—*हिंदुस्तानांतील अतिशय उंच प्रदेश म्हणजे अर्थात् हिमालय पर्वत होय. गंगा व सिंधु यांच्या कांठच्या प्रदेशांपैकीं बराच प्रदेश, अरबी समुद्र व सह्याद्रि ह्यांमधील प्रदेश, तसेंच बंगालचा उपसागर व पूर्वघाट यांमधील प्रदेश, हे सखल आहेत. (समुद्रापासून या प्रदेशांत जात असतां, डोंगर मुळींच लागत नाहींत; यावरून या प्रदेशाची समुद्रसपाटीपासून उंची फारशी नाहीं असें दिसून येईल.) या तीन प्रदेशांचे मधील प्रदेश, हा पश्चिमघाट, अरवली, विंध्यपर्वत, आणि पूर्वघाट या पर्वतरूपी भिंतींवर जणूं काय बसविला आहे; यावरून तो उंचवट्याचा आहे असें कळून येईल.

**हिंदुस्तानचे स्वाभाविक विभाग***—(१) हिमालयाचा डोंगराळ प्रदेश, (२) दख्खनचें उंचवट्याचें मैदान, (३) सिंधु व गंगा यांच्या कांठचीं सखल मैदानें, (४) अरबी समुद्र व सह्याद्रि यांमधील अरुंद

६५०

प्रदेश, व (५) पूर्वघाट आणि बंगालचा उपसागर यांमधील प्रदेश हे हिंदुस्तानचे मुख्य स्वाभाविक विभाग होत. पहिल्या भागाची उंची सरासरी १५००० फुटांवर आहे; दुसऱ्याची १॥–२ हजार फूट आहे, व बाकीच्या भागांची ६०० फुटांपेक्षां कमी आहे.†

विंध्य पर्वताचे उत्तरेकडील भागास नुसतें **हिंदुस्तान** किंवा **उत्तर हिंदुस्तान** व दाक्षिणेकडील भागास **दख्खन** म्हणण्याची वहिवाट आहे.

**भिन्न भागांतील उतार***—नद्यांचे दिशांवरून पाहातां सिंधूचे कांठचे प्रदेशांत उतार नैर्ऋत्येकडे, गंगेच्या कांठच्या प्रदेशांत उतार प्रथम पूर्वेकडे व नंतर दाक्षिणेकडे, व दख्खनमध्यें उतार पूर्वेकडे–किंचित् आग्नेयीकडे–आहे असें आढळून येतें.

## पर्वत*—

**हाला**—हिंदुस्तानच्या अत्यंत पश्चिमेकडील टोंकापासून हिंदुस्तानचे सरहद्दीनें आपण उत्तरेकडे जाऊं लागलों म्हणजे प्रथम **हाला ऊर्फ खिरथर** पर्वत लागतो. तो दक्षिणोत्तर आहे. (लांबी२०० मैल. उंची ७२०० फूट.)

**सुलैमान**—हाला पर्वताचे पुढें सुलैमान पर्वत लागतो. तो दक्षिणोत्तर असून सिंधूशीं समांतर आहे. (लांबी ३–३॥ शें मैल. उंची ७००० फूट.) तख्त–इ–सुलैमान (सुलेमान राजाचें सिंहासन) हें या पर्वताचें अत्यंत उंच शिखर होय. उंची ११३०० फूट. हाला व सुलैमान हे पर्वत हिंदुस्तानचे पश्चिमेकडील व वायव्येकडील तट होत.

**हिंदुकुश**—सुलैमानचे पुढें सरहद्दीनें गेलें असतां हिंदुकुश पर्वत लागतो. तो ईशान्येकडून वायव्येकडे गेला आहे. (लांबी ६।७ शें मैल.) हिंदुकुशाचा ईशान्येकडील भाग हिंदुस्तानचे सरहद्दीवर आहे.

**काराकोरम**—हिंदुकुश पर्वताचे ईशान्येकडील टोंकापासून काराकोरम पर्वतास आरंभ होतो. तो वायव्येकडून आग्नेयकडे गेला आहे. (लांबी ५।६ शें मैल.) कारकोरम पर्वताचे रांगेपैकीं गॉड्विन्

---

† सर्व हिंदुस्तान देश ६०० फूट खालीं खचला किंवा समुद्राचें पाणी ६०० फूट वर चढलें, तर सिधूच्या व गंगेच्या कांठच्या मैदानांत समुद्राचें पाणी येऊन त्याच्या योगानें अरबी समुद्र व बंगालचा उपसागर यांना सांधणारी सामुद्रधुनी होईल, व दख्खनचा प्रदेश बेट होऊन जाईल.

ऑस्टिन् म्हणून जो पर्वत आहे त्याची उंची हिमालयाच्या अत्युच्च शिखराच्या खालोखाल आहे. हिंदुकुश व काराकोरम यांचीं टोंकें परस्परांस जेथें मिळतात, तें हिंदुस्तानचें अत्यंत उत्तरेकडील टोंक होय. काराकोरम पर्वत हिमालयाचा एक फाटा आहे असें म्हट-ल्यास चालेल.

**हिंदुकुश व काराकोरम यांची तुलना**—( १ ) हिंदुकुश ईशान्ये-कडून नैर्ऋत्येकडे जातो; काराकोरम वायव्येकडून आग्नेयीकडे जातो. (२) काराकोरमपेक्षां हिंदुकुश जास्त लांब आहे, पण कमी उंच आहे.

**हिमालय**—हिंदुस्तानचे उत्तर सरहद्दीवर हिमालय पर्वत आहे. या पर्वताइतका उंच पर्वत सर्व जगांत दुसरा नाहीं. ( हिम=बर्फ; आलय=स्थान, घर. या पर्वताच्या उंच भागांवर नेहमीं बर्फ असतें व या पर्वताच्या उंच दऱ्यांमध्यें बर्फाच्या नद्या आहेत, म्हणून या पर्वतास हिमालय म्हणजे बर्फाचें घर म्हणतात. ) आपणांकडे पाठ करून ठेविलेल्या धनुष्याप्रमाणें किंवा तीरकमठ्याप्रमाणें या पर्वताचा आकार आहे. (लांबी १॥। हजार मैल. रुंदी २०० मैल.) पर्वतांच्या अनेक समांतर रांगा मिळून हिमालय झाला आहे. या रांगांपैकीं दोन रांगा विशेष लांब व उंच असल्यामुळें महत्त्वाच्या आहेत. या दोन रांगांपैकीं दक्षिणेकडील रांग अधिक उंच आहे. हिमालयाचीं अतिशय उंच शिखरें याच रांगेंत आहेत. हिमालयाची सरासरी उंची २०००० फूट आहे. अर्थात् कांहीं भाग यापेक्षां उंच आहेत, व कांहीं कमी आहेत. हिमालयास अनेक उंच शिखरें आहेत. त्यांपैकीं ४० शि-खरें २४ हजार फुटांहून जास्त उंचीचीं आहेत. त्या सर्वांत एव्हरेस्ट अथवा गौरीशंकर हें शिखर अत्युच्च होय. त्याची उंची २९ हजार फूट आहे. कांचनगंगा, धवलगिरी, नंदादेवी, नंगापर्वत (क्रम पूर्वेकडून पश्चिमेकडे ) हीं हिमालयाचीं इतर उंच शिखरें होत. हिमालयाच्या दऱ्यांत अनेक हिमनद्या * आहेत. पैकीं एका हिमनदीची लांबी ६० मैल

---

* हिमनदी=बर्फाची नदी. पर्वताच्या शिखरांवर सांचलेलें बर्फ जेव्हां पर्वताच्या उतरणींवरून व दऱ्यांतून हळू हळू वाहात जातें, तेव्हां त्यास हिमनदी म्हणतात. हिमनदीची गति फार थोडी म्हणजे एका दिवसांत कांहीं फूट असते.

आहे. हिमालयावर १६ पासून १८ हजार फुटांपेक्षां जास्त उंचीवर नेहमीं बर्फ असतें. सोनें, लोखंड, तांबें, व शिसें हे धातु पुष्कळ ठिकाणीं हिमालय पर्वतांत सांपडतात. हिमालयाचें महत्त्व—(१) हिंदुस्तानांतील निम्या नद्यांचे उगम हिमालय पर्वतांत आहेत. (२) नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांबरोबर येणारे ढग हिमालयामुळें अडविले जाऊन त्यांचें सर्व पाणी हिमालयाचे दक्षिणेकडील प्रदेशास मिळतें. (३) हिमालयांतून वाहात येणाऱ्या नद्यांनीं हिमालयाचा पृष्ठभाग खरवडून आणलेला गाळ सांचून उत्तर हिंदुस्तानास सुपीकपणा आला आहे.

**अरवली**—राजपुतान्यांत **अरवली** पर्वतांची ओळ आहे. ती ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे गेली आहे. (लांबी ३ शें मैल. उंची २ हजार फूट.) अरवलीचे नैर्ऋत्येकडील टोंकास **अबूचा पहाड** म्हणतात. (उंची ५॥ हजार फूट.) अबूचे पहाडावर जैनांनीं बांधलेलीं सुंदर देवालयें आहेत.

**विंध्य**—ही पर्वतांची ओळ खंबायतचे आखातापासून थोड्या अंतरावरून निघून पूर्वेकडे (किंचित् ईशान्येकडे) जाते. विंध्य पर्वत म्हणजे दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची उत्तरेकडील भिंत होय. विंध्याद्रीचे पूर्वेकडील फाट्यास कैमूर पर्वत म्हणतात. (लांबी ६ शें मैल. उंची २॥ हजार फूट.) विंध्याद्रीचे दक्षिणेस नर्मदेचें खोरें व उत्तरेस माळव्याचा उंचवट्याचा प्रदेश असल्यामुळें त्याची दक्षिण बाजू जास्त उंच व उतरती दिसते.

**सातपुडा**—विंध्य पर्वताचे दक्षिणेस नर्मदा व तापी या नद्यां-मधील पूर्वपश्चिम पर्वतांची ओळ हाच सातपुडा होय. ही ओळ विं-ध्याशीं समांतर आहे. (लांबी ५ शें मैल; उंची २–२॥ हजार फूट.) ह्या पर्वताचे पूर्वेकडील आंगास **महादेव व पंचमडी टेकड्या** अशीं नांवें आहेत. पंचमडी टेकड्यांची उंची ४॥ हजार फूट आहे.

**विंध्य व सातपुडा यांची तुलना**—साम्य–दोन्ही पर्वत पूर्वपश्चिम आहेत. **भेद**—विंध्यापेक्षां सातपुडा कमी लांब आहे (२) सातपुडा कमी उंच आहे (२) विंध्य तिरपा (ईशान्येकडे जाणारा) आहे.

**सह्याद्रि**—पश्चिम किनाऱ्यापासून सुमारें ३०–४० मैलांचे अंत·

रावर सह्याद्रीची ओळ आहे. या पर्वतास **पश्चिम घाट** असेंही म्हणतात. दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची सह्याद्रि ही पश्चिमेकडील भिंत होय. या पर्वताची ओळ किनाऱ्याशीं बहुतेक समांतर आहे. ( लांबी सुमारें एक हजार मैल; उंची ३॥–४ हजार फूट. ) ह्या पर्वताचें मलयगिरी हें शिखर म्हैसूरचे पश्चिमेस असून त्याची उंची ६२०० फूट आहे. सह्याद्रीच्या पूर्व बाजूपेक्षां पश्चिमबाजू जास्त उतरती व उंच आहे. सह्याद्रीची जास्तींत जास्ती रुंदी २० मैलपर्यंत आहे.

**पूर्वघाट**—पूर्व किनाऱ्यापासून कांहीं अंतरावर उत्तरेकडून दाक्षिणेकडे जाणारी जी डोंगरांची ओळ आहे तीस **पूर्वघाट** म्हणतात. ही दख्खनच्या उंचवट्याच्या प्रदेशाची पूर्वेकडील भिंत होय. (उंची १॥ हजार फूट, लांबी सुमारें ९ शें मैल.) या पर्वताची ओळ सरळ नसून ती मध्यंतरीं कित्येक ठिकाणीं तुटलेली आहे. तिजमधून कित्येक नद्या वाहात जातात. या पर्वताचा जो फाटा निजामचे राज्याचे दक्षिण बाजूनें पूर्वेकडे गेला आहे, त्याची उंची इतर भागांच्या उंचीपेक्षां अधिक आहे. या भागांतील कांहीं शिखरांची उंची ५ हजार फुटांपर्यंत आहे.

**निलगिरी**—पूर्वघाट व पश्चिमघाट यांना दक्षिणेकडील बाजूस सांधणारी जी डोंगरांची पूर्वपश्चिम ओळ आहे तीस निलगिरी म्हणतात. (लांबी १०० मैल.) दोडाबेटा हें निलगिरीचें सर्वांत उंच शिखर होय. त्याची उंची ८७६० फूट आहे.

निलगिरीचे पलीकडे सह्याद्रीस सुमारें २५ मैल लांबीची एक मोठी फट आहे. तिला **पालघाटची खिंड** म्हणतात. या फटींतील प्रदेशाची उंची फक्त एक हजार फूट आहे. या खिंडीचे दक्षिणेस सह्याद्रीचा जो भाग आहे त्यास **अनमलाईचे डोंगर** म्हणतात. त्यांच्यांतील **अनमुडी** नांवाचे सर्वांत उंच शिखराची उंची ८८४० फूट आहे. या डोंगराचे दक्षिणेकडील भागास **कार्डमम्** डोंगर म्हणतात. या डोंगरांचें ( सह्याद्रीचें ) अगदीं दक्षिणेकडील टोंक हेंच **कामोरिन** अथवा **कन्याकुमारी** भूशिर होय.

**पूर्वघाट व पश्चिम घाट यांची तुलना**:—साम्य–(१) दोन्ही साधारणपणें दक्षिणोत्तर आहेत. (२) दोन्ही साधारणपणें किनाऱ्याशीं समांतर

आहेत. **भेद**—(१) पूर्वघाटापेक्षां पश्चिमघाट जास्त लांब आहे. (२) पूर्वघाटापेक्षां पश्चिमघाटाची उंची अधिक आहे. (३) पूर्वघाटाची रांग पश्चिम घाटाइतकी सरळ नसून वेडीवाकडी आहे. (४) पश्चिम घाटापेक्षां पूर्व घाटास खिंडी जास्त आहेत. (५) पूर्वघाट समुद्रापासून जास्त लांब आहे. (६) पश्चिम घाटांत पुष्कळ नद्यांचे उगम आहेत, व त्यांतून निघणाऱ्या नद्या दोन्हीं आंगानें वाहातात. पूर्व घाटांतून निघणाऱ्या नद्या फक्त एकाच आंगानें वाहतात. (७) पूर्व घाटांतून निघणाऱ्या नद्यांपेक्षां पश्चिम घाटांतून निघणाऱ्या नद्या जास्त लांब आहेत.

**खिंडी**—वायव्य सरहद्दीवर चार खिंडी आहेत. त्यांपैकीं **बोलन** व **खैबर** या प्रसिद्ध आहेत. त्यांची उंची १४००० फुटांहून जास्त आहे. जेथें नद्यांनीं डोंगराचा भेद केला आहे अशा ठिकाणीं या खिंडी आहेत. पहिल्या खिंडींतून येणाऱ्या रस्त्यावर **सकर** शहर आहे व दुसऱ्या खिंडींतून येणाऱ्या रस्त्यावर **अटक** शहर आहे. उत्तर सरहद्दीवर काराकोरम पर्वतांत **काराकोरम** खिंड आहे. ही सर्व जगांत उंच आहे. सिक्कीम संस्थानांतून तिबेटांत जाण्यास **जेलाप ला** नांवाची खिंड हिमालय पर्वतांत आहे. ही खिंड सुमारें १७००० फूट उंच आहे.

## नद्या*—

उत्तरार्धांतील नद्या व दक्षिणार्धांतील नद्या असे हिंदुस्तानांतील नद्यांचे दोन मुख्य वर्ग करितां येतात. पैकीं उत्तरार्धांतील नद्यांचे (१) सिंधु व तिला मिळणाऱ्या नद्या आणि (२) गंगा, ब्रह्मपुत्रा व त्यांना मिळणाऱ्या नद्या असे दोन समूह होतात.

दक्षिणार्धांतील नद्यांचे (१) पूर्ववाहिनी नद्या व (२) पश्चिमवाहिनी नद्या असे दोन वर्ग आहेत. या सर्व नद्यांपैकीं बहुतेक नद्यांचे उगम सह्याद्रींत असल्याकारणानें ज्या पूर्ववाहिनी आहेत त्या लांब आहेत, व ज्या पश्चिमवाहिनी आहेत त्या फारच लहान आहेत. नर्मदा व तापी या नद्यांचे उगम विंध्य व सातपुडा या पर्वतांचे पूर्वभागीं असल्यामुळें त्या लांब आहेत. मोठ्या पूर्ववाहिनी नद्यांपैकीं फक्त महानदीचा उगम सह्याद्रींत नसून तो विंध्याचे पूर्वभागांत आहे.

हिंदुस्तानच्या उत्तरार्धांत **सिंधु**, **गंगा** व **ब्रह्मपुत्रा** आणि दक्षिणार्धांत **नर्मदा**, **तापी**, **कृष्णा**, **गोदावरी** व **कावेरी** या मुख्य नद्या होत.

**सिंधु** ( १८०० )—‡सिंधूचा उगम हिमालयाच्या उत्तरेकडील भागांत कैलास पर्वताच्या पश्चिमभागीं होतो. या प्रदेशाशेजारींच सतलज व ब्रह्मपुत्रा ह्या नद्यांचे उगम आहेत. सिंधु नदी उगमापासून निघाल्यावर सुमारें ७ शें मैल वायव्येकडे वाहात जाऊन नैर्ऋत्येकडे वळून पंजाबांत जाते. नंतर सुमारें ८।९ शें मैलपर्यंत नैर्ऋत्येकडे वाहात जाऊन दक्षिणेकडे वळते, व धनुष्याप्रमाणें बांक घेऊन अनेक मुखांनीं अरबी समुद्रास मिळते. सिंधूस डाव्या बाजूनें **जेहलम, चिनाब, रावी, बियास** व **सतलज** या पांच नद्या मिळून झालेली **पंचनदी मिथनकोटाजवळ** मिळते. या पांच नद्यांपैकीं जेहलम चिनाबला मिळते. चिनाब रावीस मिळते. सतलज नदीस प्रथम बियास व पुढें कांहीं अंतरावर रावी मिळते. या पांच नद्यांसंबंधानें ही विशेष गोष्ट आहे कीं, त्या सर्व बहुतेक एकाच दिशेनें वाहातात. सिंधूस उजव्या बाजूनें काबूल नदी अटक शहराजवळ मिळते. सिंधूचें पाल वरचेवर बदलतें व त्यांत ठिकठिकाणीं वाळू सांचते; शिवाय सिंधूचा प्रवाह असावा तितका संथ नाहीं. यामुळें आगबोटींना या नदीचा चांगलासा उपयोग होत नाहीं; परंतु होड्यांना या नदीचा उपयोग होतो. सिंधूसंबंधानें ही गोष्ट विशेष आहे कीं, तिच्या कांठीं मोठीं शहरें फार थोडीं आहेत. सिंधूचें पात्र, विशेषत: दक्षिणेकडील प्रदेशांत, वारंवार बदलत असतें. शिवाय सिंधूस एकाएकीं मोठा पूर येतो व तेव्हां पाणी दोहों बाजूंस कित्येक मैलपर्यंत पसरतें. यामुळें सिंधूच्या कांठीं मोठीं शहरें फारशीं नाहींत. जेथें सिंधूचा प्रवाह खडकांतून गेलेला आहे तेथें त्याचें स्थान बदलत नाहीं; म्हणून अशा ठिकाणीं कांहीं शहरें वसलीं आहेत. अशीं शहरें सक्कर व हैदराबाद हीं होत. ३॥। लाख चौरसमैल प्रदेशांतील पाणी सिंधु नदींत वाहून येतें. सिंधूचे बरोबर मध्यभागीं अटक शहर आहे; म्हणजे त्या शहरापासून सिंधूचा उगम व शेवट सारखाच ( ९ शें मैल ) लांब आहे. सिंधूचा उगम ज्या ठिकाणीं होतो तें

---

‡ नद्यांचे नांवांपुढें कंसांत जो आंकडा दिला आहे तो त्या नदीची लांबी किती मैल आहे हें दर्शवितो.

स्थळ १६ हजार फूट उंचीवर आहे व अटक शहर सुमारें २००० फुट उंच आहे. यावरून अटक शहरापर्यंत सिंधूनदी ज्या प्रदेशांतून वाहात येते तो बराच उतरता असला पाहिजे व या प्रदेशांतील सिंधूच्या प्रवाहास जोर व खळखळाट बराच असला पाहिजे असें दिसून येईल. सिंधूचा उत्तर प्रवाह दिवसेंदिवस थोडा थोडा पश्चिमेकडे जात आहे असें आढळून येतें. एका वर्षीं सिंधूच्या एका फाट्याचें पात्र दोन मैल पश्चिमेकडे सरकल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें.

**गंगा** ( १५०० )–गंगेचा उगम हिमालयाच्या दक्षिण उतरणीवर होतो. हिमालयांत अनेक हिमनद्या आहेत. यांपैकीं एका हिमनदीचे शेवटाजवळ एका कोनाड्यांतून जो जलप्रवाह वाहातो त्यास गंगा म्हणतात. जेथून हा जलप्रवाह निघतो त्या ठिकाणास **गंगोत्री** म्हणतात. गंगोत्रीपासून गंगेचा प्रवाह निघाल्यानंतर तो पश्चिमेकडे वाहातो, व हिमालयाच्या दक्षिणेकडील रांगेंतील टेकड्यांचा भेद करून तो पुढें दक्षिणेकडे वळतो. नंतर कांहीं अंतरावर प्रवाह बराच लांब आग्नेयीकडे वाहून अलाहाबादेजवळ पूर्वेकडे वळतो. पूर्वेकडे वळल्यानंतर सुमारें ४०० मैल वाहात जाऊन तो दक्षिणेकडे वळतो. शेवटीं तो अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळतो. गंगेस डाव्या बाजूनें **रामगंगा, गोमती, गंडकी, घोगरा** व **कुशी** या नद्या मिळतात. व उजव्या बाजूनें **यमुना, शोणनद,** व **कर्मनाशा** ह्या नद्या मिळतात. यमुना नदीस **चंबळा** व **बटवा** या नद्या माळव्यांतून वाहात येऊन मिळतात. यमुना व गंगा या नद्यांचे उगम एकमेकांपासून थोड्या अंतरावर असून त्यांचे प्रवाह एकाच दिशेनें वाहात जातात. गंगा नदीचा जो फाटा कलकत्याजवळून गेला आहे त्यास **हुगळी** म्हणतात. गंगेचा मुख्य फाटा पूर्वेकडे गेला आहे; त्यास **पद्मा** असें म्हणतात. परंतु या व इतर फाट्यांपेक्षां हुगळी नदीसच बंगालमध्यें जास्त पवित्र मानतात. गंगेस भागीरथी * असें दुसरें नांव आहे. गंगेच्या अनेक

* गंगेस भागीरथी हें नांव पडण्याचें कारण हिंदूंच्या पुराणांतरीं पुढें लिहिल्याप्रमाणें आढळतें गंगा मूळची स्वर्गलोकांतील नदी. तिचें

फाट्यांबरोबर वाहून येणारा गाळ सांचून तिच्या मुखाशीं जी भूमि बनली आहे, तिला सुंदरबन म्हणतात. या प्रदेशांत झाडी फार आहे. इतर नद्यांचें पाणी उन्हाळ्यांत कमी होतें, परंतु गंगेचें व ( सिंधूचेंही ) पाणी उन्हाळ्यांत थोडेंसें चढतें. याचें कारण हें कीं, गंगेचें मूळ हिमनदींत असल्यामुळें उन्हाळ्यांत सूर्याच्या प्रखर उष्णतेनें हिमनदीचें बर्फ वितळून नेहमींपेक्षां जास्त पाणी वाहूं लागतें. हरिद्वारास जाणारे लोक असें सांगतात कीं, तेथें सकाळच्यापेक्षां दोनप्रहरीं पाणी अधिक चढतें. सकाळच्यापेक्षां दोनप्रहरीं ऊन कडक असतें, यामुळें दोनप्रहरीं हिमनदीचें बर्फ जास्त वितळतें, हेंच या गोष्टीचें कारण होय. कानपूरची समुद्रसपाटीपासून उंची ३८० फूट आहे. यावरून गंगा ज्या प्रदेशांतून वाहात जाते त्या प्रदेशांत उतार फार कमी आहे, असें आढळून येईल. या कारणामुळें गंगेचा प्रवाह फार संथ आहे. गंगेचा उगम १३ हजार फुटांवर आहे, व हरिद्वारची उंची फक्त १ हजार फूट आहे. म्हणून हरिद्वारपर्यंतच्या प्रवाहास जोर फार आहे. गंगेस अनेक कालवे आहेत. या कालव्यांचे योगानें लाखों एकर जमिनीस पाणी मिळून तिला सुपीकपणा प्राप्त होतो. एवढेंच नव्हे, तर हे कालवे मोठमोठ्या नावा चालण्याजोगे रुंद असल्यामुळें त्यांचा मालाची नेआण करण्यास व मनुष्यांना प्रवास करण्यास हमरस्त्यांप्रमाणें उपयोग होतो. गंगेच्या प्रवाहांतून व कालव्यांतून गलबतें व लहान आगबोटी अलाहाबादपर्यंत जाऊं शकतात. **गंगेचें शुभ्र पाणी, तिचा संथ व भव्य प्रवाह, तिच्या उगमाजवळच्या प्रदेशाची रमणीयता, तिच्या कांठच्या प्रदेशाचा सुपीकपणा, व एकंदरींत तिच्या प्रवाहाची व तिच्या अनेक कालव्यांची उपयुक्तता, यामुळें तीस महत्त्व प्राप्त झालें आहे. तिला हिंदू लोक प्राचीन कालापासून पवित्र मानीत आले आहेत**

---

पाणी फार पवित्र; त्यांत स्नान केल्यानें मनुष्य सर्व पातकांपासून मुक्त होतो. म्हणून कपिल ऋषीच्या शापानें जळून भस्म झालेल्या पूर्वजांचा उद्धार करण्याकरितां भगीरथ नांवाच्या राजानें गंगेस स्वर्गलोकाहून पृथ्वीवर आणलें. यामुळें भगीरथाचे नांवावरून गंगेस भागीरथी हें नांव प्राप्त झालें.

त्याचें कारणहीं हेंच दिसतें. गंगेचें पाणी किंचित् पांढऱ्या रंगाचें दिसतें व यमुनेचें कांहींसें काळ्या रंगाचें दिसतें. या नद्यांचा अलाहाबाद ऊर्फ प्रयाग शहराजवळ जेथें संगम होतो, तेथें दोन्हीं प्रवाहांच्या पाण्यांचे भिन्न रंग कांहीं अंतरापर्यंत स्पष्ट दिसतात. **गंगा व सिंधु यांची तुलना**—भेद–(१) गंगेचा उगम हिमालयाचे दक्षिणभागीं होतो; सिंधूचा उत्तरभागीं होतो. (२) गंगेपेक्षां सिंधु लांब आहे. (३) दोघींच्या वाहाण्याच्या दिशा विरुद्ध आहेत. (४) सिंधूपेक्षां गंगेचा प्रवाह जास्त संथ आहे. (५) सिंधूपेक्षां गंगेच्या कांठीं शहरें अधिक आहेत. (६) पवित्र स्थानें व सुपीक देश गंगेचे कांठचे प्रदेशांत अधिक आहेत.

**ब्रह्मपुत्रा ( १८०० )**—ब्रह्मपुत्रेचा उगम हिमालयाच्या उत्तर भागांत मानस सरोवराजवळ सिंधूचे उगमाशेजारीं आहे. ती प्रथम पूर्वेकडे सुमारें ८०० मैल वाहात जाऊन वाटेंत टेकड्या आल्यानें मोठें वळण घेऊन व हिमालयास वळसा घालून पश्चिमेकडे ( कांहीं अंशीं नैर्ऋत्येकडे ) वळते. नंतर हिमालय व आसामच्या टेकड्या यांच्या मधून सुमारें ४ शें मैल वाहत गेल्यावर दक्षिणेकडे वळते. दक्षिणेकडे वळल्यावर थोड्या अंतरावर तिचे दोन फाटे होतात. पैकीं पश्चिमेकडील फाटा गंगा नदीच्या पद्मा नांवाच्या फाट्यास मिळतो. डाव्या फाट्यास **सुरमा** नदी मिळाल्यानंतर त्यास **मेघना** हें नांव प्राप्त होतें. हा फाटा बंगालच्या उपसागरास मिळतो.

मुखापासून ८ शें मैलपर्यंत ह्या नदींतून आगबोटी जातात. ब्रह्मपुत्रेचा प्रवाह फारसा संथ नसल्यामुळें तिचा जलमार्ग या नात्यानें गंगेइतका उपयोग होत नाहीं. ब्रह्मपुत्रेस तिबेटांत सांपू व आसामांत डिहांग हीं नांवें आहेत. तीस हिंदुस्तानांत उजवीकडून तिस्ता व डावीकडून सुरमा या नद्या मिळतात.

हिंदुस्तानच्या उत्तरार्धांत पडणारें बहुतेक सर्व पाणी व त्या पाण्याबरोबर वाहून येणारा सर्व गाळ शेवटीं सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांत येतो.

[ पुढील आठ नद्या, गंगेचे मुखापासून किनाऱ्याचे बाजूनें हिंदुस्तानचे दक्षिण टोकापर्यंत गेलें असतां ज्या क्रमानें लागतात, त्या क्रमानें दिल्या आहेत. ]

**महानदी** ( ५२० )--गंगा नदीच्या मुखापासून नैर्ऋत्येकडे गेलें असतां महानदी लागते. तिचा उगम मध्यप्रांतांत छत्तिसगडच्या उंचवट्याच्या मैदानाच्या दक्षिणभागीं असलेल्या डोंगराळ प्रदेशांत होतो. ती आग्नेयीकडे वाहात जाऊन बंगालच्या उपसागरास कित्येक मुखांनीं मिळते. या नदीस फार मोठे पूर येतात. पूर येतो तेव्हां तिचें पाणी ३२ फुटांपर्यंत ( ५ पुरुषांपर्यंत ) चढतें. १८६६ सालीं या नदीस जो मोठा पूर आला होता त्याच्या योगानें १२ लाख लोकांच्या घरांची नासधूस झाली. (हें महानदी या नांवाचें कारण असावें.)

**गोदावरी** (९००)—ही नदी सह्याद्रीचे पूर्वेकडील फाट्यांत त्रिंबकेश्वराजवळ उगम पावून आग्नेयीकडे वाहात जाऊन राजमहेन्द्री शहराजवळ बंगालच्या उपसागरास मिळते. तिला डाव्या बाजूनें पूर्णा, प्राणहिता व इन्द्रावती या नद्या मिळतात. प्राणहिता ही नदी पैनगंगा, वर्धा व वैनगंगा या तीन नद्या मिळून झाली आहे. गोदावरीस उजव्या बाजूनें मांजरा नदी मिळते. गोदावरीस मोठमोठे कालवे काढलेले आहेत. त्या सर्वांची लांबी ५ शें मैलांहून अधिक भरेल.

**कृष्णानदी** ( ८०० )--ही सह्याद्रींत महाबळेश्वराजवळ उगम पावून प्रथम दक्षिणेकडे वाहात जाऊन सुमारें २०० मैल अंतरावर पूर्वेकडे वळते. पूर्व दिशेनें सुमारें ५०० मैल वाहात गेल्यावर दक्षिणेकडे वळून बंगालचे उपसागरास मच्छलीपट्टणाजवळ मिळते.

तिला डावीकडून भीमा व उजवीकडून तुंगभद्रा या नद्या मिळतात. कृष्णेस डावीकडून मिळणाऱ्या इतर लहान नद्यांत डोण नदी सांगण्यासारखी आहे. तसेंच उजवीकडून मिळणाऱ्या इतर लहान नद्या वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, घटप्रभा व मलप्रभा या होत.

कृष्णानदीच्या खोऱ्याचें क्षेत्रफळ सुमारें १ लाख चौरस मैल आहे. तिचा प्रवाह—विशेषतः मुखाजवळ—संथ नाहीं. यामुळें त्यामधून जहाजें, नावा जाऊं शकत नाहींत.

**उत्तर पेन्नार** (३५५) **पालर** (२३०) व **दक्षिण पेन्नार** (२४५)— या नद्या म्हैसूर संस्थानच्या पूर्वभागीं असलेल्या डोंगरांत उगम पावून पूर्वेकडे वाहात जाऊन बंगालचे उपसागरास मिळतात.

**कावेरी** ( ४७० )—ही नदी कुर्ग प्रांतांत सह्याद्रींत उगम पावून म्हैसूर संस्थानांतून प्रथम पूर्व व नंतर दक्षिण दिशेनें वाहात जाऊन फिरून पूर्वाभिमुख होऊन म्हैसूर संस्थानांतून बाहेर पडते. नंतर ती मद्रास इलाख्यांतून वाहात जाऊन बंगालचे उपसागरास मिळते. कावेरीस दोन मोठे धबधबे आहेत. पैकीं एक ४६० फूट उंच आहे व दुसरा २०० फूट आहे. मुखाजवळ कावेरीस अनेक फांटे फुटतात. कावेरीच्या सर्वांत उत्तरेकडील फाट्यास **कोलेरून** म्हणतात.

**ताम्रपर्णी** नदी कार्डमम पर्वतांत उगम पावून मानारचे आखातास मिळते.

( पुढील सर्व नद्या अरबी समुद्रास मिळणाऱ्या असून उत्तरेकडून दक्षिणेकडे गेलें असतां ज्या क्रमानें लागतील, त्या क्रमानें दिल्या आहेत. )

**लुनी** ( ३२० )–हिचा उगम राजपुतान्यांत अरवली पर्वताचे पश्चिमभागीं होतो. ती माळव्याचा उंचवट्याचा प्रदेश व सिंधच्या पूर्वेकडील वाळूचें मैदान यांमधून वाहात जाऊन कच्छचे आखातास मिळते.

**साबरमती** ( २०० )–हिचा उगम राजपुतान्यांत अरवलीचे फाट्यांत होतो. ती गुजराथेंत शिरल्यावर दक्षिण दिशेनें वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते.

**मही** ( ३५० ) ही माळव्यांत उगम पावून नैर्ऋत्येकडे वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते.

**नर्मदा** ( ७३५ )–मध्य प्रांताच्या ईशान्यभागीं रेवा संस्थानांत अमरकंटकाचे डोंगर आहेत; त्यांमध्यें नर्मदेचा उगम होतो. नर्मदा नदी पश्चिम दिशेनें विंध्य व सातपुडा यांचे मधून वाहात जाऊन खंबायतचे आखातास मिळते. नर्मदा नदीचे प्रवाहास जोर बराच असल्यामुळें होड्या चालविण्यास ही नदी बहुतेक निरुपयोगी आहे. नर्मदा नदी जबलपुराजवळ जेथें शुभ्र संगमरवरी दगडांचे खडकांमधून वाहाते तेथील देखावा फारच मनोहर दिसतो.

**तापी** ( ४४० ) तापीचा उगम सातपुड्यांत बैतुलाजवळ होतो. तेथून ती पश्चिमेकडे वाहात जाऊन सुरतेजवळ खंबायतचे आखा-

तास मिळते. तीस डावीकडून पूर्णा, गिरणा व पांझरा या नद्या मिळतात.

**लांबीसंबंधानें नद्यांची तुलना**—नर्मदा, कृष्णा, गोदावरी या नद्या सुमारें तापीचे दुप्पट लांब आहेत; आणि गंगा, सिंधु व ब्रह्मपुत्रा या सुमारें चौपट लांब आहेत.

**उत्तरार्धांतील नद्यांची दक्षिणार्धांतील नद्यांशीं तुलना**—

प्रवाहाचा वेग, जलमार्ग या नात्यानें उपयुक्तता वगैरे बाबतींत सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्या व दख्खनमधील नद्या यांचेमध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें फरक आहे. (१) पहिल्या वर्गांतील (हिंदुस्तानचे उत्तरार्धांतील) नद्या जास्त लांब आहेत. (२) ह्या नद्यांचा प्रवाह जास्त संथ आहे. (३) ह्या नद्यांचा उगम हिमालयाच्या प्रदेशांत असल्यामुळें उन्हाळ्यांत वर्फ वितळून त्या पाण्याचा पुरवठा प्रवाहांस होतो. यामुळें उन्हाळ्यांत ह्या नद्यांचे प्रवाह लहान होत नाहींत. दुसऱ्या वर्गांतील (हिंदुस्तानचे दक्षिणार्धांतील) नद्यांची अशी स्थिति नसल्यामुळें व त्या ज्या प्रदेशांतून वाहातात त्यांत पाऊस फार पडत नसल्यामुळें त्यांचे प्रवाह उन्हाळ्यांत फार लहान होतात. (४) वरील दोन कारणांमुळें जलमार्ग या नात्यानें दुसऱ्या वर्गांतील नद्यांचा विशेष उपयोग होत नाहीं.

**धबधबे**—(१) शरावती नदीच्या योगानें झालेला गिरसप्पाचा धबधबा. याची उंची ९॥ शें फूट आहे. (२) कावेरीचा शिवसमुद्र धबधबा (उंची ३०० शें फूट); व (३) घटप्रभेचा गोकाकजवळील धबधबा (उंची १॥ शें फूट].

**सरोवरें**—काश्मिरांत झेलम नदीचा प्रवाह पसरून झालेलें **वुलर**, संयुक्त प्रांतांत **नैनीताल**, व कृष्णा व गोदावरी यांच्या मुखांजवळच्या प्रवाहाच्या दरम्यान **कोलेर** * हीं हिंदुस्तानांतील गोड्या पाण्याचीं मुख्य सरोवरें होत. कृष्णा व गोदावरी या नद्यांना पूर येतो तेव्हां त्यांचें जें पाणी दूरवर पसरतें तें सांचून कोलेर सरोवर बनलें आहे. राजपुतान्यांत **सांबर** व वऱ्हाडांत **लोणार** हीं खाऱ्या पाण्याचीं सरोवरें आहेत. सांबर सरोवरांतून मीठ पुष्कळ निघतें.

---

* पावसाळ्यांत कोलेर सरोवराचें क्षेत्रफळ १०० चौरस मैल होतें.

महानदीचे मुखाजवळ चिल्का, मद्रासचे उत्तरेस उत्तर पेन्नार व पालर या नद्यांमध्यें पुलिकत व कोचीन बंदराजवळ कोचीन हीं समुद्राचें खारें पाणी आंत येऊन झालेलीं सरोवरें आहेत. चिल्का सरोवर इतकें उथळ आहे कीं, त्याचें क्षेत्रफळ जरी कित्येक चौरस मैल आहे, तरी त्याच्या पाण्याची खोली अवघी ४।५ हात आहे.

## भिन्न प्रदेशांतील हवामान—

हिंदुस्तानचा दक्षिणार्ध उष्णकटिबंधांत येतो व उत्तरार्ध समशीतोष्ण कटिबंधांत येतो; यावरून दक्षिणार्धापेक्षां उत्तरार्धांतील प्रदेशाची हवा जास्त थंड असली पाहिजे असें दिसून येईल.

पंजाबचा उत्तर भाग, काश्मीर व हिमालयावरील प्रदेश, ह्या प्रदेशांची समुद्रसपाटीपासून उंची पुष्कळ असल्यामुळें त्यांतील हवा फार थंड आहे.

माळवा व दक्षिण हिंदुस्तानांतील उंचवट्याचा प्रदेश यांची उंची बरीच असल्यामुळें त्यांतील हवा साधारणपणें थंड आहे. तथापि दक्षिण हिंदुस्तानांतील उंचवट्याचा प्रदेश पूर्वेकडे उतरता व अर्थात् कमी उंचीचा होत गेला असल्यामुळें, या प्रदेशांत जों जों पूर्वेकडे जावें तों तों हवा अधिक उष्ण होत जाते. सह्याद्रीची उंची बरीच असून त्यावर झाडीही फार आहे यामुळें त्यावरील प्रदेशाची हवा थंड आहे.

सिंधूचे कांठच्या प्रदेशापैकीं दक्षिणेकडील प्रदेश फार सखल असल्यामुळें त्यांतील हवा उष्ण आहे. हा प्रदेश व राजपुतान्याचा बराच भाग थरच्या वाळवंटास लागून असल्यामुळें त्यांत उन्हाळ्यांत उष्णता व हिंवाळ्यांत थंडी फार असते.

गंगेच्या कांठच्या प्रदेशापैकीं बहुतेक भाग सखल असल्यामुळें त्यांतील हवा उष्ण आहे. यापैकीं बंगाल प्रांत समुद्रास लागून असल्यामुळें त्यामधील हिंवाळ्यांतील व उन्हाळ्यांतील हवामानांत फारसा फरक पडत नाहीं; परंतु संयुक्त प्रांत मोठ्या भूमि-प्रदेशाच्या मध्यभागीं असल्यामुळें, तेथें उन्हाळा व थंडी हीं दोन्ही फार असतात.

पूर्व किनाऱ्याजवळील सखल प्रदेश व पश्चिम किनाऱ्याजवळील सखल प्रदेश हे सखल असल्यामुळें त्यांतील हवा उष्ण आहे; परंतु पश्चिम किनाऱ्याजवळील सखल प्रदेशांतून मान्सून वारे वाहात असल्यामुळें व तेथें पाऊस जास्त पडत असल्यामुळें, त्यांतील हवा पूर्व किनाऱ्याजवळील सखल प्रदेशापेक्षां कमी उष्ण पण जास्त दमट आहे.

पूर्व किनारा व उत्तर हिंदुस्तानांतील वाळवंटाचा प्रदेश हे हिंदुस्तानांतील अतिशय उष्ण हवेचे देश होत.

**हिंदुस्तानच्या हवामानासंबंधानें सामान्य नियम**—दक्षिणेकडून उत्तरेकडे जों जों जावें, तों तों हवा एकंदरांत कमी उष्ण होत जाते. परंतु दक्षिणेकडून उत्तरेकडे जातांना भूमिप्रदेशाचा विस्तार मोठा होत गेल्यानें, हिंवाळ्यांतील थंडीचें मान व उन्हाळ्यांतील उष्णतेचें मान यांमधील फरक वाढत जातो.

मद्रासचा बहुतेक भाग, मुंबई इलाख्याचा पश्चिम भाग व बंगालचा दक्षिण भाग हे समुद्रानजीक असल्यामुळें तेथील भिन्न ऋतूंतील उष्णतामानांत फार फरक पडत नाहीं. उत्तरहिंदुस्तानच्या उत्तरभागांत हा फरक फार असतो.

**हिंदुस्तानांतील हवेचे तीन प्रकार**–(१) उष्ण व दमट; (२) उष्ण व कोरडी; ( ३ ) मध्यम उष्ण व कोरडी. हे तीन प्रकार अनुक्रमें पुढील देशांत आढळून येतात. पहिला प्रकार मद्रास इलाख्याचा दक्षिण भाग ओरिसा, बंगाल व आसाम यांमध्यें. दुसरा प्रकार राजपुताना, सिंधचा उत्तरभाग यांमध्यें. तिसरा प्रकार पंजाब, संयुक्त प्रांताचा कांहीं भाग, माळवा, व महाराष्ट्र यांमध्यें.

## पाऊस—

नैर्ऋत्येकडील मान्सून वारे एप्रिलपासून आक्टोबरपर्यंत वाहात असतात. हे वारे हिंदी महासागरावरून वाहात येतात. यामुळें त्यांचेबरोबर समुद्राच्या पाण्याच्या वाफेपासून झालेले ढग येतात. म्हणून हे वारे वाहूं लागले म्हणजे पावसाळ्यास आरंभ होतो. प्रदेशाची उंची जों जों अधिक तों तों तेथील हवा थंड असल्यामुळें, हे वारे जेव्हां एकाद्या पर्वतावर आदळतात, तेव्हां त्यांमधील ढगांतल्या वाफेचें, पर्वतावरील थंड हवेच्या स्पर्शानें,

घनीभवन होऊन पाणी होतें, व त्यामुळें पाऊस पडतो. या कारणानें या वाऱ्यांच्या मार्गांत जेथें एकादा पर्वत आडवा येतो तेथें पुष्कळ पाऊस पडतो. सह्याद्रीचा पश्चिमभाग व आसामच्या टेकड्या या ठिकाणीं अतिशय पाऊस पडतो याचें कारण हेंच आहे. हिमालयाच्या दक्षिण उतरणीवरही याच कारणानें पुष्कळ पाऊस पडतो. वाफ पावसाच्या रूपानें पडून गेल्यावर पुढें जे वारे वाहातात, त्यांच्यांत वाफ थोडी राहिलेली असते; म्हणून पर्वत लागल्यानंतर जे प्रदेश मान्सून वाऱ्यांचे मार्गांत येतात, त्यांत पाऊस कमी पडतो. जों जों पाऊस पडत जातो, तों तों हवेंतील वाफेचा सांठा कमी कमी होतो; म्हणून पुढील पुढील प्रदेशांत पाऊस कमी कमी पडत जातो. सह्याद्रीच्या पश्चिमभागापेक्षां पूर्वभागांत पाऊस कमी कां आहे, व पूर्वभागांतही जों जों पूर्वेकडे जावें तों तों पाऊस कमी कां होतो, याचें कारण वरील गोष्टीवरून समजून येईल.

जमीन तापल्यानें वरची हवाही ज्या ठिकाणीं फार तापलेली असते, त्या ठिकाणीं ढग आले तरी हवेंतील उष्णतेनें त्यांची फिरून वाफ होते. म्हणून अशा प्रदेशांतून मान्सून वारे वाहूनही फारसा पाऊस पडत नाहीं. सिंध व राजपुताना हे प्रदेश वालुकामय असल्यानें ते उन्हाळ्यांत फार तापतात; यामुळें तेथें पाऊस थोडा पडतो.

मान्सून वारे अडविण्यास गुजराथेंत फारसे पर्वत नाहींत; यामुळें त्या प्रदेशांत कोंकणापेक्षां पाऊस कमी पडतो; परंतु या वाऱ्यांतील बरीच वाफ शिल्लक राहिल्यामुळें गुजराथेच्या पूर्वभागांत सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेशापेक्षां जास्त पाऊस पडतो.

ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वाहाणारे मान्सून वारे आक्टोबरपासून मार्चपर्यंत वाहातात. ह्या वाऱ्यांपैकीं जे वारे समुद्रावरून किंवा मोठ्या जलसंचयावरून वाहातात, त्यांचे बरोबर ढग येतात. बंगालच्या उपसागरावरून वाहाणारे वारे अशांपैकीं होत. हे मद्रासच्या पूर्वकिनाऱ्याजवळील प्रदेशांतून वाहातात. यामुळें या प्रदेशांत नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत बराच पाऊस पडतो. या मान्सून वाऱ्यांतील बहुतेक ढगांचें घनीभवन होऊन पूर्वकिनाऱ्याजवळील प्रदेशांत पाऊस पडून गेल्यामुळें पूर्वघाटाचे पश्चि-

मेकडील प्रदेशांत त्यांपासून फारसा पाऊस पडत नाहीं. हिंदुस्तानांतील इतर भागांतून वाहणारे ईशान्येकडील मान्सून वारे समुद्रावरून आलेले नसतात, यामुळें ते बहुधा कोरडे असतात.

नैर्ऋत्येकडील मान्सूनचा पाऊस पूर्व किनाऱ्यावर कां पडत नाहीं व ईशान्येकडील मान्सूनचा पाऊस पश्चिम किनाऱ्यावर कां पडत नाहीं याचें कारण वरील गोष्टींवरून समजून येईल.

हिंदुस्तानच्या निरनिराळ्या भागांत किती पाऊस पडतो हें पावसासंबंधाचे आकृतींवरून कळून येईल.

**निरनिराळ्या प्रांतांतील पावसाचें प्रमाण पुढें दिल्याप्रमाणें आहे**–सिंध व कच्छ १० इंच*, पंजाब २२, राजपुताना २८, महाराष्ट्र व कर्नाटक ३०-३५, गुजराथ ३०-४५, मध्य हिंदुस्तान ४२, बहार ४३, ओरिसा ४७, मध्यप्रांत ५०, पूर्व बंगाल ४९, दक्षिण बंगाल ६६, कोंकण १००-१२५ इंच.

सह्याद्रीवर कित्येक ठिकाणीं २॥ शेंपासून ४ शें इंचांपर्यंत पाऊस पडतो. आसामांतील चेरापुंजी या ठिकाणीं ६ शें इंचांपर्यंत पाऊस पडतो.

**जेथें पाऊस दरवर्षी बहुतकरून पुरेसा पडतो असे प्रदेश**—पंजाबचा ईशान्य भाग, सर्व गंगाकांठ, आसाम व पूर्व बंगाल, सह्याद्रीचे पश्चिमेकडील व पूर्व घाटाचे पूर्वेकडील प्रदेश. पश्चिम किनारा व पूर्व किनारा यांस लागून असलेला प्रदेश, व बंगाल देश हे मान्सून वाऱ्यांच्या पहिल्या टप्प्यांत असल्यामुळें तेथें पाऊस पडत नाहीं असें कोणत्याही वर्षीं होत नाहीं. **जेथें पाऊस अनिश्चित आहे असे प्रदेश**—दख्खनचा बहुतेक ( ईशान्य भाग वर्ज करून ) भाग. **कमी पावसाचे प्रदेश**––सिंध, पंजाब, व राजपुताना.

---

* **इंच**—अमक्या ठिकाणीं अमुक इंच पाऊस पडतो याचा अर्थ असा कीं, त्या ठिकाणीं पडणारें पावसाचें पाणी कोठेंही वाहून न जातां, वाफ होऊन कमी न होतां, अथवा जमिनींत जिरून न जातां जेथच्या तेथेंच राहिलें असतें, तर तेथें तितके इंच खोलीचें पाणी सांचलें असतें.

## हिंदुस्तानच्या भिन्न भागांतील सुपीकपणा—

**उत्तरार्धांत**—गंगेच्या कांठचा प्रदेश फार सखल असून सपाट असल्यामुळें तो फार सुपीक आहे. त्याच्या इतका सुपीक प्रदेश हिंदुस्थानांत दुसरा नाहीं. सिंधूचे कांठचा बराच प्रदेश जरी सखल व सपाट आहे, तरी त्यांतील पुष्कळ भाग रेताड असल्यामुळें व त्यांत पावसाची कमतरता असल्यामुळें तो असावा तितका सुपीक नाहीं. या प्रदेशापैकीं उत्तरेकडील भाग म्हणजे पंजाब हा सुपीक आहे. सिंधु व गंगा या दोन नद्यांच्या कांठच्या उत्पन्नावर हिंदुस्तानांतील सुमारें निम्या लोकांचें पोषण होतें. *गंगेच्या कांठच्या कांहीं प्रदेशांत दरवर्षी दोन किंवा तीन पिकें काढतात. गंगेच्या पाण्याबरोबर जो गाळ आजपर्यंत वाहून आला आहे त्याची जाडी कलकत्यापाशीं ३०० फूट असल्याचें आढळून येतें.

**दक्षिणार्धांत**—गुजराथ सखल व सपाट असून त्यांत ३।४ नद्यांचे मुखांजवळील प्रदेश येत असल्यामुळें तो फार सुपीक आहे. पूर्व किनारा व पश्चिम किनारा यांस लागून असलेले प्रदेश जरी सखल आहेत, तरी ते सपाट नाहींत, म्हणून सुपीक नाहींत. पैकीं पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेशापेक्षां पूर्व किनाऱ्याजवळील प्रदेशांत उतार कमी असल्यामुळें तो जास्त सुपीक आहे. नदीचे मुखाजवळील प्रदेश सपाट व सखल असतो व त्यांत गाळाची दरवर्षी भर येऊन पडते;या कारणानें तो फार सुपीक असतो. म्हणून कावेरी, कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या मुखांजवळील प्रदेश चांगले सुपीक आहेत. तापीच्या कांठचा प्रदेश ( मुख्यतः खानदेश ) सखल व सपाट असल्यामुळें सुपीक आहे. **दख्खनमध्यें** जमीन जरी उंचवट्याची आहे, तरी ती फार उतरती नसल्यामुळें साधारण सुपीक

---

* गंगा व सिंधु यांच्या कांठचे प्रदेश असे सुपीक आहेत कीं, गंगेच्या मुखापासून तों सिंधूच्या मुखापर्यंत अगदीं मऊ मातीच्या [ कीं जींत एकही धोंडा आढळणार नाहीं अशा ] वाटेनें जावयाचें मनांत आणलें, तर तशी वाट काढतां येईल.

आहे. या प्रदेशांत पूर्वेकडे व आग्नेयीकडे जमीन जास्त सखल व सपाट होत जाते; म्हणून त्या भागांतील जमीन बरीच सुपीक आहे. मध्यप्रांत, निजामचें राज्य हे प्रदेश महाराष्ट्रापेक्षां जास्त सुपीक असण्याचें कारण हेंच होय.

खालीं लोकवस्तीचें प्रमाण दिलें आहे त्यावरून देश जों जों जास्त सुपीक असतो, तों तों त्यांतील लोकवस्तीचें प्रमाण जास्त असतें असें दिसून येईल—

**दर चौरस मैलास लोकसंख्येचें प्रमाण**—संयुक्त प्रांत ८ शें, बंगाल ५ शें, तंजावर ६ शें, गुजराथेंतील खेडा जिल्हा ४॥ शें, सुरत जिल्हा ३ शें, भडोच जिल्हा २ शें, पंजाब २। शें, मद्रास २॥ शें, मुंबई इलाखा १। शें राजपुताना ८०, राजपुतान्यांतील जेसलमीर संस्थान ७.

## पिकें—

[ तांदूळ, ज्वारी ऊर्फ जोंधळा, बाजरी, व गहूं हीं खाण्यांत येणारीं मुख्य धान्यें होत. पैकीं ज्वारी व बाजरी खाणारे लोक फार आहेत. तांदूळ खाणारे लोक लोकसंख्येच्या सुमारें एक चतुर्थांश आहेत.

**तांदूळ**—जेथें हवा उष्ण असून पावसाच्या किंवा कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा असतो अशा ठिकाणीं तांदूळ होतात. म्हणून पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेश, बंगाल इलाखा, संयुक्तप्रांत या देशांत तांदूळ पिकतात. **गहूं**—गव्हास कडक हिंवाळा लागतो. फार उष्णता व दमट हवा त्यास सोसत नाहीं. हिंदुस्तानच्या उत्तरार्धांत हिंवाळ्यांत थंडी पुष्कळ असते व हवा कोरडी असते; म्हणून या भागांत गहूं विशेष पिकतो. माळवा, राजपुताना, संयुक्तप्रांत, पंजाब, मध्यप्रांत हे गव्हाचे प्रदेश होत. बंगालप्रांत समुद्रास जवळ असल्यानें त्यांत हिंवाळ्यांत थंडी फार पडत नाहीं; म्हणून त्यांत गहूं फारसा पिकत नाहीं, **हरबरा, ज्वारी व बाजरी**—ज्या ठिकाणीं पाऊस फार पडतो व जेथें थंडी कमी अशा ठिकाणीं हीं धान्यें होत नाहींत. म्हणून असा साधारण नियम आहे कीं, ज्या प्रदेशांत पावसाचे पाण्यावर तांदूळ होतो त्या प्रदेशांत हीं

धान्यें होत नाहींत. या कारणानें तांदळाचा प्रदेश वर्ज करून बाकीच्या हिंदुस्तानच्या सर्व भागांत हीं पिकें होतात. मुंबई इलाख्यांत ज्वारी विशेष होते. **तूर**—समशीतोष्ण प्रदेशांत होते. जेथें थंडी अतिशय असते, तेथें ती होत नाहीं. म्हणून पंजाबांत हें पीक बहुधा होत नाहीं. **कापूस**—काळी जमीन, बेताचा पाऊस, उष्ण हवा या गोष्टी कापसास लागतात; वरच्यावर पाऊस पडल्यानें कापसाच्या पिकाचा नाश होतो. या सर्व गोष्टी गुजराथ, खानदेश, वऱ्हाड व दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशीं उपलब्ध आहेत. म्हणून या प्रदेशांत कापूस विशेष पिकतो. वऱ्हाड व मध्यप्रांत या देशांत कापूस फार पिकतो. हल्लीं कालव्याच्या पाण्यावर सिंधमध्यें चांगल्या प्रकारचा कापूस होऊं लागला आहे. **गळिताचीं * धान्यें**—उष्ण हवेच्या बहुतेक प्रदेशांत गळिताचीं धान्यें पिकतात. तथापि बंगाल्यांत यांचें फार मोठें पीक होतें. **जवस**—संयुक्त प्रांत व मध्यप्रांत यांमध्यें. **तीळ**—बंगाल व मद्रास इलाख्यांत. **ऊस**—कसदार जमीन व भरपूर पाणी या गोष्टी उसास आवश्यक आहेत. गंगेच्या कांठचा पाटणापर्यंतचा प्रदेश व ओरिसा यांमध्यें ऊस पुष्कळ पिकतो. थोडा ऊस मुंबई इलाख्यांत होतो. कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या मुखांजवळील जिल्ह्यांत ऊस पुष्कळ पिकतो. **ज्यूट**—याला जमीन विशेष कसदार लागते. जेथें दरवर्षी गाळाची भर जमिनीस पडते, अशा ठिकाणीं हें पीक होतें. अशी जमीन बंगाल्यांत आहे, म्हणून हा बंगाल्यांत होतो. **ताग व अंबाडी**—हीं मुंबई इलाख्यांत होतात. **नीळ**—गंगेच्या कांठचे प्रदेशांत नीळ पिकते. बंगाल व बहार प्रांत हे मुख्यतः निळीविषयीं प्रसिद्ध आहेत. थोडी नीळ मद्रास इलाख्यांत व गुजराथ आणि खानदेश या भागांतही होते. **अफू**—माळवा व बहार प्रांतांत पिकते. **चहा**—जेथें वारंवार पाऊस पडतो अशा व दमट परंतु मध्यम उष्ण हवेच्या प्रदेशांत चहा पिकतो. असे प्रदेश आसाम व हिमालयाच्या उतरणीवरील कांहीं प्रदेश हे होत. त्रावणकोरच्या कांहीं भागांत चहा पिकतो. सिलोनमध्यें पुष्कळ चहा होतो.

---

* ज्या धान्यांतून तेल काढतात त्यांस गळिताचीं धान्यें म्हणतात.

**कॉफी**—हिंदुस्तानांत ३ हजार फुटांपेक्षां जास्त उंचीच्या व दमट पण उष्ण हवेच्या प्रदेशांत कॉफी पिकते. कॉफीच्या झाडास पावसाचा झडिमार सहन होत नाहीं, म्हणून ती सह्याद्रीच्या पूर्व उतरणीवर चांगली होते. सह्याद्रीच्या दक्षिण भागाच्या व निलगिरीच्या उतरणींवर कॉफी विशेष होते. **तंबाकू**–उत्तर वहार, उत्तर सरकार व मद्रास इलाख्याचा आग्नेयीकडील भाग या प्रदेशांत तंबाकू होते. शेवटीं सांगितलेल्या भागांतील तंबाकू उत्तम असते. **सिंकोना**—हीं झाडें हिमालयाच्या उतरणीवर चहाचे मळ्यांत लावितात. यांपासून कोयनेल निघतें. **वेलदोडे**—कारवार जिल्हा व मलबार यांत पिकतात. **मिरीं**—मलबार प्रांतांत पिकतात. **इतर उद्भिज्ज पदार्थ**–**लाख** छोटानागपूर, आसाम व खानदेश यांत उत्पन्न होते.

## फळांचीं झाडें—

**नारळ**—ह्यांचीं झाडें समुद्राजवळच्या उष्ण हवेच्या प्रदेशांत वाढतात. म्हणून तीं हिंदुस्तानांत किनाऱ्याजवळील प्रदेशांतच आढळतात. त्यांतूनही पश्चिम किनाऱ्याजवळील प्रदेशांतच यांची उत्पत्ति विशेष आहे. समुद्रापासून १०० मैलांपलीकडे हीं झाडें होत नाहींत. **सुपारी**—दमट व साधारण उष्ण हवा या झाडांना मानवते; म्हणून सुपारीचें उत्पन्न पश्चिम किनाऱ्याजवळच्या प्रदेशांत व बंगाल्यांत होतें. **ताडाचीं झाडें**—ताडाच्या झाडांना कोरडी व उष्ण हवा लागते. त्यांना थंडी अगदीं सोसत नाहीं. म्हणून उत्तर हिंदुस्तानांत हीं झाडें होत नाहींत. तीं दक्षिण हिंदुस्तानांत किनाऱ्याजवळील प्रदेशांत होतात. **खजुरीचीं झाडें**—या झाडांना वाळवंटाचा प्रदेश, थोडें पाणी व कोरडी हवा या गोष्टी लागतात. म्हणून या गोष्टी ज्या प्रदेशांत आहेत त्या प्रदेशांत हीं होतात. असे प्रदेश काठेवाड, कच्छ, सिंध हे होत. **आंबा**—हिंदुस्तानच्या बहुतेक सर्व भागांत हीं झाडें होतात. **इतर फळें**—केळें, द्राक्ष, पेरू, डाळिंब, फणस, अननस, पोपई, नारिंग, संत्रें, खरबूज, कलिंगड इ०

## इमारतीच्या लाकडाचीं व इतर उपयोगी झाडें—

**साल ( शाल ) व देवदार**—हे वृक्ष थंड हवेंत वाढतात. म्हणून ते हिमालय पर्वतावरील जंगलांत व छोटानागपूरच्या जंगलांत आढळतात.

ह्या दोन्ही वृक्षांचीं लाकडें फार उपयोगी आहेत. **शिसव**—हिमालयांत उत्पन्न होणाऱ्या नद्यांच्या कांठीं हीं झाडें उगवतात. यांचें लाकूड फार उपयोगी आहे. **सागवान**—या झाडांस मुष्कळ पाऊस मानवतो; परंतु त्यांस थंड हवा सोसत नाहीं. म्हणून हीं झाडें मलबार व कोंकणपट्टी या भागांत आढळतात. या लाकडांत जें एक प्रकारचें तेल असतें त्यामुळें यास कीड लागत नाहीं; म्हणून हें लाकूड फार उपयोगी आहे. **बाभूळ**—हा अतिशय उपयोगी वृक्ष आहे. तो कोरड्या व उष्ण हवेंत उगवतो. यामुळें तो कोंकणांत होत नाहीं. तो अगदीं खडकाळ जमिनींतहीं उगवतो. म्हणून नापीक जमिनींतही हीं झाडें लावून कांहीं उत्पन्न काढितां येतें. **चंदन**—कोरड्या व मध्यम उष्ण हवेंत उगवणारा दुसरा वृक्ष चंदन होय. तो देशांत व विशेषतः म्हैसूर प्रांतांत आढळतो. **खैर**—बहुतेक सर्व ठिकाणीं–विशेषतः उत्तर हिंदुस्तानांत–हीं झाडें वाढतात. खैराचें लाकूड फार वळकट असतें. या लाकडापासून कात तयार करितात. **रबर**—रबराचीं झाडें आसामांत फार आहेत. **बांबू अथवा कळक**—हा अतिशय उपयोगी वृक्ष आहे. कळकांचा पुंजकाच्या पुंजका एके ठिकाणीं उगवतो, त्यास कळकाचें बेट म्हणतात. हा उष्ण व दमट हवेंत उगवणारा वृक्ष आहे. म्हणून तो देशावर फारसा होत नसून कोंकणांत होतो. **वड, चिंच, एबनी, लिंब** वगैरे इतर उपयोगी झाडें होत.

## प्राणी—

**हिंस्र प्राणी–सिंह** काठेवाडांत क्वचित् ठिकाणीं आढळतात. **वाघ**—हिंदुस्तानांत ज्या ज्या भागांत जंगल आहे त्या त्या बहुतेक भागांत वाघ आहेत. बंगाल्यांतील वाघ फारच मोठे व बलाढ्य आहेत अशी त्यांची प्रसिद्धि आहे. **तरस**—जेथें लांडगे नसतात अशा ठिकाणीं सामान्यतः तरस असतात. इतर हिंस्र प्राणी चित्ता, लांडगा, कोल्हा व खोकड हे होत. **वन्य** [ रानटी ] **पण अहिंसक प्राणी–गेंडा** बंगाल, ओरिसा व आसाम यांत आढळतो. रानटी गाढवें–कच्छमध्यें आढळतात. रानडुकरें, ससे व हरणें हिंदुस्तानच्या बऱ्याच भागांत आढळतात. **पाळींव जनावरें–हत्ती**–ज्या प्रदेशांत मोठीं जंगलें असून हवा साधारण उष्ण आहे अशा ठिकाणीं हत्ती आढळतात. म्हणून म्हैसूर प्रांतांत व हिमालयाचे पाय-

थ्याशीं असलेल्या जंगलांत ते आढळतात. **उंट**—सिंध व राजपुताना या प्रांतांत आढळतात. वाळवंटाच्या मैदानांत त्यांचा फार उपयोग होतो व असेच प्रदेश त्यांना मानवतात; म्हणून ते वरील प्रांतांत आढळतात. **घोडे**—काठेवाड व पंजाब या प्रदेशांत चांगल्या प्रकारचे घोडे तयार होतात. थंडी व चरावयास गवताचीं रानें ज्या प्रदेशांत असतात तेथें त्यांची उत्पत्ति विशेष होते. **बैल**—सर्वत्र आहेत. परंतु म्हैसूर, गुजराथ, आग्र्याचे आसपासचा प्रदेश व महाराष्ट्र यांतील बैल विशेष प्रसिद्ध आहेत. **बकरीं**—पंजाब, सिंध, राजपुताना, हैदराबाद व म्हैसूर हीं संस्थानें यांत विशेष आहेत. **म्हशी**—हिंदुस्तानच्या बहुतेक भागांत आहेत. काठेवाडांतील जाफराबादी म्हशी प्रसिद्ध आहेत. **इतर प्राणी—रेशमाचे किडे**—बंगाल्यांत. **जंगली रेशमाचे किडे**—बंगाल व मध्य प्रांत यांत आढळतात. त्यांपासून तस्सर किंवा कोशाचें रेशीम मिळतें. बहुतेक मोठ्या नद्यांत **सुसरी** असतात. हिंदुस्तानचे बहुतेक भागांत **विषारी सर्प** आढळतात.

हिंदुस्तान व ब्रह्मदेश या दोन देशांत मिळून सुमारें २५ हजार मनुष्यें व ५० हजार गुरें हिंस्र पशूंनीं मारलीं गेल्यामुळें किंवा साप चावून दरवर्षीं मरतात.

**पक्षी**—राघू, चिमणी, कावळा, मैना, पारवा, कबूतर, घार, बहिरीससाणा, गिधाड, मोर, कोंबडा, कोकिळ, बगळा इ० मुख्य पक्षी होत. मोर खेरीजकरून बाकीचे पक्षी हिंदुस्तानच्या सर्व भागांत आढळतात.

## खनिज संपत्ति--

**सोनें**--म्हैसूरचे नैर्ऋत्येकडील वायनाड जिल्ह्यांत व पूर्वेकडील कोलार जिल्ह्यांत सोन्याच्या मोठ्या खाणी आहेत. कोलार खाण सर्वांत मोठी होय. या खाणींतून १९०१ सालीं २ कोटींचें सोनें निघालें. **रुपें**—कच्छचे वायव्यभागीं सांपडतें. **तांबें**—अरवली पर्वताचे कांहीं भागांत, हिमालयाच्या पश्चिम भागाच्या पायथ्याशीं, मध्यप्रांतांत व बंगाल्यांत सांपडतें. **लोखंड**—बंगाल, ओरिसा, व मद्रासचा दक्षिण भाग यांत व मध्यप्रांतांतील फार मोठ्या प्रदेशांत लोखंड सांपडतें. मध्य प्रांतांतील लोखंडाच्या खाणी सुरू करण्याकरितां एक

कंपनी नुकतीच स्थापन झाली आहे. मद्रास इलाख्यांतील खाणींपासून उत्कृष्ट प्रकारचें लोखंड निघतें. हिंदुस्तानांतील बहुतेक डोंगरांत लोखंड कमीजास्त मानानें सांपडतें. ( अशुद्ध लोखंडाचे मातीपासून लोखंड काढण्यास चुनखडी व कोळसा यांची फार जरूरी असते. म्हणून ज्या खाणींजवळ हे जिन्नस उपलब्ध असतात, त्याच खाणी लोखंड काढण्याच्या उपयोगीं पडतात. अशी सोय हिंदुस्तानांत फार थोड्या ठिकाणीं आहे. ) **शिसें**—गुजराथेंतील पंचमहाल जिल्हा, रेवाकांठा एजन्सी, मद्रास इलाख्यांतील कर्नूल जिल्हा व त्रावणकोर संस्थान, मध्यप्रांत व बंगाल या ठिकाणीं सांपडतें. **हिरे**—बुंदेलखंडांतील पन्ना संस्थानांत सांपडतात. गोवळकोंड्याच्या खाणीची पूर्वीं प्रसिद्धि होती. परंतु तेथें आतां हिरे फारसे सांपडत नाहीत. हिंदुस्तानच्या बादशाहांचे मुकुटास कोहिनूर नांवाचा जो मोठा हिरा लाविला आहे, तो गोवळकोंड्याच्या खाणीत सांपडला असें म्हणतात. गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या मुखांजवळील भागांत कोठें कोठें हिरे सांपडतात.

**दगडी कोळसे**—मध्यप्रांत, बंगालचा पश्चिम भाग, आसाम या प्रदेशांत मुख्यतः सांपडतात. दगडी कोळशाच्या निरनिराळ्या खाणींचीं नांवें:—मध्यप्रांतांत मोहपाणी व वारोरा, निजामचे राज्यांत वर्धा व सिंगाराणी; बंगाल्यांत राणीगंज ( ही सर्वांत मोठी खाण होय ), गिरिधि, डाल्टनगंज, व झेडिया; संयुक्त प्रांतांत सोहागपूर व उमडिया; आसामांत माकुम, खाशी आणि जयंति टेकड्या. मुंबई इलाख्यामध्यें सिंध व कच्छप्रांत यांत कांहीं ठिकाणीं दगडी कोळसा सांपडतो. पंजाबांत डाहोट एथें व राजपुतान्यांत बिकानेर एथेंही कोळसा सांपडतो. सर्वांत मोठ्या खाणी बंगाल्यांतील असून त्या अनुक्रमें राणीगंज, झेडिया व गिरिधि या होत. **सोरा**—बंगाल व बहार प्रांत यांत सांपडतो. **मीठ**—पंजाबांत मिठाचे डोंगर आहेत, त्यांपासून दरवर्षीं सुमारें १ कोट खंडी मीठ काढतात. राजपुतान्यांतील सांबर सरोवरापासून व पश्चिम किनाऱ्यावर समुद्राचे पाण्यापासून मीठ काढितात. मॅन्गॅनीज धातूची माती विजगापट्टणाजवळ व मध्यप्रांतांत सांपडते. **अभ्रक**—छोटानागपूर प्रांतांत हजारीबागेजवळ आणि बंगाल व मद्रास इलाख्यांत सांपडतो.

**मोतीं**—सिलोनचे वायव्य भागीं व ईशान्य भागीं समुद्रांत मोतीं सांपडतात. काठेवाडजवळच्या समुद्रांतही थोडीं मोतीं सांपडतात.

## उद्योगधंदे, कारखाने वगैरे—

**शेतकी**—हिंदुस्तानांत सुपीक जमीन पुष्कळ ठिकाणीं असल्यामुळें या देशांतील लोकांचा मुख्य धंदा शेतकीचा आहे. शेंकडा ७० म्हणजे सुमारें दोन तृतीयांश लोक शेतकीवर उपजीविका करणारे आहेत.

[ हल्लीं बाजारांत दृष्टिस पडणाऱ्या कलाकौशल्याचे पदार्थांपैकीं बरेच पदार्थ विलायती असतात. यावरून असें वाटण्याचा संभव आहे कीं, कारागिरीचे पदार्थ पूर्वीपासूनच या देशांत फारसे होत नसावे; परंतु अशी स्थिति नाहीं. कलाकौशल्याचे पदार्थांविषयीं हा देश प्राचीनकाळापासून प्रसिद्ध आहे. १।२ शतकांपूर्वी या देशांतून बरेच कारागिरीचे पदार्थ युरोपांत जात असत. परंतु अलीकडे युरोपांतील देशांत विद्या व कला यांची वाढ फार झपाट्यानें झाल्यामुळें, कलाकौशल्यांत हिंदुस्तान देश मागें पडला आहे. हल्लीं युरोपांत बहुतेक माल यंत्रांच्या साह्यानें करतात. हीं यंत्रें ओतींव लोखंडापासून वाटेल तितकीं पुष्कळ, व वाटेल तितकीं मोठीं तयार करतां येतात, व तीं वाफ, वीज वगैरे शक्तींच्या साह्यानें चालतात. यामुळें वाटेल तितका माल थोड्या वेळांत तयार करण्याचे प्रचंड कारखाने काढणें युरोपांत सोपें झालें आहे. अशा एका कारखान्यांत हजारों माणसें असतात, आणि त्यामध्यें यंत्राच्या साह्यानें थोड्या श्रमानें माल तयार होत असल्याकारणानें तो फार स्वस्त पडतो.

पूर्वीं हिंदुस्तानांत वाफेचीं यंत्रें नसल्यामुळें वर सांगितलेल्या प्रकारचे मोठे कारखाने हिंदुस्तानांत नव्हते. एथील कारखाने, कारखान्याचा मालक व त्याचे हाताखालचीं १०।५ ( व क्वचित् प्रसंगीं शेंपन्नास ) माणसें यांनीं चालविलेले असत. तथापि या देशांतील कारागिरांस पूर्वींचे राजे व अमीरउमराव लोक यांचेकडून चांगला आश्रय मिळत असल्याकारणानें, या देशांत बहुतेक प्रकारचे

कारागीर असत, व ते अनेक प्रकारचे कलाकौशल्याचे पदार्थ करीत असत. मलमल, रेशमी कापड, चिटें, शालजोड्या, किनखाप वगैरे जिनसांसंबंधानें पूर्वी हिंदुस्तान देश फार प्रख्यात होता. परंतु अलीकडे युरोपियन लोक हे जिन्नस यंत्रांचे साह्यानें थोडके किंमतींत करूं लागल्यामुळें हे जिन्नस उत्पन्न करण्याचे हिंदुस्तानांतील बरेच कारखाने बंद पडले आहेत. याच कारणामुळें हिंदुस्तानांतील इतर कित्येक कारखानेही बुडत चालले आहेत. शेतकीच्या खालोखाल महत्त्वाचा असा हल्लीं विणकामाचा धंदा राहिला आहे.

तथापि पूर्वीपासून चालत आलेले धंदे कमी जास्त प्रमाणानें या देशांत सर्व ठिकाणीं दिसून येतात. अलीकडे पांचपन्नास वर्षांत या देशांतील लोकांनीं युरोपियन लोकांच्या पद्धतीवर मोठमोठे कारखाने व गिरण्या काढण्यास सुरवात केली आहे. ] †

---

† गिरणी किंवा मोठा कारखाना काढण्यास पुढील गोष्टी आवश्यक लागतात. ( १ ) जो माल तयार करावयाचा तो करण्यास लागणाऱ्या पदार्थांचा (कच्चा मालाचा) भरपूर पुरवठा; ( २ ) स्वस्त जळणाचा पुरवठा; ( ३ ) कारखान्यांत पैसे घालण्यास तयार असणारे श्रीमंत व धाडशी व्यापारी; व ( ४ ) तयार झालेला माल परदेशीं पाठविण्यास सोईचे खुष्कीचे मार्ग व जलमार्ग. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, ज्या शहराजवळ आगबोटीनें, होड्यांतून, किंवा आगगाडीनें कोळसा वगैरे जळण थोड्या खर्चांत येऊं शकतें अथवा ज्या शहरांजवळ दगडी कोळशांच्या खाणी असतात, व कारखान्यास लागणारा कच्चा माल ज्या प्रदेशांत पिकतो त्या प्रदेशाच्या समीप जीं शहरें असतात, त्यांत कारखाने काढणें सोईचें पडतें.

वर सांगितलेल्या गोष्टी ज्या मानानें अनुकूल असतील, त्या मानानें निरनिराळ्या प्रदेशांत कमी अथवा अधिक कारखाने असतात.

वर सांगितलेल्या गोष्टींपैकीं बहुतेक सर्व गोष्टी मुंबई व कलकत्ता या शहरांस इतर शहरांपेक्षां जास्त अनुकूल आहेत, म्हणून तेथें हिंदुस्तानांतील इतर शहरांपेक्षां गिरण्या व कारखाने अधिक आहेत.

**कापसाच्या गिरण्या—**

हिंदुस्तानांत ज्या मालाचा विशेष खप आहे, अशापैकीं कापसाचें कापड हा एक आहे. या मालाला लागणारा कच्चा माल जो कापूस तो मुंबईजवळचे प्रदेशांत पुष्कळ पिकतो. मुंबई हें बंदर विलायतेहून कोळसे आणणाऱ्या आगबोटींच्या वाटेवर असल्यामुळें तेथें दगडी कोळसा स्वस्त मिळतो. तेथें मोठे श्रीमंत व धाडशी व्यापारी आहेत. शिवाय मुंबईस तयार होणारा माल बाहेर नेण्यास व बाहेरचा माल मुंबईस आणण्यास आगगाड्या व जलमार्ग या दोहोंची सोय आहे. या कारणांमुळें मुंबईस कापसाच्या गिरण्या फार आहेत व मुंबईच्या खालोखाल अहमदाबादेस आहेत.

**इतर गिरण्या व कारखाने**—यांसंबंधानें प्रसिद्ध अशीं इतर शहरें कलकत्ता, नागपूर, कानपूर, मद्रास हीं होत. हिंदुस्तानांतील सर्व गिरण्यांची संख्या सुमारें अडीचशें आहे. पैकीं नुसत्या कापसाच्या गिरण्या २ शें आहेत. सर्व हिंदुस्तानांत कागदाच्या गिरण्या ९, लोकरीच्या ७, गोणपाटाच्या ३८, व रेशमाच्या ५ आहेत. कानपूर व मुंबई एथें व मद्रास इलाख्यांत कांहीं ठिकाणीं कमावलेलीं कातडीं तयार करण्याचे कारखाने आहेत. लोखंडाचे कारखाने बंगालमध्यें आहेत. कागदाच्या गिरण्या मुख्यतः मुंबई व बंगाल इलाख्यांत आहेत. मुंबई इलाख्यांत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत कापूस पुष्कळ पिकतो; यामुळें या इलाख्यांत कापसाच्या गिरण्यांची संख्या मोठी आहे. सर्व मुंबई इलाख्यांत कापसाचें कापड तयार करण्याच्या गिरण्या सवाशेंच्या वर आहेत. कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या गिरण्याही या इलाख्यांत पुष्कळ आहेत. बंगाल्यांत ज्यूट पिकतो, म्हणून ज्यूटपासून गोणपाट करण्याच्या सर्व गिरण्या बंगालमध्येंच–मुख्यतः कलकत्ता शहरीं–आहेत.

**लोकरीचें कापड**—पंजाब व काश्मीर, या देशांत हिंवाळ्यांत थंडी फार पडते, म्हणून तेथील लोकांस ऊबदार वस्त्रांची आवश्यकता विशेष आहे. या देशांतील डोंगराळ भागांत चराईचीं रानें पुष्कळ असल्याकारणानें तेथें मेंढरें पुष्कळ आहेत. त्यांपासून बरीच

लोकर मिळते. शिवाय या देशांचे आसपासचे देशांतही मेंढरें पुष्कळ असल्यामुळें त्या देशांतील लोकर या देशांत येते. यामुळें लोकरीचें कापड विणण्याचा उद्योग या भागांत विशेष आहे. काश्मीर व काश्मिरचे आसपासचे भागांत पश्मी जातीचीं जीं मेंढरें आहेत, त्यांची लोकर फार मऊ व तलम बारीक–असते. यामुळें त्या लोकरीचीं फार तलम वस्त्रें तयार करतां येतात. काश्मीर देशाची शालजोड्यांविषयीं फार प्राचीन काळापासून प्रसिद्धि आहे याचें कारण हेंच होय. हल्लीं पंजाबांत धारिवाल व दिल्ली एथें लोकरीचें कापड विणण्याच्या गिरण्या आहेत.

कानपूर हें शहर जरी संयुक्त प्रांतांत आहे, तरी तें लोकर उत्पन्न करणाऱ्या प्रदेशापासून जवळ आहे व लोकरीचे कारखान्यास अवश्य लागणारी वस्तु जें स्वच्छ पाणी त्याचा भरपूर सांठा शेजारच्या गंगा नदींत आहे, यामुळें तेथें लोकरीचें कापड विणण्याची मोठी गिरणी काढली आहे. श्रीनगर, अमृतसर व लुधियाना, हीं शहरें लोकरीच्या कापडाविषयीं प्रसिद्ध आहेत.

[ राजपुतान्यांतील कांहीं ओसाड भागांत मेंढरांना चरण्यापुरतें गवत असतें, म्हणून तेथील लोक मेंढरांचे कळप बाळगून राहातात. त्यांपासून बरीच लोकर निघते. शिवाय राजपुतान्यांत हिंवाळ्यांत थंडी फार असते. म्हणून राजपुतान्यांत कांहीं ठिकाणीं धाबळ्या तयार होतात. ]

**रेशमी कापड**—रेशमी कांठाचीं वस्त्रें वापरण्याचा हिंदूलोकांत बराच प्रघात आहे. म्हणून हिंदुस्तानच्या बहुतेक सर्व भागांत रेशीमकांठी वस्त्रें विणणारे लोक आहेत. थोडें रेशीम बंगालप्रांतांत उत्पन्न होतें; व हिंदुस्तानाबाहेरील ज्या चीन वगैरे देशांतून रेशीम हिंदुस्तानांत येतें, ते देश बंगाल व संयुक्तप्रांत यांस जवळ आहेत, यामुळें रेशमी वस्त्रें वरील प्रांतांत विशेष होतात. कद, पितांबर, वगैरेसंबंधानें काशी शहराची फार प्रसिद्धि आहे. मुर्शिदाबादही रेशमी कापडाविषयीं प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रांत येवलें व पैठण आणि गुजराथेंत अहमदाबाद हीं शहरें रेशमी वस्त्रांविषयीं प्रख्यात आहेत.

**हातमाग**–हिंदुस्तानचे बहुतेक सर्व भागांत हातमागावर कापड विणण्याचा धंदा चालू आहे. परंतु पूर्वी सांगितलेले कापूस पिकविणारे देश व त्यांच्या आसपासचे भाग यांत कापसाचें कापड विणणाऱ्यांची संख्या विशेष आहे. [ रेशीम व सूत यांच्या मिश्रणाचें गर्भसुती कापड, बंगाल्यांत फार होतें. ]

**धातु व धातूंचें सामान तयार करण्याचे कारखाने**—नित्य उपयोगांत लागणारे धातूंचे जिन्नस तयार करण्याचे कारखाने बहुतेक सर्व ठिकाणीं हिंदुस्तानांत आहेत. तथापि या कामासाठीं लागणारे तांबें, पितळ, लोखंड वगैरे धातु व त्यांचे पत्रे परमुलखांतूनच आणावे लागतात.

युरोपियन तऱ्हेनें चालविलेला लोखंड तयार करण्याचा मोठा कारखाना बंगालमध्यें आहे. व मध्यप्रांतांत लवकरच सुरू होणार आहे. जुन्या पद्धतीनें लोखंड काढण्याचे कारखाने क्वचित् ठिकाणीं आढळतात.

लोखंडाचें सामान तयार करण्याचे मोठे कारखाने हिंदुस्तानांत २५।३० आहेत.

**तांब्याचें काम**–याविषयीं काश्मीर देश प्रसिद्ध आहे.

[ **काचेच्या बांगड्या, मणि** वगैरे जिन्नस तयार करण्याचे कारखाने पूर्वी बरेच होते. परंतु चिनी व विलायती बांगड्या या देशांत येऊं लागल्यामुळें हे कारखाने कमी झाले आहेत. तथापि हल्लींही वायव्यप्रांत, पंजाब व गुजराथ या देशांत काचेचे कारखाने आहेत. काशीला जाणारे लोक ज्या काचेच्या कुप्यांतून गंगा आणतात, त्या कुप्या वायव्य प्रांतांतच तयार होतात. युरोपियन तऱ्हेचे काचेचे कारखाने अंबाला व लाहोर एथें आहेत. ]

[ **लाकडावरील खोदींव व कोरींव काम** हिंदुस्तानांत चांगल्या प्रतीचें होतें. याबद्दल अहमदाबाद, मच्छलीपट्टण हीं शहरें प्रसिद्ध आहेत. ]

[ **किरकोळ कारखाने**—त्रिचनापल्ली व दिंदीगल एथें तंबाकूच्या विड्या व चिरूट करण्याचे कारखाने आहेत. मंगळूर एथें विलायती कौलें करण्याचा मोठा कारखाना आहे. ]

**कलाकौशल्याचे पदार्थ**—लोक श्रीमंत असल्याशिवाय त्यांना चैनीचे किंवा कलाकौशल्याचे पदार्थ घ्यावेसे वाटत नाहींत. म्हणून ज्या देशांतील लोक संपन्न असतात, त्या देशामध्येंच असे पदार्थ विशेष तयार होतात. पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल, गुजराथ हे प्रांत सुपीक असल्यामुळें त्यांतील लोक सधन आहेत. शिवाय या देशांत पूर्वीं जीं मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं, त्यांचे राजे श्रीमान् व शोकी होते. यामुळें या देशांत कलाकौशल्याचीं कामें विशेष होतात. उंचीं वस्त्रें, कलाबतूचें काम, धातूंवरील व हस्तीदंतावरील नकशीचें काम यांविषयीं वरील देश जितके प्रसिद्ध आहेत, तितके हिंदुस्तानांतील इतर देश नाहींत. महाराष्ट्र देश व मद्रास इलाख्याचा बहुतेक भाग हे तितके सुपीक नसल्यामुळें या भागांतील लोक कमी संपन्न आहेत. यामुळें कलाकौशल्याचे कामांत हे देश इतर देशांच्या मागें आहेत. दिल्लीपासून लखनौपर्यंतचा प्रदेश सर्व हिंदुस्तानच्या कारागिरीचें आगर आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

अलीकडील हिंदू राजांपेक्षां मुसलमानी राजे जास्त शोकी व कलाकौशल्याचे भोक्ते होते. या कारणानें जेथें मुसलमानी राज्यें होतीं, तेथें कलाकौशल्य विशेष दृष्टीस पडतें. दिल्ली, आग्रा, लखनौ, मुर्शिदाबाद, अहमदाबाद वगैरे जीं जीं शहरें मुसलमान राजांच्या राजधान्या होतीं, तीं तीं कारागिरीच्या कामांविषयीं प्रसिद्ध आहेत.

हिंदूराजांच्या राजधान्यांपैकीं जयपूर, ग्वाल्हेर व पुणें हीं शहरें कलाकौशल्याविषयीं प्रसिद्ध आहेत.

**कारागिरीच्या कामांविषयीं प्रसिद्ध शहरें**—

**जरीचें कापड**—काशी, लखनौ, दिल्ली, बऱ्हाणपूर, पुणें, हैदराबाद, कोईमतूर, व डाका. जरीकांठी रुमाल व उपरणीं यांविषयीं मद्रास इलाख्यांतील कोईमतूर शहर प्रसिद्ध आहे. **गालिचे**—ज्या देशांत व ज्या देशाचे आसपास, लोकर उत्पन्न होते तेथेंच लोकरीचे गालिचे विशेष होतात, असें दिसून येतें. गालिच्यांविषयीं प्रसिद्ध देश पंजाब, वायव्यप्रांत, व सिंध हे होत. **सुती गालिचे व सतरंज्या** पुढील ठिकठिकाणीं होतात. जबलपूर, ग्वाल्हेर, कान·

पूर, व बहुतेक सरकारी तुरुंग. **जडावाचें काम व दागिनें**—दिल्ली, मीरत, त्रिचनापल्ली.

## दळणवळणाचीं साधनें—

( १ ) **आगगाडीचे रस्ते**—हिंदुस्तानच्या बहुतेक सर्व भागांत आगगाडीचे रस्ते झाले आहेत. आगगाडीच्या सर्व रस्त्यांची लांबी २७ हजार मैलांहून जास्त आहे. ( २ ) **साधे रस्ते**—घोड्याच्या गाड्या ज्यांवरून जातील असे प्रशस्त रस्ते पूर्वीं हिंदुस्तानांत फारसे नव्हते. साध्या गाड्या जाण्यायेण्याजोगेही रस्ते पूर्वीं बेताचेच होते. परंतु हल्लीं हिंदुस्तानच्या सर्व भागांत चांगले रस्ते झाले आहेत. या सर्व रस्त्यांची लांबी ५।६ लाख मैल भरेल. पैकीं ४० हजार मैल लांबीचे रस्ते खडी घालून तयार केलेले असून घोड्यांच्या गाड्यांना उपयोगीं पडण्यासारखे आहेत. अशा रस्त्यांपैकीं सर्व्यांत मोठा रस्ता कलकत्त्यापासून पेशावरापर्यंत गेलेला रस्ता होय. (३) **कालवे**—ज्यांतून होड्या व लहान गलबतें जाऊं शकतील असे कालवे हिंदुस्तानांत अनेक आहेत. त्या सर्वांची लांबी ३३ हजार मैल भरेल.

[ गंगा नदीच्या मुखापासून कानपुरापर्यंत, ब्रह्मपुत्रेच्या मुखापासून दांपरूपगडपर्यंत ( सुमारें ८०० मैलपर्यंत ), व सिंधु नदीच्या † मुखापासून अटकेपर्यंत गलबतें व आगबोटी जाऊं शकतात. ]

(४) **पोष्ट**—हिंदुस्तानांत दहा हजारांवर पोस्ट आफिसें असून त्यांतून रोज १८ लाख पत्रें पाठविलीं जातात. (५)**तारायंत्र**—सर्व तारायंत्राची लांबी ५० हजार मैलांहून अधिक आहे. रोज सरसरीनें २० हजार तारा पाठविल्या जातात.

वरील सर्व साधनांमुळें, प्रवास करणें, मालाची नेआण करणें, एका ठिकाणची बातमी दुसऱ्या ठिकाणीं पोहोंचविणें या गोष्टी फार सुलभ झाल्या आहेत.

[**आगगाडीचे रस्ते**—हिंदुस्तानांतील निरनिराळे मुख्य आगगाडीचे रस्ते पुढीलप्रमाणें होत.

---

† सिंधूच्या कांठानें आगगाडीचा रस्ता झाल्यामुळें व सिंधूचें पात्र जलप्रवासास विशेष सोईचें नसल्यामुळें अलीकडे सिंधूंतून आगबोटींचें जाणें-येणें बंद झालें आहे.


आयात माल
(१ चौरस = २ कोटी)
साखर.
यंत्रे
तेल.
दारू.
कपडे.
औषधे.
काच.
मसाले.
कागद.


निर्यात माल.
(१ चौरस २ कोट रु.)
कापूस, सूत व कापड.
ताग.
ज्यूट.
गहू.
अफू.
गोणपाट.
कातडीं.
चहा.
लाख.
कॉफी.
लाकूड.
नीळ.
तेल.




DECCAN PRINTING WORKS POONA CITY.


हिंदुस्तानांतील
शेहरांचा व
आगगाडीच्या रस्त्यांचा
नकाशा.
स्केल
१०० २००
बंगालच्या
समुद्र
मद्रास
मुंबई
पुणे
दिल्ली
आग्रा
बिकानेर
जोधपूर बिकानेर रेल्वे
हैदराबाद
उदेपूर
अहमदाबाद
उज्जनी
इंदूर
बडोदा
बऱ्हाणपूर
उमरावती
नागपूर
जेवलपूर
बेंगाल नागपूर रेल्वे
चांदा
रावळपिंडी
लाहोर
सिमला
विजापूर
हुबळी
गोवे
बंगलूर
म्हैसूर
मद्रास रेल्वे
निजाम
कलकत्ता
दार्जिलिंग
जगन्नाथपुरी
नॉर्थ वेस्टर्न रेल्वे
७०
७५
८०
२०

### रुंद रुळांचे रस्ते.

**नॉर्थ वेस्टर्न रेल्वे**–कराची व दिल्ली या शहरांपासून उत्तरेकडे व वायव्येकडे हिंदुस्तानचे सरहद्दीपर्यंत या कंपनीचे रस्ते गेले आहेत. **ईस्ट इंडिया रेल्वे**—दिल्लीपासून कलकत्त्यापर्यंत गंगेच्या दक्षिण बाजूनें हा रस्ता गेला आहे. **औऽध रोहिलखंड रेल्वे**–दिल्लीपासून काशीपर्यंत ह्या रेल्वेचे रस्ते गेले आहेत. **ईस्टर्न बंगाल रेल्वे**–कलकत्त्यापासून बंगालच्या पूर्व भागांत व उत्तरेस दार्जिलिंगपर्यंत या आगगाडीचे रस्ते गेले आहेत. **बंगाल नागपूर रेल्वे**–कलकत्त्यापासून नागपूर–जबलपूरपर्यंत व उत्तर सरकारांत विजगापट्टणपर्यंत या आगगाडीचे रस्ते गेले आहेत. **मद्रास रेल्वे** मद्रासपासून वायव्येकडे रायचूर, ईशान्येकडे वाल्टेअर, व नैर्ऋत्येकडे कालिकतपर्यंत गेली आहे. **ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे**–मुंबईपासून उत्तरेकडे दिल्लीपर्यंत, पूर्वेकडे जबलपूर व नागपूरपर्यंत, व आग्नेयीकडे रायचूर पर्यंत. **तापीव्हॅली रेल्वे**–जळगांवपासून सुरतपर्यंत. **मुंबई बडोदा व सेंट्रल इंडिया रेल्वे**–मुंबईपासून वढवाणपर्यंत. **ईस्ट कोस्ट रेल्वे**–वॉल्टेअरपासून कलकत्त्यापर्यंत.

### अरुंद रुळांचे रस्ते.

**बंगाल व नॉर्थ वेस्टर्न रेल्वे**–काशीचे पूर्वेस गंगेच्या उत्तरेकडील प्रदेशांत या आगगाडीचे रस्ते पसरले आहेत. **राजपुताना माळवा रेल्वे** अहमदाबादपासून राजपुतान्यांतून दिल्ली व आग्र्यापर्यंत. **जोधपूर बिकानेर रेल्वे**–सिंधमधील हैदराबादपासून राजपुतान्यांतील जोधपूर, बिकानेर इत्यादि शहरांपर्यंत. **भावनगर-गोंडल-जुनागड-पोरबंदर रेल्वे**—काठेवाडच्या निरनिराळ्या भागांत हे रस्ते पसरले आहेत. **सदर्न मराठा रेल्वे**–पुण्यापासून गोवा, विजापूर, मद्रास, म्हैसूर इकडे या रेल्वेचे फाटे गेले आहेत. **साऊथ इंडियन रेल्वे**—मद्रास शहरापासून दक्षिणेकडे मद्रास इलाख्याच्या दक्षिणभागांत या आगगाडीचे फाटे गेले आहेत. ]

[**आगगाड्यांचे उपयोग**—मनुष्यांची व मालाची त्वरित नेआण करण्यास आगगाडी विशेष उपयोगी आहेच. पण(१)एकाद्या ठिकाणीं

दुष्काळ पडला असता तेथें परठिकाणांहून धान्य नेऊन दुष्काळाचें उग्र स्वरूप कमी करण्यास, व ( २ ) बंड किंवा लढाई उपस्थित झाली असतां सैन्य ताबडतोब नेण्यास आगगाडीचा फार उपयोग होतो. भिन्न प्रदेशांतील लोकांत दळणवळण वाढवून त्यांच्यामध्यें प्रेमभाव वाढविण्यासही आगगाडी कारण होते. ]

[ सुपीक व दाट वस्तीच्या प्रदेशांत मालाची नेआण पुष्कळ होते. सपाट प्रदेश साधारणपणें सुपीक असतात, व तेथें रस्ते तयार करणें सोपें जातें म्हणून असा साधारण नियम आहे कीं, सुपीक व सपाट प्रदेशांत आगगाडीचे रस्ते पुष्कळ असतात. ]

### व्यापार—

हिंदुस्तानांतून दरवर्षी सुमारें १५० कोटी† रुपयांचा माल परदेशीं जातो; व १०० कोट रुपयांचा माल परदेशांतून हिंदुस्तानांत येतो.§ या दोन्ही जातींच्या मालाचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

[ हिंदुस्तानचा व्यापार इंग्लंड देशाशीं सर्वांत अधिक आहे. त्याच्या खालोखाल चीन देशाशीं. त्याच्या खालीं क्रमानें फ्रान्स, जर्मनी व अमेरिका ( अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें ) हे देश येतात. सुमारें ५ हजार जहाजें हिंदुस्तानच्या व्यापारांत गुंतलेलीं आहेत. ]

---

§ यांत सोनें, रुपें धरलें नाहीं. तें धरून आयात माल सुमारें १४० व निर्यात माल सुमारें १७५ कोटींचा आहे. हिंदुस्तानच्या आयात मालापेक्षां निर्यात मालाची किंमत ३०-४० कोटींनीं अधिक आहे. इतके रुपये दरवर्षी ह्या देशांत जास्त येतात असा याचा अर्थ नाहीं. हिंदुस्तानची राज्यव्यवस्था नियमित करणारें स्टेट सेक्रेटरीचें इंडिया ऑफिस इंग्लंडमध्यें आहे त्याच्या खर्चाकरितां, आगगाड्या कालवे यांच्या खर्चासाठीं, इंग्लिश लोकांपासून काढलेल्या कर्जाचे व्याजाकरितां, इंग्रज अधिकाऱ्यांचे पेन्शनकरितां व मालाची नेआण करणाऱ्या आगबोटींचे भाड्याकरितां बरीच मोठी रक्कम परदेशीं धाडावी लागते. शिवाय इंग्रज अधिकारी आपल्या पगारांतील शिल्लक आपल्या बरोबर देशीं घेऊन जातात. ही सर्व तूट भरून काढण्यास वरील ४० कोटींपैकीं बहुतेक पैसा खर्च होतो.

कलकत्ता, मुंबई व कराची हीं व्यापाराचीं मुख्य बंदरें आहेत. सर्व मालाचा एक तृतीयांश भाग मुंबई बंदरांतून व त्याहून थोडा अधिक कलकत्त्याचे बंदरांतून जातो. इतर बंदरें मद्रास व तुतिकोरिन हीं होत.

[ **निर्यात माल**—किंमतीच्या मानानें निर्यात मालाची ठोकळ प्रतवारी पुढीलप्रमाणें आहे.–कापूस, कापसाचें जाडेंभरडें कापड व सूत; तांदूळ व गहूं; ज्यूट; गळितांचीं धान्यें; अफू; चहा; कातडीं; नीळ; कॉफी; लोकर; लाख; मसाले; रेशीम; तेल; सोरा इ० ]

[ पंजाबांत मुख्य उत्पन्न गव्हाचें आहे. म्हणून पंजाबास नजीक जें कराची बंदर त्यांतून मुख्यतः गहूं रवाना होतो. माळवा व वऱ्हाड या प्रांतांस मुंबई बंदर जवळ आहे. म्हणून कापूस व अफू हीं मुंबई बंदरांतून विशेष रवाना होतात. गोणपाट, नीळ, व चहा हे पदार्थ कलकत्त्याचे आसपासचे प्रदेशांत पिकतात. म्हणून हे पदार्थ कलकत्त्याचे बंदरांतून विशेष रवाना होतात. ]

[ **आयात माल**—परदेशांतून हिंदुस्तानांत येणाऱ्या मालाची किंमतीप्रमाणें ठोकळ प्रतवारी पुढीलप्रमाणें आहे. कापसाचें कापड व सूत; सोनें व रुपें; धातु, धातूंचे पत्रे व इतर सामान; साखर; राकेल; लोकरीचें कापड; रेशीम; दारू; कपडे; औषधें व रासायनिक पदार्थ; काच; मसाले; कागद; आगगाडीचें सामान.........इ० ]

**सरहद्दीवरील प्रदेशांशीं व्यापार**—अफगाणिस्तान, बलुचिस्तान, इराण व तिबेट या देशांशीं हिंदुस्तानचा थोडासा व्यापार होतो. [ **निर्गत माल**—कापसाचें व इतर कापड, धातूंचीं भांडीं, चहा, मीठ, धान्य, साखर, नीळ व इतर रंग, तंबाकू व मसाले. **आयात माल**—तूप, घोडे, मेंढरें, उंट, फळें, लाकूड, लोकर, कातडीं, हिंग, औषधें.........इत्यादि. ]

हिंदुस्तानचा परदेशांशीं होणारा व्यापार बहुधा इतर लोकांचेच हातीं आहे. २॥ हजार वर्षांपूर्वी हिंदू लोक व्यापाराकरितां आफ्रिका, अरबस्तान, ब्रह्मदेश वगैरे देशांस जात असत. परंतु त्यानंतर त्यांनीं समुद्रपर्यटन करण्याचें सोडून दिलें, व हा व्यापार हळू

हळू ग्रीक व अरब लोकांचे हातीं गेला. हल्लीं तो मुख्यतः युरोपियन लोकांचे हातीं आहे.

[ प्राचीनकाळीं बंगाल्यांतील विजयराजानें सिंहलद्वीप जिंकलें व तेलंगणांतील लोकांनीं ब्रह्मदेशांतील पेगू देशांत व मलाया द्वीपसमूहांतील जावा, वाली या बेटांत वसाहती केल्या; यावरून पूर्वींचे हिंदू लोकांत जलपर्यटन निषिद्ध नव्हतें असें दिसून येईल.

**बंदरांचा व्यापार**—कलकत्ता १०० कोट, मुंबई १००, कराची २५, मद्रास १२, तुतिकोरिन ३. ]

**आयात व निर्यात मालाचें स्वरूप**—हिंदुस्तानच्या निर्यात मालांत कारागिरीचे किंवा कौशल्याचे पदार्थ फारसे नाहींत. निर्यात माल बहुतेक कच्च्या मालाच्या जातीचा असतो. तयार केलेल्या मालापैकीं महत्वाचा निर्यात माल कापसाचें सूत, कापड व गोणपाटाचीं पोतीं हा होय. हिंदुस्तानच्या आयात मालांत पक्का माल विशेष असतो. कच्चा माल परदेशांतून हिंदुस्तानांत फारसा येत नाहीं.

**हिंदुस्तानांत येणारा माल कोणकोणत्या देशांतून येतो त्याचा तपशील**—

( ही माहिती पाठ करण्याची आवश्यकता मुळींच नाहीं. तिजमधील महत्त्वाचा भाग प्रसंगानुसार सांगत जावें. )

[ **कापसाचें कापड**–इंग्लंड, बेलजियम, ऑस्ट्रिया, हंगेरी, फ्रान्स, इताली. **लोकरीचें कापड**–इंग्लंड, जर्मनी, बेलजियम, हालंड. **रेशमी कापड**–चीन, जपान, फ्रान्स, इताली, इंग्लंड. **रेशीम**–चीन, जपान, इराण, स्ट्रेट सेटल्मेंट्स. **लोकर**–इराण. **सूत**–इंग्लंड, स्कॉटलंड, ऑस्ट्रिया. **सोनें**–आफ्रिका, चीन. **रुपें**–इंग्लंड, अमेरिका, चीन. **लोखंड, पोलाद व त्यांपासून होणारे सामान**–इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, बेलजियम. **चाकू, कात्र्या, सुया वगैरे**–इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया. **यंत्रें**–इंग्लंड, अमेरिका, जर्मनी. **साखर**–ऑस्ट्रिया, मॉरिशस, जर्मनी, फ्रान्स. **कोळसा**–इंग्लंड. **राकेल**–रशिया, अमेरिका, ब्रह्मदेश. **कांच**–ऑस्ट्रिया, जर्मनी, इटली, इंग्लंड, फ्रान्स. **औषधें व रासायनिक द्रव्यें**–इंग्लंड, जर्मनी. **दारू**–स्कॉटलंड, आय-

लँड, जर्मनी, इराण. **मीठ**–इंग्लंड, इराण, अरबस्तान, जर्मनी. **चहा**–चीन, इंग्लंड. **कॉफी** (विशेषतः दळलेली.)–इंग्लंड, फ्रान्स. **मसाले**–ईस्ट इंडिज, पूर्व आफ्रिका, सिलोन, स्ट्रेट सेटल्मेंट्स. **सुपारी**–सिलोन. **तंबाकू व विड्या**–इंग्लंड, अमेरिका, इजिप्त. **घोडे**–इराण, अरबस्तान, तुर्कस्तान, आस्ट्रेलिया. **रंग**–जर्मनी. **हस्तिदंत**–आफ्रिका. **मोतीं**–इराण, अरबस्तान. **कागद**–ऑस्ट्रिया, इंग्लंड. **घड्याळें**–स्वित्झर्लंद, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका. **पोंवळीं**–इताली. **केशर**–फ्रान्स. **आगपेट्या**–स्वीडन, ऑस्ट्रिया, जपान. **कापूर**–जपान. **फटाकडे, दारू वगैरे**–चीन.

## लोकवस्ती व लोकांच्या जाती––

हिंदुस्तानची लोकसंख्या सुमारें २८ कोट आहे. [ ही लोकसंख्या मुंबई इलाख्याच्या लोकसंख्येच्या ११ पट व मुंबई शहराच्या तीनशें पट आहे. लोकसंख्येपैकीं हिंदू २० कोट, मुसलमान ६ कोट, ख्रिस्ती पाव कोट, शीख २० लाख, जैन १५ लाख, बुद्धधर्मी ३ लक्ष, पार्शी ९४ हजार व यहुदी § १३ हजार आहेत. ]

[ लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलास सुमारें १८८ आहे. हें प्रमाण अर्थात् कांहीं ठिकाणीं कमी व कांहीं ठिकाणीं अधिक आहे. सिंधमध्यें हें प्रमाण दर चौरस मैलीं ७० व बंगालचा कांहीं भाग व संयुक्तप्रांत यांत ४ शें पासून ८ शें पर्यंत आहे. ]

कोळी, भिल्ल, महार वगैरे लोक हिंदुस्तानांतील मूळचे रहिवासी होत. त्यांस हल्लींच्या हिंदूंच्या पूर्वजांनीं जिंकिलें. जिंकणाऱ्या हिंदू लोकांनीं सुपीक प्रदेशांत वसाहत केली, व मूळचे रहिवासी लोक डोंगराळ प्रदेशांत जाऊन राहिले. भिल्ल, कोळी वगैरे लोकांची वस्ती डोंगराळ प्रदेशांत आहे याचें कारण हेंच आहे.

हिंदूंच्या पूर्वजांच्या आर्य व द्रविड अशा दोन जाती होत्या. पैकीं द्रविड लोक आर्यांचे पूर्वी बरीच वर्षे हिंदुस्तानांत आले होते. त्यांना आर्यांनीं जिंकलें, परंतु ते लोक आर्यलोकांशीं मिसळले. मुंबई इलाख्याच्या अगदीं दक्षिणेकडील भागांत (कर्नाटकांत) व मद्रास इलाख्यांत हल्लीं जे हिंदू आहेत ते या द्राविड लोकांचे वंशज

§ यांची वस्ती मुंबई, कुलाबा जिल्हा व कोचीन एथें मुख्यतः आहे.

होत. ते वर्णानें बहुधा काळे असतात. बाकीचे हिंदू लोक आर्य लोकांचे वंशज आहेत.

[ सुमारें ८ व्या शतकापासून मुसलमान लोक हिंदुस्तानावर स्वाऱ्या करूं लागले. पुढें त्यांनीं हिंदुस्तानांत राज्य स्थापन करून १८ व्या शतकापर्यंत राज्य केलें. या कारणानें हिंदुस्तानांत मुसलमानांची वस्ती झाली. मुसलमानी राज्यें मुख्यतः पंजाबांत व गंगेच्या कांठच्या प्रदेशांत होतीं. म्हणून या प्रदेशांत त्यांची वस्ती विशेष आहे. मुसलमान लोक वायव्येकडून हिंदुस्तानांत शिरून पूर्वेकडे व दक्षिणेकडे हळू हळू पसरत गेले. यामुळें हिंदुस्तानांत जों जों उत्तरेकडे व वायव्येकडे जावें, तों तों त्यांची वस्ती अधिकाधिक आढळते. ]

[ पार्शी लोकांचा मूळ देश पर्शिया किंवा इराण होय. त्यांनीं मुसलमानी धर्म घ्यावा म्हणून त्यांच्यावर मुसलमान लोक जुलूम करूं लागले; या कारणानें ते तेथून पळून ८ व्या शतकांत हिंदुस्तानांत आले. ]

**धर्म**—हिंदू, मुसलमान, बौद्ध, शीख, जैन, पार्शी, ख्रिस्ती, इझ्राएली [ यहुदीलोकांचा ] हे हिंदुस्तानांतील मुख्य धर्म होत.

## भाषा—

हिंदुस्तानांतील निरनिराळे लोक शंभरांहून अधिक निरनिराळ्या भाषा बोलतात. त्यांपैकीं पुढील १२ महत्त्वाच्या आहेत. त्या येणेंप्रमाणें—

संस्कृत भाषेपासून निघालेल्या भाषा.

| भाषेचें नांव. | ती बोलणारांची संख्या. | ती ज्या ठिकाणीं बोलतात तो प्रदेश. |
|---|---|---|
| हिंदी | ८ कोट | राजपुतान्यापासून बंगालपर्यंत. |
| बंगाली | ४॥ कोट | बंगाल इलाखा. |
| मराठी | २ कोट | महाराष्ट्र देश. |
| पंजाबी | २ कोट | पंजाब इलाखा. |
| गुजराथी | १। कोट | गुजराथ. |
| उरीय | १ कोट | ओरिसा प्रांत. |
| सिंधी | ३० लक्ष | सिंध प्रांत. |
| आसामी | १५ लक्ष | आसाम. |

| | | | |
|---|---|---|---|
| द्राविडी भाषा. | तेलगू किंवा तेलंगी. | २ कोट | मद्रासपासून ओरिसा-पर्यंत मद्रास इला-ख्याचा भाग. |
| | तामिल ऊर्फ द्रविडी | १॥ कोट | मद्रास शहराच्या दक्षि-णेस मद्रास इलाख्याचा पूर्व भाग. |
| | कानडी | १ कोट | दक्षिण महाराष्ट्र व म्हैसूर. |
| | मल्याळी. | अर्ध कोट | मलबार देश. |

हिंदी व फारशी या भाषांपासून झालेली हिंदुस्तानी ऊर्फ उर्दू † भाषा उत्तर हिंदुस्तानांतील बरेच लोक व हिंदुस्तानच्या इतर भागांत राहणारे मुसलमान लोक बोलतात. हिंदुस्तानांतील सर्व लोकांना साधारण अशी भाषा हीच होय.

मध्यप्रांतांतील गोंड लोक गोंड भाषा बोलतात.

## शिक्षण—

इंग्लिशांचें राज्य होण्यापूर्वीं सर्व जातींच्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था हिंदुस्तानांत नव्हती. परंतु हल्लीं सर्वांना शिक्षण मिळावें अशीं सोय सरकारानें केली आहे व दिवसेंदिवस शिक्षणाचा प्रसार हिंदुस्तानांत होत चालला आहे. हल्लीं पुरुषांमध्यें शेंकडा ११ पुरुषांस व बायकांमध्यें १५० पैकीं एकीस लिहितां वाचतां येतें. पूर्वीं हें प्रमाण फार थोडें होतें. शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४०।५० लाख आहे. अलीकडे धंदेशिक्षणाकडे सरकार जास्त लक्ष देऊं लागलें आहे.

**सरकारी वसूल**—[ हिंदुस्तानचा वसूल एक अब्जाहून थोडा

---

† उर्दू=छावणी अथवा फौजेचा तळ. जे मुसलमान लोक पूर्वीं हिंदुस्तानांत आले, ते फारशी भाषा बोलत असत. छावणीमध्यें हिंदू नोकरांशीं बोलतांना त्यांचे हिंदी शब्द ऐकण्याचा मुसलमानांना, व मुसलमानांशीं बोलतांना त्यांचे फारशी शब्द ऐकण्याचा हिंदूंना प्रसंग येऊन, दोन्हीं भाषांच्या मिश्रणापासून जी भाषा बनली तिला छावणीची भाषा अथवा उर्दू भाषा असें नांव पडलें.

अधिक आहे. पैकीं एक चतुर्थांश साऱ्यापासून व एक चतुर्थांश आगगाड्यांपासून उत्पन्न होतो. अफूचें उत्पन्न ८ कोट आहे.]

[ खर्च—एकंदर खर्च उत्पन्नाइतकाच आहे. पैकीं, एक चतुर्थांश सैन्यासाठीं, एक चतुर्थांश आगगाड्यांसाठीं व एक चतुर्थांश सरकारी कामगारांच्या पगारासाठीं व एक चतुर्थांश इतर कामांसाठीं खर्च होतो.]

## विभाग—

**ब्रिटिश हिंदुस्तान**—[ राजकीय विभागांचें क्षेत्रफळ, लोकसंख्या वगैरे— ]

| प्रांताचें नांव. | क्षेत्रफळ (हजार चौ० मैल.) | लोकसंख्या (लाख.) | दर चौरस मैलीं लोकसंख्येचें प्र० |
|---|---|---|---|
| पंजाब इलाखा | ९७ | २०३ | २०९ |
| वायव्य सरहद्दीवरील प्रांत | १६ | २१ | १२९ |
| संयुक्त प्रांत | १०७ | ४७७ | ४४६ |
| बंगाल प्रांत | ११० | ५०७ | ४६० |
| पूर्व बंगाल व आसाम | १०१ | ३०५ | ३०० |
| अजमीर-मेरवाडा | २॥ | ५ | १७६ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | १०४ | १२६ | १२१ |
| मुंबई इलाखा | १२३ | १८५ | २०१ |
| मद्रास इलाखा | १४१ | ३८२ | २६९ |
| कुर्ग प्रांत | १॥ | २। | ११५ |

**† संस्थानें**—

| संस्थानाचें नांव. | क्षेत्रफळ हजार. चौ० मैल | लोकसंख्या (लाख.) | दरचौरसमैलीं लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| हैदराबाद. | ८२ | १११ | १३४ |
| म्हैसूर. | २९ | ५५ | १९२ |

† हिंदुस्तानांतील संस्थानांपैकीं क्षेत्रफळ व लोकसंख्या यांनीं सर्वांत मोठें संस्थान हैदराबाद होय. अतिशय दाट लोकवस्तीचें मोठें संस्थान बडोदें होय. अतिशय विरळ वस्तीचें संस्थान राजपुतान्यांतील जेसलमीर होय.

| | | | |
|---|---|---|---|
| काश्मीर. | ८० | २९ | ३५ |
| बडोदें. | ८ | १९ | २४१ |
| पंजाबांतील संस्थानें. | ३६ | ४४ | १२१ |
| संयुक्तप्रांतांतील संस्थानें. | ५ | ८ | १५८ |
| दोन्ही बंगालमधील संस्थानें. | ३८ | ३७ | ९७ |
| राजपुतान्यांतील संस्थानें. | १२७ | ९७ | ७६ |
| मध्यप्रांतांतील संस्थानें. | २९ | २० | ६८ |
| मध्यहिंदुस्तानांतील संस्थानें. | ७९ | ८६ | १०९ |
| मुंबई इलाख्यांतील संस्थानें. | ६५ | ६९ | १०५ |
| मद्रास इलाख्यांतील संस्थानें. | १० | ४२ | ४२० |

## परदेशी राजांच्या ताब्यामधला मुलूख—

**फ्रेंचांचा मुलूख**–चंद्रनगर ( कलकत्त्याजवळ हुगळीचे कांठीं ), यानान ( गोदावरीचे मुखाजवळ ), कारिकल, पाँडिचरी, व माही, हीं शहरें व त्यांच्या आसपासचा मुलूख. हीं सर्व ठिकाणें हिंदुस्तानचे किनाऱ्यानजीक आहेत. हा सर्व प्रदेश मिळून २०० चौ० मैल असून उत्पन्न ३ लक्ष आहे. सर्व मुलूख एका गव्हर्नरचे ताब्यांत आहे. गव्हर्नर पाँडिचरी एथें राहातो.

**पोर्तुगीजांचा मुलूखः**–दीव बेट ( काठेवाडचे दक्षिणेस ), दमण व गोवें. हीं सर्व ठिकाणें हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर आहेत. सर्व प्रदेश मिळून ११ शें चौ० मैल आहे. लोकसंख्या ४॥ लाख. सर्व प्रदेशावरील अधिकारी गव्हर्नर जनरल असून तो गोवा एथें राहातो. गोव्याजवळ बांधलेलें पणजी अथवा नवा गोवा शहर मध्यम प्रतीचें बंदर आहे.

## राज्यव्यवस्था—

मुंबई व मद्रास हे इलाखे गव्हर्नरांचे ताब्यांत आहेत. पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल, पूर्वबंगाल आणि आसाम हे प्रांत लेफ्टनंट (दुय्यम) गव्हर्नरांचे ताब्यांत आहेत. मध्यप्रांत, वायव्य सरहद्दीवरील प्रांत, अजमीर–मेरवारा, व कुर्ग प्रांत यांपैकीं प्रत्येक प्रांत चीफ कमिशनरचे ताब्यांत आहे.

जो प्रांत इलाख्यापेक्षा लहान असतो त्याचे भाग करून त्यांवर कमिशनर नेमतात व त्या सर्वांवर मुख्य कमिशनर नेमतात. §

**एतद्देशीय संस्थानें**—लहान मोठीं मिळून ६१७ शें संस्थानें हिंदुस्तानांत आहेत. पैकीं साधारण मोठीं संस्थानें सुमारें २०० आहेत. हिंदुस्तानचा एक तृतीयांश भाग संस्थानिकांचे ताब्यांत आहे. काश्मीर, बडोदें, ग्वाल्हेर, इंदूर, हैदराबाद व म्हैसूर हीं हिंदुस्तानांतील मोठीं संस्थानें होत. नेपाळ व भूतान हीं संस्थानें स्वतंत्र आहेत. जेथें अनेक संस्थानें शेजारीं शेजारीं असतात, अशा ठिकाणीं सर्व संस्थानांवर देखरेख करण्याकरितां एक अधिकारी नेमतात. त्यास गव्हर्नर जनरलचा एजंट ( प्रतिनिधि किंवा मुखत्यार ) म्हणतात. या एजंटाशीं संबंध असणाऱ्या सर्व संस्थानांस मिळून **एजन्सी** म्हणतात. राजपुतान्यांतील सर्व संस्थानें मिळून राजपुताना एजन्सी, व मध्य हिंदुस्तानांतील सर्व संस्थानें मिळून सेंट्रल ( मध्य ) इंडिया एजन्सी असे भाग केलेले आहेत. राजपुताना एजन्सी, मध्य हिंदुस्तान एजन्सी, व काश्मीर, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, हैदराबाद, व म्हैसूर हीं संस्थानें खुद्द गव्हर्नर जनरलचे देखरेखीखालीं आहेत. इतर संस्थानें त्या त्या प्रांतांवरील व इलाख्यांवरील मुख्य अधिकाऱ्यांचे ताब्यांत असतात. मोठ्या संस्थानांत **रेसिडंट** नांवाचा इंग्लिश सरकारचा अधिकारी असतो. हैदराबाद, म्हैसूर, काश्मीर, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, मेवाड, व जयपूर या संस्थानांत इंग्लिश सरकारचा रेसिडंट आहे.

कमिशनर, लेफ्टनंट गव्हर्नर व गव्हर्नर या सर्वांवरील अधिकारी **गव्हर्नर जनरल** ( मुख्य गव्हर्नर ) होय. त्याचा **गव्हर्नर जनरल व व्हाइसराय** ( राजाचा प्रतिनिधी ) **ऑफ इंडिया** अशा दुहेरी किताबानेंही कधीं कधीं उल्लेख करितात. तो एरवीं कल-

§ **सिलोन बेट** निराळ्या गव्हर्नराचे ताब्यांत आहे. त्यावर हिंदुस्तानच्या गव्हर्नर जनरलचा ताबा नाहीं. **ब्रह्मदेश**—हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरलचे ताब्यांत आहे. पण भूवर्णनदृष्ट्या त्या देशाचा संबंध हिंदुस्तानाशीं नसल्यामुळें त्याविषयीं माहिती एथें दिली नाहीं.

करयास राहातो, व उष्ण हवेच्या दिवसांत हिमालयांतील सिमला या थंड हवेच्या शहरीं राहतो.

विलायतेंतील प्रधानमंडळामध्यें **हिंदुस्तानचा स्टेट सेक्रेटरी** म्हणून एक अधिकारी असतो. त्याचे मदतीस एक कौन्सिल असतें. या कौन्सिलच्या साहाय्यानें स्टेट सेक्रेटरी हिंदुस्तानच्या राज्यकारभाराची दिशा ठरवितो. त्याच्या सल्ल्यानें गव्हर्नर जनरल हिंदुस्तानचा राज्यकारभार करितो. गव्हर्नर जनरलचे मदतीस दोन कौन्सिलें असतात. पैकीं एका कौन्सिलाचें काम कायद्याची अमलबजावणी करण्याचें आहे. या कौन्सिलचे सभासदांमध्यें निरनिराळीं खातीं वांटून दिलेलीं असतात. दुसऱ्या कौन्सिलाचें काम कायदे करण्याचें आहे. पहिल्या कौन्सिलचे सर्व सभासद या दुसऱ्या कौन्सिलचे सभासद असून शिवाय कांहीं सरकारानें नेमलेले व कांहीं लोकांनीं निवडलेले मिळून एकंदर साठावर ( ६७ ) या कौन्सिलचे सभासद असतात.

मुंबई व मद्रास या इलाख्यांचे गव्हर्नर, कायदे करणारें कौन्सिल व अमलबजावणी करणारें कौन्सिल अशा दोन कौन्सिलांचे साहाय्यानें राज्यकारभार करितात. बंगाल, पूर्व बंगाल, संयुक्तप्रांत व पंजाब या प्रांतांवरील ले० गव्हर्नरांचे मदतीस फक्त कायदे करणारें कौन्सिल असतें. चीफ कमिशनरांचे मदतीस कौन्सिल मुळींच नसतें व त्यांचा अधिकार ले० गव्हर्नरपेक्षां पुष्कळ कमी असतो. परंतु मध्यप्रांत हा मोठा विभाग असल्यामुळें, त्यावरील मुख्य कमिशनरास जवळ जवळ ले० गव्हर्नरचे अधिकार आहेत.

हिंदुस्तान देश इंग्लंडचे ताब्यांत आहे. इंग्लंडचे हल्लींचे राजे **पांचवे जॉर्ज** हेच हिंदुस्तानचे बादशाहा होत. त्यांना हिंदुस्तानचे बादशाहा या नात्यानें **केसर-इ-हिंद** [ केसर=बादशाहा, इ=चे ( षष्ठीचा प्रत्यय ), इ-हिंद=हिंदुस्तानचे ] असा किताब आहे.

**संस्थानें**—पंजाबांत एकंदर ३४ संस्थानें आहेत. त्यांपैकीं बहुतेक शीख राजांच्या ताब्यांत आहेत. भावलपूर संस्थान क्षेत्रफळानें सर्वांत मोठें असून तें एका नवाबाच्या ताब्यांत आहे. शीख संस्थानांपैकीं **पतियाला, नाभा, झिंद, कपुरथळ, मंडी, फरिदकोट** हीं मुख्य होत.

[**इतिहास**—या प्रांताचा वहुतेक भाग प्रसिद्ध शीख राजा रणजितसिंग याचे वंशजांपासून इंग्लिशांनीं सुमारें ६० वर्षांपूर्वी जिंकून घेतला.]

## २ वायव्य सरहद्दीवरील प्रांत.

या प्रांताचा पश्चिम भाग डोंगराळ असून त्यांत खैबर खिंड आहे. **हवा**—या प्रांतांत पाऊस थोडा पडतो व प्रदेश उंचवट्याचा आहे, यामुळें हवा कोरडी व थंड आहे. या प्रांतांतील डोंगराळ प्रदेशांत राहाणारे लोक वरचेवर वंडें करीत असतात.

**शहरें**—**पेशावर** (८४)—हें या प्रांताचें मुख्य शहर आहे. खैबर खिंडीचे तोंडासमोर हें शहर असल्यामुळें हें मोठें महत्त्वाचें लष्करी ठाणें आहे. गोमल नदी व सिंधु यांचे संगमाजवळ **डेरा इस्माइलखान** हें एक लष्करी ठाणें आहे. चित्रळ खिंडीचे तोंडाशीं असलेलें **चित्रळ** हें ठिकाण खिंडीचें रक्षण करण्यास उपयोगी आहे, म्हणून तें महत्त्वाचें आहे.

**इतिहास**—हिंदुस्तानची वायव्य सरहद्द विशेष महत्त्वाची आहे, व सरहद्दीच्या प्रदेशाची व्यवस्था गव्हर्नर जनरलाचे देखरेखीखालीं असणें अवश्य आहे; म्हणून हा प्रांत १९०१ सालीं पंजाब इलाख्यापासून निराळा केला. पंजाव इलाख्याचा कांहीं भाग व कांहीं सरहद्दीवरील प्रदेश मिळून हा प्रांत झाला आहे. त्याची व्यवस्था चीफ कमिशनरकडे सोंपविली आहे.

## ३ संयुक्त प्रांत.

**सीमा**—उत्तरेस तिबेट व नेपाळ; पूर्वेस बंगाल; दक्षिणेस मध्य हिंदुस्तान; पश्चिमेस राजपुताना व पंजाब.

हिंदुस्तानांतील अतिशय सुपीक व दाट वस्तीच्या प्रदेशांपैकीं हा एक प्रदेश आहे. याची उंची सरासरीनें ५०० फुटांपेक्षां कमी आहे. ह्या प्रांताचे वायव्यभागीं वियास व गंगा ह्या नद्यांचे मध्यें **शिवालिक पहाडाची** ओळ आहे. संयुक्त प्रांतांतील अयोध्या प्रांताचे उत्तरेस **तराईचा** कांहीं भाग आहे.

हिमालयाचे पायथ्याशीं एक सखल व खोलगट दलदलीचा प्रदेश आहे, त्यास **तराई** म्हणतात. यांत झाडी फार असून हवा रोगट आहे.

गंगा व यमुना यांच्या कांठचे सुपीक प्रदेश या प्रांतांत येत असल्यामुळें तो फार सुपीक आहे. यांतील मुख्य नद्या गंगा व यमुना होत. गंगा व यमुना ह्या नद्यांचे पुष्कळ कालवे ह्या प्रांतांत पसरले आहेत.

**हवा**–प्रदेश सखल असल्यामुळें हवा उष्ण आहे. उन्हाळ्यांत उन्हाळा फार असतो व हिंवाळ्यांत थंडी फार असते. **पिकें**–सर्व प्रकारचीं धान्यें ह्या प्रांतांत पिकतात. पैकीं गहूं व तांदूळ हीं मोठीं पिकें होत. नीळ, अफू व चहा हीं या प्रांतांतील विशेष पिकें होत. ह्या प्रांतांत ऊसही पुष्कळ होतो. इकडील साखर बनारसी साखर या नांवानें हिंदुस्तानांत प्रसिद्ध आहे. हिमालयाच्या उतरणीवरील प्रदेशांत उत्तम प्रकारचा चहा होतो. **उद्योगधंदे, कारखाने वगैरे**–तांब्यापितळेचीं भांडीं, कमावलेल्या कातड्याचे जिन्नस, व रेशमी आणि लोकरीचें कापड ह्यांविषयीं ह्या प्रांताची प्रसिद्धि आहे.

**विभाग**–( १ ) आग्रा प्रांत व ( २ ) अयोध्या प्रांत.

**शहरें**–[**आग्रा प्रांतांतील**] **अलाहाबाद** (१७२)–हें संयुक्त प्रांताची हल्लींची राजधानी आहे. गंगा व यमुना ह्या नद्यांचे संगमाजवळ हें शहर असल्यामुळें हिंदू लोक त्यास फार पवित्र मानतात. एथें दरवर्षी माघी पौर्णिमेस मोठी यात्रा जमते. गेल्या कुंभमेळ्याच्या वेळीं एथें १०--१५ लक्ष यात्रा जमली असावी असें म्हणतात. ह्या शहरास हिंदू लोक **प्रयाग** असें म्हणतात; व हेंच ह्या शहराचें पूर्वीचें नांव होतें. त्यास 'अलाहाबाद' ( अल्लाह=देव; आबाद=शहर; देवाचें शहर ) हें नांव अकबरानें दिलें. ( पूर्वेस ) **काशी ऊर्फ बनारस** ( २०९ )–हिंदूंच्या सर्व क्षेत्रांमध्यें हें क्षेत्र अतिशय

पवित्र व प्रसिद्ध आहे. एथें हिंदूंच्या देवतांचीं हजारों देवळें आहेत. गंगेच्या कांठीं मोठाले घाट बांधलेले आहेत. (अलाहाबादचे वायव्येस) **कानपूर** (१९७)–गंगेच्या कांठीं असून एथें सरकारी फौजेची मोठी छावणी आहे. एथें लोकरीचें कापड, कापसाचें कापड, बूट व इतर चामड्याचे पदार्थ करण्याचे मोठे कारखाने आहेत. एथें आगगाड्यांचे पुष्कळ रस्ते मिळतात. यामुळें व्यापाराचे दृष्टीनेंही हें शहर महत्त्वाचें आहे. (वायव्येस) ‡ **आग्रा** ( १८८ )–दिल्लीपूर्वीं हें शहर मोंगल बादशहांची राजधानी होतें. एथील ताजमहाल इमारत पृथ्वींतील अत्युत्कृष्ट इमारतींपैकीं आहे. ह्या इमारतीस ३ कोट रुपये लागले असावेत असा अजमास आहे. ही इमारत बांधण्यास २० हजार लोक २२ वर्षें खपत होते असें म्हणतात. आग्रा एथें अकबरानें बांधलेला तांबड्या दगडांचा भव्य किल्ला पाहाण्यायोग्य आहे. (नैर्ऋत्येस) **फत्तेपूरशिक्री**–एथें अकबरानें बांधलेल्या फार सुंदर इमारती आहेत. **अलीगड** ( ७० )–एथें केवळ मुसलमानांसाठीं म्हणून एक इंग्रजी कॉलेज आहे. **मथुरा, वृंदावन, हरिद्वार** हीं हिंदूंचीं क्षेत्रें आहेत. हरिद्वाराजवळ **रुर्की** एथें मोठें एंजिनियरिंग कॉलेज आहे. **थंड हवेचीं ठिकाणें**–नैनीताल व मसुरी हीं हिमालयांतील थंड हवेचीं ठिकाणें आहेत. **अयोध्या प्रांतांतील शहरें**— **लखनौ** (२६४)–हें संयुक्त प्रांतांतील सर्वांत मोठें शहर आहे. हें पूर्वीं अयोध्येच्या नबाबाची राजधानी होतें. एथील जुन्या इमारती पाहाण्यासारख्या आहेत. ( पूर्वेस ) **फैजाबाद** व **अयोध्या** हीं प्रसिद्ध शहरें होत. अयोध्या हें शहर प्राचीनकाळीं राजधानी होतें. रामराजा एथेंच राज्य करीत होता असें हिंदू लोक समजतात.

**संस्थानें**–रामपूर व तेहरी हीं लहान संस्थानें आहेत.

[ **इतिहास**—या प्रांताचा बराच भाग अयोध्येच्या नबाबापासून व शिंद्यापासून इंग्लिशांनीं सुमारें शंभर वर्षांपूर्वीं जिंकून घेतला

‡ 'वायव्येस' 'उत्तरेस' असे जे शब्द शहरांचे नांवांपूर्वीं घातले आहेत, ते त्या शब्दांपुढील शहर पूर्वीं सांगितलेल्या शहराचे कोणत्या दिशेस आहे हें दाखवितात.

होता. त्यास पुढें लॉर्ड डलहौसी यांनीं १८५६ सालीं अयोध्येचे नबावास पदच्युत करून अयोध्याप्रांत जोडला. या प्रांताचे उत्तरेकडील कांहीं प्रदेश नेपाळच्या राजापासून जिंकून घेतला आहे.

या प्रांतास पूर्वी वायव्येकडील प्रांत म्हणत असत. बंगाल देशांत प्रथम इंग्लिशांचें राज्य झालें व त्या प्रांताच्या वायव्येस हा प्रांत आहे, म्हणून हें नांव त्यास प्रथम दिलें होतें. परंतु हल्लीं त्यास संयुक्त ( आग्रा व अलाहाबाद हे प्रांत मिळून झालेला ) प्रांत हें नांव दिलें आहे. ]

---

## ४ बंगाल प्रांत.

बंगाल, बहार, ओरिसा व छोटा नागपूर हे देश बंगाल प्रांतांत येतात.

## बंगाल देश.

हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांत बंगाल देश अतिशय सुपीक व संपन्न म्हणून प्रसिद्ध आहे. बुद्धिमत्ता व वक्तृत्व ह्यांविषयीं या देशांतील लोकांची ख्याति आहे. हिंदुस्तानांतील देशांपैकीं हाच देश प्रथम इंग्लिशांचे ताब्यांत आला.

**सीमा**—उत्तरेस बहार, पूर्वेस पूर्व बंगाल, दक्षिणेस बंगालचा उपसागर, पश्चिमेस छोटानागपूर व ओरिसा.

हा देश म्हणजे गंगेच्या उत्तर प्रवाहाच्या कांठचें सखल मैदानच होय. **हवा**—ह्या देशांतील हवा उष्ण व दमट आहे. **सुपीकपणा**—गंगेच्या कांठचा गाळ सांचून या देशांतील जमीन झाल्यामुळें व कालव्याच्या पाण्याचा पुरवठा भरपूर असल्यामुळें जमीन अतिशय सुपीक आहे. कित्येक जमिनींतून दर वर्षी ३ पिकें काढितात.

**पिकें**—तांदूळ हें मोठें पीक होय. ज्यूट व नीळ हीं ह्या देशांतील विशेष पिकें आहेत.

**रेशीम**—तुतीच्या झाडांचीं पानें रेशमाच्या किड्यांचें भक्ष्य होत. हीं झाडें बंगालच्या हवेंत चांगलीं होतात. म्हणून ह्या प्रांतांत रेशीम तयार करण्याचा धंदा चालतो.

**लोक**–हवा उष्ण व दमट आहे, व लोकांचें मुख्य अन्न भात आहे. यामुळें या देशांतील लोक फारसे सशक्त नाहींत.

**व्यापार**—या देशांतील पुष्कळ माल कलकत्त्याकडे जाऊन तेथून आगबोटींतून परमुलखीं रवाना होतो. संयुक्त प्रांतांतीलही बराच माल याच देशांतून जातो. यामुळें एथें व्यापार पुष्कळ चालतो. गंगा नदींतून नेहमीं गलबतांनीं माल जात येत असतो. या देशांत नद्या पुष्कळ आहेत, व त्यांचा जलमार्ग ह्या नात्यानें फार उपयोग होतो.

**महत्त्वाचीं शहरें व गांवें**–[ हुगळी नदीच्या कांठानें दक्षिणेकडे गेलें असतां ह्या देशांतील बहुतेक सर्व मोठीं शहरें लागतात. ] हुगळी नदीचे पूर्व तीरावर **कलकत्ता** (११०६) हें शहर आहे. हें हिंदुस्तानची राजधानी असून हिंदुस्तानांतील अत्यंत मोठें शहर आहे. हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल यांची स्वारी वर्षांतून कांहीं महिने एथें राहाते. हें मोठें बंदर असून एथून दरवर्षीं १०० कोट रुपयांचा माल रवाना होतो. ह्या शहरांतील भव्य व सुंदर इमारतींमुळें यास राजवाड्यांचें–हवेल्यांचें–शहर असें नांव युरोपियन लोकांनीं दिलें आहे. ह्या शहराचे संरक्षणार्थ फोर्ट वुइल्यम किल्ला बांधला आहे. [ साधारणपणें कर्कवृत्तावर हें शहर आहे. ] **डायमंड बंदर**–कलकत्त्याचे दक्षिणेस हुगळीवर आहे. ( फोर्ट वुइल्यमच्या दक्षिणेस ) **अलीपूर**–एथें बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरचा बंगला आहे. ( भागीरथीवर ) **मुर्शिदाबाद** (३६)–हें शहर बंगालच्या नबाबाची शेवटली राजधानी होतें. एथें मुसलमानांची वस्ती फार आहे. रेशमाचें व कलावतूचें काम ह्याविषयीं ह्या शहराची प्रसिद्धि आहे. क्लाइव्हच्या वेळीं हें शहर त्या वेळच्या लंडन शहरापेक्षां सधन होतें असें क्लाइव्हनेंच म्हटलें आहे. **अगदीं उत्तर भागच्या प्रदेशांतील शहरें**–**दार्जिलिंग**–हें हिमालयांत उंचावर असल्यामुळें एथील हवा फार थंड आहे. युरोपियन लोक एथें उन्हाळ्यांत राहाण्यास जातात. ह्याची उंची ७००० फूट आहे. ह्याचे आसपास डोंगरांच्या उतरणीवर चहा पुष्कळ पिकतो. **बंगालच्या पश्चिम विभागांत**—**हुगळी**–कलकत्ता शहर स्थापन होण्यापूर्वीं एथें इंग्लिशांनीं वखार घातली होती.

(हुगळीचे पश्चिम तीरावर) **हावरा** (१५८)—हें कलकत्याचे खालोखाल ह्या देशांतील मोठें शहर आहे. हें शहर व कलकत्ता यांमध्यें फक्त हुगळी नदी आहे. हें शहर कलकत्त्याचाच एक भाग आहे असें म्हटल्यास चालेल. (दामोदर नदीवर) **राणीगंज**–याजवळ कोळशाच्या मोठ्या खाणी आहेत. **मिदनापूर**–हें नीळ, पितळी सामान, व रेशमी कापड ह्यांविषयीं प्रसिद्ध आहे.

## बहार.

संयुक्तप्रांत व बंगाल यांचे दरम्यान हा देश आहे. यांत पूर्वी बुद्धधर्मी लोकांनीं पुष्कळ विहार म्हणजे मठ बांधले; यावरून त्यास विहार–बहार–हें नांव प्राप्त झालें आहे. यास प्राचीनकाळीं **मगध** देश म्हणत असत.

**हवा** कोरडी व साधारण उष्ण आहे. जमीन फार सुपीक असून कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा आहे. **पिकें**—गहूं, तांदूळ, सातू या देशांत फार पिकतात. अफू हें या देशांतील महत्त्वाचें पीक होय. नीळही पुष्कळ पिकते. **लोक**—हवा कोरडी आहे व या देशांतील लोकांमध्यें बंगाली लोकांपेक्षां गहूं खाण्याचा परिपाठ जास्त आहे. म्हणून ते त्यांच्यापेक्षां सशक्त आहेत.

**शहरें**–(गंगेचे कांठीं) **पाटणा** (१३५)–हें या देशांतील मुख्य शहर आहे. प्राचीनकाळीं या देशाची पाटलीपुत्र म्हणून जी राजधानी होती तेंच हें शहर होय असें म्हणतात. **पुसा**—(गंडकीच्या कांठीं) एथें तंबाकूचा मोठा कारखाना आहे. तसेंच एथें शेतकीचें फार मोठें कॉलेज आहे. (पाटणाचे पूर्वेस) **मोंगीर** (३६)–गंगेचे कांठीं–हें शहर प्राचीन असून तेथील किल्ल्याची एके काळीं प्रसिद्धि होती. एथें पूर्वी बंदुका, तरवारी वगैरे हत्यारें तयार होत असत. (पाटणाचे दक्षिणेस) **गया**—या ठिकाणीं एका पिंपळाचे झाडाखालीं बुद्ध ध्यानस्थ बसला असतां त्यास धर्मज्ञान प्रकट झालें, असें म्हणतात. हें प्रसिद्ध क्षेत्र आहे.

## ओरिसा.

जगन्नाथाचे पुरीचा प्रदेश या नांवानें हा देश हिंदू लोकांस माहीत आहे.

हवा उष्ण व दमट आहे. **सुपीकपणा व पिकें**—या प्रदेशांतील बराच भाग सखल असून त्यांत नद्यांच्या पाण्याचा भरपूर पुरवठा असल्यामुळें तो सुपीक आहे. मुख्य पीक तांदूळ होय.

**शहरें**—**कटक** (४७)—हें महानदीचे कांठीं असून या देशांतील सर्वांत मोठें शहर आहे. **जगन्नाथ-पुरी**—एथील जगन्नाथाचें देवालय प्राचीन काळापासून फार प्रसिद्ध आहे. एथें मोठी यात्रा भरते.

## छोटानागपूर.

मध्यप्रांत व बहार यांचे मध्यें हा देश आहे. हा डोंगराळ असून यांतील वस्ती बहुतेक रानटी लोकांची आहे. हा प्रदेश किनाऱ्यापासून बराच दूर असून याच्या बऱ्याच भागांत डोंगर असल्यामुळें हा बहुतेक उंचवट्याचा आहे. **पारसनाथ** हा यांतील अतिशय उंच डोंगर होय. यास जैन लोक फार पवित्र मानतात. [ या देशांत पुष्कळ ठिकाणीं जंगलच आहे. कोळ, उरावण वगैरे जातींचे रानटी लोक या देशांत राहातात. ] जंगलांत तस्सर जातीचें रेशीम पुष्कळ सांपडतें; यासच कोशाचें रेशीम म्हणतात.

**शहरें**—**रांची** व **हजारीबाग** हीं मुख्य शहर आहेत.

**बंगाल प्रांताचा इतिहास**—१७६४ सालीं बक्सारचे लढाईंत बंगालच्या नबाबाचा पराभव केल्यावर बंगाल, बहार व ओरिसाचा कांहीं भाग यांच्या दिवाणीची सनद इंग्लिशांना दिल्लीचे बादशहापासून मिळाली. तेव्हांपासून या प्रदेशावर इंग्लिशांचा अमल सुरू झाला. १८०३ सालीं ओरिसाचा बाकीचा भाग नागपूरच्या भोसल्यांपासून इंग्लिशांनीं घेतला.

---

# ५ पूर्वबंगाल व आसाम प्रांत.

## पूर्वबंगाल.

**सीमा**—उत्तरेस सिकीम संस्थान व भूतान; पूर्वेस आसाम व ब्रह्मदेश; दक्षिणेस बंगालचा उपसागर; पश्चिमेस बंगाल, बहार व नेपाळ.

**सुपीकपणा**—हा प्रदेश सखल व सपाट आहे व नद्यांचे पाण्याचा व पावसाच्या पाण्याचा त्यांत भरपूर पुरवठा आहे, यामुळें तो सुपीक आहे. **पिकें**—उत्तरभागीं ज्यूट व दक्षिणभागीं तांदूळ हीं महत्त्वाचीं पिकें होत.

**शहरें**—( बडीगंगा नांवाच्या गंगेच्या फाट्यावर) **डाका** ( ९० )-हें शहर पूर्वीं कांहीं वर्षें बंगालच्या नबाबाची राजधानी होतें. एथील मलमलीची पूर्वीं फार प्रसिद्धि होती. हल्लीं हें शहर पूर्व-बंगाल व आसाम प्रांताची राजधानी आहे. **बारिसाल**–हें शहर ज्या जिल्ह्यांत आहे त्यांत तांदूळ इतका पिकतो कीं, त्यास कलकत्त्याच्या तांदुळाचें कोठार असें कधीं कधीं म्हणतात. **चितगांव**–(२४)–त्याच नांवाचे नदीवर–हें पूर्वबंगालमधील मुख्य बंदर होय. एथून तांदूळ व लाकूड हे जिन्नस मुख्यतः रवाना होतात. एथील गोदींत जहाजें तयार करितात.

## आसाम.

चहाचें आगर व अतिशय पावसाचा देश म्हणून हा देश प्रसिद्ध आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्याचा कांहीं प्रदेश ह्या देशांत येतो. **डोंगर**–उत्तरेकडे हिमालयाचे फाटे आहेत. मध्यभागीं **गारो, खाशीया, जयंतीया,** व **नागा** ह्या टेकड्या पश्चिमेकडून पूर्वेकडे गेल्या आहेत. ह्या टेकड्यांवर जंगल फार आहे. खाशीया टेकडीचें **शिलांग** हें अत्युच्च शिखर होय. [ उंची ६४५० फूट. ] एथील हवा थंड असल्यामुळें पूर्वबंगालचा ले० गव्हर्नर एथें कांहीं दिवस राहातो. शिलांगची वस्ती ७ हजार आहे. **पाऊस**—नैर्ऋत्येकडील मान्सून वारे वर सांगितलेल्या डोंगरांच्या दोन रांगांनीं अडविले गेल्यामुळें ह्या देशांत पाऊस फार पडतो. हवा उष्ण असून दमट आहे. अशाच प्रकारची हवा चहास लागते. एथें युरोपियन लोकांनीं पुष्कळ चहाचे मळे केले आहेत. त्यांत दरवर्षीं सुमारें १० कोटी शेर चहा उत्पन्न होतो. जंगलांत तस्सर जातीचें रेशीम पुष्कळ सांपडतें. **खनिज द्रव्यें**–ह्या प्रांतांत दगडी कोळसा व लोखंड हीं पुष्कळ सांपडतात. कांहीं भागांत राकेल सांपडतें.

**शहरें—गोहत्ती**—हें ह्या प्रांतांतील मोठें शहर होय. तथापि याची लोकसंख्या फक्त १२ हजार आहे. [पूर्वेस] **शिवसागर**—हें शहर चहाचे मळ्यांच्या प्रदेशाच्या मध्यभागीं आहे. खाशिया टेकड्यांच्या दक्षिणेस **सिल्हेट** (१४)—एथील नारिंगें प्रसिद्ध आहेत. एथें बंगाली लोकांची वस्ती विशेष आहे. काचर प्रांतांत, **सिल्चर**–(८)–ह्या शहराचे नजीक चहाचे मळे पुष्कळ आहेत.

**आसामचा इतिहास**—हा प्रांत ब्रह्मदेशच्या राजापासून १८२६ सालीं इंग्रजांनीं घेतला.

---

**बंगाल प्रान्त व पूर्व बंगाल प्रान्त यांतील संस्थानें**—एकंदर ३८००० चौ० मैल क्षेत्रफळाचा मुलूख संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. त्यांतील लोकसंख्या ३७ लक्ष आहे. संस्थानिकांच्या ताब्यांत जो प्रदेश आहे त्यांतील तीन चतुर्थांश भाग छोटानागपूर व ओरिसा ह्या देशांत आहे. **महत्वाचीं संस्थानें—सिकीम**—नेपाळ व भूतान यांच्यामध्यें; उत्पन्न १॥ लक्ष. **कुचविहार**—भूतानचे दक्षिणेस; उत्पन्न २३ लक्ष. **मणिपूर**—आसाम व ब्रह्मदेश यांचेमध्यें. ह्यांतील प्रदेश डोंगराळ आहे.

---

# ६ मध्य प्रांत.

**सीमा**—उत्तरेस मध्य हिंदुस्तान एजन्सी, बुंदेलखंड आणि त्याचे पलीकडे संयुक्तप्रांत; पूर्वेस बंगाल इलाखा व उत्तर सरकार प्रांत; दक्षिणेस निजामचें राज्य; आणि पश्चिमेस मुंबई इलाख्यापैकीं खानदेश.

हा प्रदेश मध्यम उंचवट्याचा आहे. उत्तरेकडील प्रदेश डोंगराळ असून विशेष उंचवट्याचा आहे. **पिकें**—वर्धेच्या कांठच्या प्रदेशांत व वऱ्हाडांत कापूस पुष्कळ पिकतो. छत्तीसगडचे मैदानांत पुष्कळ गहूं होतो. **खनिज पदार्थ**—दगडी कोळशाच्या खाणींविषयीं ह्या प्रांताची प्रसिद्धि आहे. ह्या प्रांतांत पुष्कळ ठिकाणीं जमिनींत लोखंड आहे. त्याच्या खाणी चालविण्याकरितां एक कंपनी नुकतीच स्थापन झाली आहे. **कारखाने**—या प्रांतांत कापसाच्या गिरण्या बऱ्याच आहेत. रेशीमकांठी उपरणीं व लुगडीं ह्यांविषयीं नाग-

पुराची ख्याति आहे. लुगडीं व जरीचें कापड ह्यांविषयीं बऱ्हाणपूर प्रसिद्ध आहे.

ह्या प्रांतांत गोंड, भिल्ल वगैरे लोकांची २० लक्ष वस्ती आहे. ह्या प्रांतांतील मूळच्या रहिवाशांना जिंकून गोंड लोकांनीं आपलें राज्य स्थापिलें. यामुळें ह्या प्रांतांतील कांहीं प्रदेशास 'गोंडवण' हें नांव प्राप्त झालें. गोंड राजांस मुसलमानांनीं जिंकिलें. गोंड राजांचीं अद्याप कांहीं संस्थानें आहेत.

**विभाग** [१] नागपूर, [२] जबलपूर, [३] छत्तीसगड, [४] नर्मदा व [५] वऱ्हाड असे ह्या प्रांताचे विभाग आहेत.

**शहरें—नागपूर** (१२८)–हें ह्या प्रांताची राजधानी आहे. ह्याच्या जवळ सितावर्डीची टेकडी असून तीवर किल्ला आहे. नागपूर एथें कापसाच्या गिरण्या पुष्कळ आहेत. ह्या शहरापासून १२ मैलांवर कामटी गांव आहे, तेथें फौजेची छावणी असते. नागपूरच्या दक्षिणेस **हिंगणघाट** गांव आहे. तें कापसाची मोठी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. हिंगणघाटाच्या आग्नेयीस, **चांदा** शहर आहे. तें पूर्वीं गोंड राजांची राजधानी होतें. जबलपूर विभागांत–**जबलपूर** (९०)—हें मोठें व्यापाराचें शहर व रेल्वे-जंक्शन आहे. जबलपुरापासून ११ मैलांवर नर्मदा नदी ज्या ठिकाणीं संगमरवरी खडकांतून वाहात गेली आहे, तें स्थळ फारच रम्य आहे. [ जबलपूरचे वायव्येस ] **सागर** ( ४६ )–हें एका सरोवराजवळ वसविलेलें सुंदर शहर आहे. त्यावरून त्यास सागर हें नांव पडलें आहे. **पंचमडी**–हें सातपुड्यांतील थंड हवेचें ठिकाण आहे. नर्मदा विभागांत–पश्चिमभागीं अशिरगड किल्ल्याजवळ **बऱ्हाणपूर** ( ३२ ) शहर आहे. तेथें मोंगलांच्या कारकिर्दींत फौजेची मोठी छावणी असे. एथील जरीचें कापड व लुगडीं हीं प्रसिद्ध आहेत. वऱ्हाडांत–मुख्य शहर **उमरावती** (३४)–एथें कापसाचा व्यापार मोठा चालतो. [ उमरावतीच्या उत्तरेस ] **एलिचपूर** ( ३६ )—हें बहामनी राज्यांपैकीं एका राज्याच्या राजधानीचें शहर होतें.

**इतिहास**—या प्रांताचा कांहीं भाग १८१८ सालीं रघोजी भोसले यांजकडून इंग्लिशांनीं जिंकून घेतला व कांहीं १८५३ सालीं नागपूरच्या भोसल्यांचें राज्य खालसा करून मिळविला.

**वऱ्हाड प्रांताचा इतिहास**—१७९८ सालीं झालेल्या तहामध्यें निजामचे राज्याचे संरक्षणाकरितां इंग्लिशांनीं जें सैन्य ठेवण्याचें कबूल केलें होतें, त्याचे खर्चाकरितां हा प्रांत निजामानें इंग्लिशांस १८५३ सालीं दिला. त्यानंतर १९०३ सालीं निजाम व इंग्रज सरकार यांचेमध्यें नवा करार होऊन दरसाल २५ लक्ष रुपये देण्याचे करारानें हा प्रांत इंग्लिश सरकारानें आपणांकडे कायमचा घेतला आहे.

---

# ७ मुंबई इलाखा.

**सीमा**—उत्तरेस पंजाब; पूर्वेस राजपुताना, मध्यप्रांत व निजामचें राज्य; दक्षिणेस म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा; पश्चिमेस अरबी समुद्र व हाला पर्वत [आणि या पर्वताचे पलीकडे बलुचिस्तान.]

**स्वाभाविक रचना**—सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश उंचवट्याचा आहे. बाकीचा प्रदेश सखल आहे. सिंधचा बहुतेक भाग वालुकामय प्रदेश आहे. **हवा**—सह्याद्रीचे पूर्वेकडील प्रदेशांत साधारण थंड, व बाकीच्या प्रदेशांत उष्ण आहे. **पिकें**—कोंकणांत तांदूळ हें मुख्य पीक होय. **देशांतील मुख्य पिकें** गहूं, ज्वारी, व बाजरी हीं होत. पैकीं उत्तरेस गहूं, दक्षिणेस ज्वारी व दरम्यानचे प्रदेशांत बाजरी हीं मुख्य पिकें होत. सिंध, गुजराथ, खानदेश व धारवाड जिल्हा या प्रदेशांत कापूस पिकतो. **खनिज संपत्ति**—**सोनें** धारवाड जिल्ह्यांत सांपडतें. **लोखंड** सह्याद्रीचे आसपास सांपडतें.

**विभाग**—१ सिंध, २ उत्तर भाग, ३ मध्य भाग, ४ दक्षिण भाग, आणि ५ मुंबई बेट.

**शहरें**—सिंध विभागांत **कराची** (११७) हें त्या विभागाचें मुख्य शहर होय. हें मुंबई इलख्यांतील दुसऱ्या नंबरचें व हिंदुस्तानांतील तिसऱ्या नंबरचें बंदर आहे. **हैदराबाद** [६९] सिंधूचे पूर्व तीरावर आहे. तें पूर्वी सिंधच्या अमिरांची राजधानी होतें. हें व्यापाराविषयीं प्रसिद्ध आहे. गालिचांसंबंधानें या शहराची ख्याति आहे.

**मुख्य विभाग**—मध्यभागीं ( १ ) लाहोर; वायव्येकडे ( २ ) रावळपिंडी; पूर्वेकडे ( ३ ) जालंदर दोआब; आग्नेयीकडे ( ४ ) दिल्ली; पश्चिमेकडे ( ५ ) दीराजत.

**शहरें**-[१] **लाहोर** ( २०२ )§-रावी नदीवर; शिखांचा प्रसिद्ध राजा रणजितसिंग याची हें शहर राजधानी होतें. एथें त्याचें थडगें आहे. हल्लीं हें शहर पंजाब प्रांताची राजधानी आहे. लाहोरचे पूर्वेस **अमृतसर** ( १६२ )—हें शीख लोकांचें पवित्र शहर असून एथें शिखांच्या गुरूचें प्रसिद्ध देवालय आहे. त्याच्या कांहीं भागावर सोन्याचा मुलामा केला आहे; यावरून त्यास सोन्याचें देऊळ असें म्हणतात. लाहोरच्या नैर्ऋत्येस **मुलतान** ( ७५ )—हें मोठें व्यापाराचें ठिकाण म्हणून प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. हें शहर चिनाब नदीचे कांठीं आहे. [२] **रावळपिंडी** ( ७४ )–हें फौजेचें मोठें ठाणें आहे. [४] **दिल्ली** ( २०८ )–हें पंजाबांतील सर्वांत मोठें शहर होय. तें बरींच वर्षें मोंगल बादशहांची राजधानी होतें. तें कलाकौशल्याविषयीं प्रसिद्ध असून तेथील जुन्या इमारती फारच पाहाण्यासारख्या आहेत. पैकीं जुम्मा मशीद आणि किल्ला व किल्ल्यांतील 'दिवाणी आम' व 'दिवाणी खास' हे राजवाडे फार प्रेक्षणीय आहेत. दिल्लीपासून थोड्या अंतरावर **पानपत** हें इतिहासप्रसिद्ध स्थल आहे. हिंदुस्तानचे इतिहासांतील फार प्रसिद्ध अशा तीन लढाया एथें झाल्या, व त्या सर्वांमध्यें परदेशाहून आलेल्या लोकांचा जय झाला. दिल्लीपासून १० मैलांवर कुतुबमिनार म्हणून एक मनोरा आहे. त्याची उंची दीडशें हात (२३७ फूट) आहे. (उत्तरेस) **सिमला** (१५)–हें थंड हवेचें प्रसिद्ध ठिकाण आहे. एथें हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल उन्हाळ्याचे दिवसांत हवा खाण्यास जातात. सिमल्याची उंची ७२०० फूट आहे. (अंबाल्याचे दक्षिणेस) **स्थानेश्वर**–एथें महंमद घोरी व पृथ्वीराज चव्हाण ह्यांमध्यें लढाई झाली. स्थानेश्वराजवळ **कुरुक्षेत्र** आहे, तेथें पांडव व कौरव यांचेमध्यें प्राचीन काळीं मोठें युद्ध झालें असें हिंदूंच्या पुराणांत लिहिलें आहे.

---

§ शहराचे नांवापुढच्या कंसांतील आंकडा शहराची लोकसंख्या किती हजार आहे हें दाखवितो.

**संस्थानें**—पंजाबांत एकंदर ३४ संस्थानें आहेत. त्यांपैकीं बहुतेक शीख राजांच्या ताब्यांत आहेत. भावलपूर संस्थान क्षेत्रफळानें सर्वांत मोठें असून तें एका नवाबाच्या ताब्यांत आहे. शीख संस्थानांपैकीं पतियाळा, नाभा, झिंद, कपुरथळ, मंडी, फरिद्कोट हीं मुख्य होत.

[**इतिहास**—या प्रांताचा बहुतेक भाग प्रसिद्ध शीख राजा रणजितसिंग याचे वंशजांपासून इंग्लिशांनीं सुमारें ६० वर्षांपूर्वीं जिंकून घेतला.]

---

## २ वायव्य सरहद्दीवरील प्रांत.

या प्रांताचा पश्चिम भाग डोंगराळ असून त्यांत खैबर खिंड आहे. **हवा**—या प्रांतांत पाऊस थोडा पडतो व प्रदेश उंचवट्याचा आहे, यामुळें हवा कोरडी व थंड आहे. या प्रांतांतील डोंगराळ प्रदेशांत राहाणारे लोक वरचेवर बंडें करीत असतात.

**शहरें**—पेशावर (८४)–हें या प्रांताचें मुख्य शहर आहे. खैबर खिंडीचे तोंडासमोर हें शहर असल्यामुळें हें मोठें महत्त्वाचें लष्करी ठाणें आहे. गोमल नदी व सिंधु यांचे संगमाजवळ **डेरा इस्माइलखान** हें एक लष्करी ठाणें आहे. चित्रळ खिंडीचे तोंडाशीं असलेलें चित्रळ हें ठिकाण खिंडीचें रक्षण करण्यास उपयोगी आहे, म्हणून तें महत्त्वाचें आहे.

**इतिहास**—हिंदुस्तानची वायव्य सरहद्द विशेष महत्त्वाची आहे, व सरहद्दीच्या प्रदेशाची व्यवस्था गव्हर्नर जनरलाचे देखरेखीखालीं असणें अवश्य आहे; म्हणून हा प्रांत १९०१ सालीं पंजाब इलाख्यापासून निराळा केला. पंजाब इलाख्याचा कांहीं भाग व कांहीं सरहद्दीवरील प्रदेश मिळून हा प्रांत झाला आहे. त्याची व्यवस्था चीफ कमिशनरकडे सोंपविली आहे.

---

## ३ संयुक्त प्रांत.

**सीमा**—उत्तरेस तिबेट व नेपाळ; पूर्वेस बंगाल; दक्षिणेस मध्य हिंदुस्तान; पश्चिमेस राजपुताना व पंजाब.

हिंदुस्तानांतील अतिशय सुपीक व दाट वस्तीच्या प्रदेशांपैकीं हा एक प्रदेश आहे. याची उंची सरासरीनें ५०० फुटांपेक्षां कमी आहे. ह्या प्रांताचे वायव्यभागीं बियास व गंगा ह्या नद्यांचे मध्यें **शिवालिक पहाडाची** ओळ आहे. संयुक्त प्रांतांतील अयोध्या प्रांताचे उत्तरेस **तराईचा** कांहीं भाग आहे.

हिमालयाचे पायथ्याशीं एक सखल व खोलगट दलदलीचा प्रदेश आहे, त्यास **तराई** म्हणतात. यांत झाडी फार असून हवा रोगट आहे.

गंगा व यमुना यांच्या कांठचे सुपीक प्रदेश या प्रांतांत येत असल्यामुळें तो फार सुपीक आहे. यांतील मुख्य नद्या गंगा व यमुना होत. गंगा व यमुना ह्या नद्यांचे पुष्कळ कालवे ह्या प्रांतांत पसरले आहेत.

**हवा**–प्रदेश सखल असल्यामुळें हवा उष्ण आहे. उन्हाळ्यांत उन्हाळा फार असतो व हिंवाळ्यांत थंडी फार असते. **पिकें**–सर्व प्रकारचीं धान्यें ह्या प्रांतांत पिकतात. पैकीं गहूं व तांदूळ हीं मोठीं पिकें होत. नीळ, अफू व चहा हीं या प्रांतांतील विशेष पिकें होत. ह्या प्रांतांत ऊसही पुष्कळ होतो. इकडील साखर बनारसी साखर या नांवानें हिंदुस्तानांत प्रसिद्ध आहे. हिमालयाच्या उतरणीवरील प्रदेशांत उत्तम प्रकारचा चहा होतो. **उद्योगधंदे, कारखाने वगैरे**–तांब्यापितळेचीं भांडीं, कमावलेल्या कातड्याचे जिन्नस, व रेशमी आणि लोकरीचें कापड ह्यांविषयीं ह्या प्रांताची प्रसिद्धि आहे.

**विभाग**–( १ ) आग्रा प्रांत व ( २ ) अयोध्या प्रांत.

**शहरें**–[**आग्रा प्रांतांतील**] **अलाहाबाद** (१७२)–हें संयुक्त प्रांताची हल्लींची राजधानी आहे. गंगा व यमुना ह्या नद्यांचे संगमाजवळ हें शहर असल्यामुळें हिंदू लोक त्यास फार पवित्र मानतात. एथें दरवर्षी माघी पौर्णिमेस मोठी यात्रा जमते. गेल्या कुंभमेळ्याच्या वेळीं एथें १०--१५ लक्ष यात्रा जमली असावी असें म्हणतात. ह्या शहरास हिंदू लोक प्रयाग असें म्हणतात; व हेंच ह्या शहराचें पूर्वीचें नांव होतें. त्यास 'अलाहाबाद' ( अल्लाह=देव; आबाद= शहर; देवाचें शहर ) हें नांव अकबरानें दिलें. ( पूर्वेस ) **काशी ऊर्फ बनारस** ( २०९ )–हिंदूंच्या सर्व क्षेत्रांमध्यें हें क्षेत्र अतिशय

पवित्र व प्रसिद्ध आहे. एथें हिंदूंच्या देवतांचीं हजारों देवळें आहेत. गंगेच्या कांठीं मोठाले घाट बांधलेले आहेत. (अलाहाबादचे वायव्येस) **कानपूर** (१९७)–गंगेच्या कांठीं असून एथें सरकारी फौजेची मोठी छावणी आहे. एथें लोकरीचें कापड, कापसाचें कापड, बूट व इतर चामड्याचे पदार्थ करण्याचे मोठे कारखाने आहेत. एथें आगगाड्यांचे पुष्कळ रस्ते मिळतात. यामुळें व्यापाराचे दृष्टीनेंही हें शहर महत्त्वाचें आहे. (वायव्येस) ‡ **आग्रा** (१८८)–दिल्लीपूर्वी हें शहर मोंगल बादशहांची राजधानी होतें. एथील ताजमहाल इमारत पृथ्वींतील अत्युत्कृष्ट इमारतींपैकीं आहे. ह्या इमारतीस ३ कोट रुपये लागले असावेत असा अजमास आहे. ही इमारत बांधण्यास २० हजार लोक २२ वर्षें खपत होते असें म्हणतात. आग्रा एथें अकबरानें बांधलेला तांबड्या दगडांचा भव्य किल्ला पाहाण्यायोग्य आहे. (नैर्ऋत्येस) **फत्तेपूरशिक्री**–एथें अकबरानें बांधलेल्या फार सुंदर इमारती आहेत. **अलीगड** (७०)–एथें केवळ मुसलमानांसाठीं म्हणून एक इंग्रजी कॉलेज आहे. **मथुरा, वृंदावन, हरिद्वार** हीं हिंदूंचीं क्षेत्रें आहेत. हरिद्वाराजवळ **रुर्की** एथें मोठें एंजिनियरिंग कॉलेज आहे. **थंड हवेचीं ठिकाणें**–नैनीताल व मसुरी हीं हिमालयांतील थंड हवेचीं ठिकाणें आहेत. **अयोध्या प्रांतांतील शहरें**— **लखनौ** (२६४)–हें संयुक्त प्रांतांतील सर्वांत मोठें शहर आहे. हें पूर्वी अयोध्येच्या नवाबाची राजधानी होतें. एथील जुन्या इमारती पाहाण्यासारख्या आहेत. (पूर्वेस) **फैजाबाद** व **अयोध्या** हीं प्रसिद्ध शहरें होत. अयोध्या हें शहर प्राचीनकाळीं राजधानी होतें. रामराजा एथेंच राज्य करीत होता असें हिंदू लोक समजतात.

**संस्थानें**–रामपूर व तेहरी हीं लहान संस्थानें आहेत.

[**इतिहास**—या प्रांताचा बराच भाग अयोध्येच्या नवाबापासून व शिंद्यापासून इंग्लिशांनीं सुमारें शंभर वर्षांपूर्वी जिंकून घेतला

---

‡ 'वायव्येस' 'उत्तरेस' असे जे शब्द शहरांचे नांवांपूर्वी घातले आहेत, ते त्या शब्दांपुढील शहर पूर्वी सांगितलेल्या शहराचे कोणत्या दिशेस आहे हें दाखवितात.

होत'. त्यास पुढें लॉर्ड डल्हौसी यांनीं १८५६ सालीं अयोध्येचे नबाबास पदच्युत करून अयोध्याप्रांत जोडला. या प्रांताचे उत्तरेकडील कांहीं प्रदेश नेपाळच्या राजापासून जिंकून घेतला आहे.

या प्रांतास पूर्वी वायव्येकडील प्रांत म्हणत असत. बंगाल देशांत प्रथम इंग्लिशांचें राज्य झालें व त्या प्रांताच्या वायव्येस हा प्रांत आहे, म्हणून हें नांव त्यास प्रथम दिलें होतें. परंतु हल्लीं त्यास संयुक्त ( आग्रा व अलाहाबाद हे प्रांत मिळून झालेला ) प्रांत हें नांव दिलें आहे. ]

---

# ४ बंगाल प्रांत.

बंगाल, बहार, ओरिसा व छोटा नागपूर हे देश बंगाल प्रांतांत येतात.

## बंगाल देश.

हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांत बंगाल देश अतिशय सुपीक व संपन्न म्हणून प्रसिद्ध आहे. बुद्धिमत्ता व वक्तृत्व ह्यांविषयीं या देशांतील लोकांची ख्याति आहे. हिंदुस्तानांतील देशांपैकीं हाच देश प्रथम इंग्लिशांचे ताब्यांत आला.

**सीमा**—उत्तरेस बहार, पूर्वेस पूर्व बंगाल, दक्षिणेस बंगालचा उपसागर, पश्चिमेस छोटानागपूर व ओरिसा.

हा देश म्हणजे गंगेच्या उत्तर प्रवाहाच्या कांठचें सखल मैदानच होय. **हवा**—ह्या देशांतील हवा उष्ण व दमट आहे. **सुपीकपणा**—गंगेच्या कांठचा गाळ सांचून या देशांतील जमीन झाल्यामुळें व कालव्याच्या पाण्याचा पुरवठा भरपूर असल्यामुळें जमीन अतिशय सुपीक आहे. कित्येक जमिनींतून दर वर्षी ३ पिकें काढितात.

**पिकें**—तांदूळ हें मोठें पीक होय. ज्यूट व नीळ हीं ह्या देशांतील विशेष पिकें आहेत.

**रेशीम**—तुताच्या झाडांचीं पानें रेशमाच्या किड्यांचें भक्ष्य होत. हीं झाडें बंगालच्या हवेंत चांगलीं होतात. म्हणून ह्या प्रांतांत रेशीम तयार करण्याचा धंदा चालतो.

**लोक**–हवा उष्ण व दमट आहे, व लोकांचें मुख्य अन्न भात आहे. यामुळें या देशांतील लोक फारसे सशक्त नाहींत.

**व्यापार**—या देशांतील पुष्कळ माल कलकत्त्याकडे जाऊन तेथून आगबोटींतून परमुलखीं रवाना होतो. संयुक्त प्रांतांतीलही बराच माल याच देशांतून जातो. यामुळें एथें व्यापार पुष्कळ चालतो. गंगा नदींतून नेहमीं गलबतांनीं माल जात येत असतो. या देशांत नद्या पुष्कळ आहेत, व त्यांचा जलमार्ग ह्या नात्यानें फार उपयोग होतो.

**महत्त्वाचीं शहरें व गांवें**–[ हुगळी नदीच्या कांठानें दक्षिणेकडे गेलें असतां ह्या देशांतील बहुतेक सर्व मोठीं शहरें लागतात. ] हुगळी नदीचे पूर्व तीरावर **कलकत्ता** (११०६) हें शहर आहे. हें हिंदुस्तानची राजधानी असून हिंदुस्तानांतील अत्यंत मोठें शहर आहे. हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल यांची स्वारी वर्षांतून कांहीं महिने एथें राहाते. हें मोठें बंदर असून एथून दरवर्षीं १०० कोट रुपयांचा माल रवाना होतो. ह्या शहरांतील भव्य व सुंदर इमारतींमुळें यास राजवाड्यांचें–हवेल्यांचें–शहर असें नांव युरोपियन लोकांनीं दिलें आहे. ह्या शहराचे संरक्षणार्थ फोर्ट वुइल्यम किल्ला बांधला आहे. [ साधारणपणें कर्कवृत्तावर हें शहर आहे. ] **डायमंड बंदर**–कलकत्त्याचे दक्षिणेस हुगळीवर आहे. ( फोर्ट वुइल्यमच्या दक्षिणेस ) **अलीपूर**–एथें बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरचा बंगला आहे. ( भागीरथीवर ) **मुर्शिदाबाद** (२६)–हें शहर बंगालच्या नबाबाची शेवटली राजधानी होतें. एथें मुसलमानांची वस्ती फार आहे. रेशमाचें व कलाबतूचें काम ह्याविषयीं ह्या शहराची प्रसिद्धि आहे. क्लाइव्हच्या वेळीं हें शहर त्या वेळच्या लंडन शहरापेक्षां सधन होतें असें क्लाइव्हनेंच म्हटलें आहे. **अगदीं उत्तर भागच्या प्रदेशांतील शहरें**–**दार्जिलिंग**–हें हिमालयांत उंचावर असल्यामुळें एथील हवा फार थंड आहे. युरोपियन लोक एथें उन्हाळ्यांत राहाण्यास जातात. ह्याची उंची ७००० फूट आहे. ह्याचे आसपास डोंगरांच्या उतरणीवर चहा पुष्कळ पिकतो. **बंगालच्या पश्चिम विभागांत**—**हुगळी**–कलकत्ता शहर स्थापन होण्यापूर्वीं एथें इंग्लिशांनीं वखार घातली होती.

..

(हुगळीचे पश्चिम तीरावर) हावरा (१५८)—हें कलकत्याचे खालोखाल ह्या देशांतील मोठें शहर आहे. हें शहर व कलकत्ता यांमध्यें फक्त हुगळी नदी आहे. हें शहर कलकत्त्याचाच एक भाग आहे असें म्हटल्यास चालेल. (दामोदर नदीवर) राणीगंज—याजवळ कोळशाच्या मोठ्या खाणी आहेत. मिदनापूर—हें नीळ, पितळी सामान, व रेशमी कापड ह्यांविषयीं प्रसिद्ध आहे.

## बहार.

संयुक्तप्रांत व बंगाल यांचे दरम्यान हा देश आहे. यांत पूर्वीं बुद्धधर्मी लोकांनीं पुष्कळ विहार म्हणजे मठ बांधले; यावरून त्यास विहार—बहार—हें नांव प्राप्त झालें आहे. यास प्राचीनकाळीं **मगध** देश म्हणत असत.

**हवा** कोरडी व साधारण उष्ण आहे. जमीन फार सुपीक असून कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा आहे. **पिकें**—गहूं, तांदूळ, सातू या देशांत फार पिकतात. अफू हें या देशांतील महत्त्वाचें पीक होय. नीळही पुष्कळ पिकते. **लोक**—हवा कोरडी आहे व या देशांतील लोकांमध्यें बंगाली लोकांपेक्षां गहूं खाण्याचा परिपाठ जास्त आहे. म्हणून ते त्यांच्यापेक्षां सशक्त आहेत.

**शहरें**—(गंगेचे कांठीं) **पाटणा** (१३५)—हें या देशांतील मुख्य शहर आहे. प्राचीनकाळीं या देशाची पाटलीपुत्र म्हणून जी राजधानी होती तेंच हें शहर होय असें म्हणतात. **पुसा**—(गंडकीच्या कांठीं) एथें तंबाकूचा मोठा कारखाना आहे. तसेंच एथें शेतकीचें फार मोठें कॉलेज आहे. (पाटणाचे पूर्वेस) **मोंगीर** (३६)—गंगेचे कांठीं—हें शहर प्राचीन असून तेथील किल्ल्याची एके काळीं प्रसिद्धि होती. एथें पूर्वीं बंदुका, तरवारी वगैरे हत्यारें तयार होत असत. (पाटणाचे दक्षिणेस) **गया**—या ठिकाणीं एका पिंपळाचे झाडाखालीं बुद्ध ध्यानस्थ बसला असतां त्यास धर्मज्ञान प्रकट झालें, असें म्हणतात. हें प्रसिद्ध क्षेत्र आहे.

## ओरिसा.

जगन्नाथाचे पुरीचा प्रदेश या नांवानें हा देश हिंदू लोकांस माहीत आहे.

हवा उष्ण व दमट आहे. **सुपीकपणा व पिकें**—या प्रदेशांतील बराच भाग सखल असून त्यांत नद्यांच्या पाण्याचा भरपूर पुरवठा असल्यामुळें तो सुपीक आहे. मुख्य पीक तांदूळ होय.

**शहरें–कटक** (४७)—हें महानदीचे कांठीं असून या देशांतील सर्वांत मोठें शहर आहे. **जगन्नाथ-पुरी**–एथील जगन्नाथाचें देवालय प्राचीन कालापासून फार प्रसिद्ध आहे. एथें मोठी यात्रा भरते.

## छोटानागपूर.

मध्यप्रांत व वहार यांचे मध्यें हा देश आहे. हा डोंगराळ असून यांतील वस्ती बहुतेक रानटी लोकांची आहे. हा प्रदेश किनाऱ्यापासून बराच दूर असून याच्या बऱ्याच भागांत डोंगर असल्यामुळें हा बहुतेक उंचवट्याचा आहे. **पारसनाथ** हा यांतील अतिशय उंच डोंगर होय. यास जैन लोक फार पवित्र मानतात. [ या देशांत पुष्कळ ठिकाणीं जंगलच आहे. कोळ, उरावण वगैरे जातींचे रानटी लोक या देशांत राहातात. ] जंगलांत तस्सर जातीचें रेशीम पुष्कळ सांपडतें; यासच कोशाचें रेशीम म्हणतात.

**शहरें–रांची व हजारीबाग** हीं मुख्य शहर आहेत.

**बंगाल प्रांताचा इतिहास**—१७६४ सालीं बक्सारचे लढाईंत वंगालच्या नवावाचा पराभव केल्यावर बंगाल, वहार व ओरिसाचा कांहीं भाग यांच्या दिवाणीची सनद इंग्लिशांना दिल्लीचे बादशहापासून मिळाली. तेव्हांपासून या प्रदेशावर इंग्लिशांचा अमल सुरू झाला. १८०३ सालीं ओरिसाचा बाकीचा भाग नागपूरच्या भोसल्यांपासून इंग्लिशांनीं घेतला.

---

# ५ पूर्वबंगाल व आसाम प्रांत.

## पूर्वबंगाल.

**सीमा**—उत्तरेस सिकीम संस्थान व भूतान; पूर्वेस आसाम व ब्रह्मदेश; दक्षिणेस वंगालचा उपसागर; पश्चिमेस बंगाल, वहार व नेपाळ.

**सुपीकपणा**—हा प्रदेश सखल व सपाट आहे व नद्यांचे पाण्याचा व पावसाच्या पाण्याचा त्यांत भरपूर पुरवठा आहे, यामुळें तो सुपीक आहे. **पिकें**—उत्तरभागीं ज्यूट व दक्षिणभागीं तांदूळ हीं महत्त्वाचीं पिकें होत.

**शहरें**—( बडीगंगा नांवाच्या गंगेच्या फाट्यावर) **डाका** ( ९० )—हें शहर पूर्वी कांहीं वर्षे बंगालच्या नबाबाची राजधानी होतें. एथील मलमलीची पूर्वी फार प्रसिद्धि होती. हल्लीं हें शहर पूर्व-बंगाल व आसाम प्रांताची राजधानी आहे. **बारिसाळ**—हें शहर ज्या जिल्ह्यांत आहे त्यांत तांदूळ इतका पिकतो कीं, त्यास कलकत्त्याच्या तांदुळाचें कोठार असें कधीं कधीं म्हणतात. **चितगांव**–(२४)–त्याच नांवाचे नदीवर–हें पूर्वबंगालमधील मुख्य बंदर होय. एथून तांदूळ व लाकूड हे जिन्नस मुख्यतः रवाना होतात. एथील गोदींत जहाजें तयार करितात.

## आसाम.

चहाचें आगर व अतिशय पावसाचा देश म्हणून हा देश प्रसिद्ध आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्याचा कांहीं प्रदेश ह्या देशांत येतो. **डोंगर**–उत्तरेकडे हिमालयाचे फाटे आहेत. मध्यभागीं **गारो, खाशीया, जयंतीया,** व **नागा** ह्या टेकड्या पश्चिमेकडून पूर्वेकडे गेल्या आहेत. ह्या टेकड्यांवर जंगल फार आहे. खाशीया टेकडीचें **शिलांग** हें अत्युच्च शिखर होय. [ उंची ६४५० फूट. ] एथील हवा थंड असल्यामुळें पूर्वबंगालचा ले० गव्हर्नर एथें कांहीं दिवस राहातो. शिलांगची वस्ती ७ हजार आहे. **पाऊस**—नैर्ऋत्येकडील मान्सून वारे वर सांगितलेल्या डोंगरांच्या दोन रांगांनीं अडविले गेल्यामुळें ह्या देशांत पाऊस फार पडतो. **हवा** उष्ण असून दमट आहे. अशाच प्रकारची हवा चहास लागते. एथें युरोपियन लोकांनीं पुष्कळ चहाचे मळे केले आहेत. त्यांत दरवर्षी सुमारें १० कोटी शेर चहा उत्पन्न होतो. जंगलांत तस्सर जातीचें रेशीम पुष्कळ सांपडतें. **खनिज द्रव्यें**—ह्या प्रांतांत दगडी कोळसा व लोखंड हीं पुष्कळ सांपडतात. कांहीं भागांत राकेल सांपडतें.

**शहरें**–**गोहत्ती**–हें ह्या प्रांतांतील मोठें शहर होय. तथापि याची लोकसंख्या फक्त १२ हजार आहे. [पूर्वेस] **शिवसागर**–हें शहर चहाचे मळ्यांच्या प्रदेशाच्या मध्यभागीं आहे. खाशिया टेकड्यांच्या दक्षिणेस **सिल्हेट** ( १४ )—एथील नारिंगें प्रसिद्ध आहेत. एथें बंगाली लोकांची वस्ती विशेष आहे. काचर प्रांतांत, **सिल्चर**–(८)–ह्या शहराचे नजीक चहाचे मळे पुष्कळ आहेत.

**आसामचा इतिहास**—हा प्रांत ब्रह्मदेशच्या राजापासून १८२६ सालीं इंग्रजांनीं घेतला.

---

**बंगाल प्रान्त व पूर्व बंगाल प्रान्त यांतील संस्थानें**–एकंदर ३८००० चौ० मैल क्षेत्रफळाचा मुलूख संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. त्यांतील लोकसंख्या २७ लक्ष आहे. संस्थानिकांच्या ताब्यांत जो प्रदेश आहे त्यांतील तीन चतुर्थांश भाग छोटानागपूर व ओरिसा ह्या देशांत आहे. **महत्त्वाचीं संस्थानें**–**सिकीम**–नेपाळ व भूतान यांच्यामध्यें; उत्पन्न १॥ लक्ष. **कुचबिहार**–भूतानचे दक्षिणेस; उत्पन्न २३ लक्ष. **मणिपूर**–आसाम व ब्रह्मदेश यांचेमध्यें. ह्यांतील प्रदेश डोंगराळ आहे.

---

# ६ मध्य प्रांत.

**सीमा**–उत्तरेस मध्य हिंदुस्तान एजन्सी, बुंदेलखंड आणि त्याचे पलीकडे संयुक्तप्रांत; पूर्वेस बंगाल इलाखा व उत्तर सरकार प्रांत; दक्षिणेस निजामचें राज्य; आणि पश्चिमेस मुंबई इलाख्यापैकीं खानदेश.

हा प्रदेश मध्यम उंचवट्याचा आहे. उत्तरेकडील प्रदेश डोंगराळ असून विशेष उंचवट्याचा आहे. **पिकें**–नर्मदेच्या कांठच्या प्रदेशांत व वऱ्हाडांत कापूस पुष्कळ पिकतो. छत्तीसगडचे मैदानांत पुष्कळ गहूं होतो. **खनिज पदार्थ**—दगडी कोळशाच्या खाणींविषयीं ह्या प्रांताची प्रसिद्धि आहे. ह्या प्रांतांत पुष्कळ ठिकाणीं जमिनींत लोखंड आहे. त्याच्या खाणी चालविण्याकरितां एक कंपनी नुकतीच स्थापन झाली आहे. **कारखाने**—या प्रांतांत कापसाच्या गिरण्या बऱ्याच आहेत. रेशीमकांठी उपरणीं व लुगडीं ह्यांविषयीं नाग-

पुराची ख्याति आहे. लुगडीं व जरीचें कापड ह्यांविषयां बऱ्हाण-पूर प्रसिद्ध आहे.

ह्या प्रांतांत गोंड, भिल्ल वगैरे लोकांची २० लक्ष वस्ती आहे. ह्या प्रांतांतील मूळच्या रहिवाशांना जिंकून गोंड लोकांनीं आपलें राज्य स्थापिलें. यामुळें ह्या प्रांतांतील कांहीं प्रदेशास 'गोंडवण' हें नांव प्राप्त झालें. गोंड राजांस मुसलमानांनीं जिंकिलें. गोंड राजांचीं अद्याप कांहीं संस्थानें आहेत.

**विभाग** [१] नागपूर, [२] जबलपूर, [३] छत्तीसगड, [४] नर्मदा व [५] वऱ्हाड असे ह्या प्रांताचे विभाग आहेत.

**शहरें—नागपूर** (१२८)–हें ह्या प्रांताची राजधानी आहे. ह्याच्या जवळ सिताबळदीची टेकडी असून तीवर किल्ला आहे. नागपूर एथें कापसाच्या गिरण्या पुष्कळ आहेत. ह्या शहरापासून १२ मैलांवर कामटी गांव आहे, तेथें फौजेची छावणी असते. नागपूरच्या दक्षिणेस **हिंगणघाट** गांव आहे. तें कापसाची मोठी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. हिंगणघाटाच्या आग्नेयीस, **चांदा** शहर आहे. तें पूर्वीं गोंड राजांची राजधानी होतें. जबलपूर विभागांत–**जबलपूर** (९०)— हें मोठें व्यापाराचें शहर व रेल्वे-जंक्शन आहे. जबलपुरापासून ११ मैलांवर नर्मदा नदी ज्या ठिकाणीं संगमरवरी खडकांतून वाहात गेली आहे, तें स्थळ फारच रम्य आहे. [ जबलपूरचे वायव्येस ] **सागर** ( ४६ )–हें एका सरोवराजवळ वसविलेलें सुंदर शहर आहे. त्यावरून त्यास सागर हें नांव पडलें आहे. **पंचमडी**–हें सातपुड्यांतील थंड हवेचें ठिकाण आहे. नर्मदा विभागांत–पश्चिमभागीं अशिरगड किल्ल्याजवळ **बऱ्हाणपूर** ( ३२ ) शहर आहे. तेथें मोंगलांच्या कारकिर्दींत फौजेची मोठी छावणी असे. एथील जरीचें कापड व लुगडीं हीं प्रसिद्ध आहेत. वऱ्हाडांत–मुख्य शहर **उमरावती** (३४)–एथें कापसाचा व्यापार मोठा चालतो. [ उमरावतीच्या उत्तरेस ] **एलिचपूर** ( ३६ )—हें बहामनी राज्यांपैकीं एका राज्याच्या राजधानीचें शहर होतें.

**इतिहास**—या प्रांताचा कांहीं भाग १८१८ सालीं रघोजी भोसले यांजकडून इंग्लिशांनीं जिंकून घेतला व कांहीं १८५३ सालीं नागपूरच्या भोसल्यांचें राज्य खालसा करून मिळविला.

**वऱ्हाड प्रांताचा इतिहास**—१७९८ सालीं झालेल्या तहांमध्यें निजामचे राज्याचे संरक्षणाकरितां इंग्लिशांनीं जें सैन्य ठेवण्याचें कबूल केलें होतें, त्याचे खर्चाकरितां हा प्रांत निजामानें इंग्लिशांस १८५३ सालीं दिला. त्यानंतर १९०३ सालीं निजाम व इंग्रज सरकार यांजमध्यें नवा करार होऊन दरसाल २५ लक्ष रुपये देण्याचे करारानें हा प्रांत इंग्लिश सरकारानें आपणांकडे कायमचा घेतला आहे.

---

## ७ मुंबई इलाखा.

**सीमा**—उत्तरेस पंजाब; पूर्वेस राजपुताना, मध्यप्रांत व निजामचें राज्य; दक्षिणेस म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा; पश्चिमेस अरबी समुद्र व हाला पर्वत [आणि या पर्वताचे पलीकडे बलुचिस्तान.]

**स्वाभाविक रचना**–सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश उंचवट्याचा आहे. बाकीचा प्रदेश सखल आहे. सिंधचा बहुतेक भाग वालुकामय प्रदेश आहे. **हवा**–सह्याद्रीचे पूर्वेकडील प्रदेशांत साधारण थंड, व बाकीच्या प्रदेशांत उष्ण आहे. **पिकें**—कोंकणांत तांदूळ हें मुख्य पीक होय. **देशांतील मुख्य पिकें** गहूं, ज्वारी, व बाजरी हीं होत. पैकीं उत्तरेस गहूं, दक्षिणेस ज्वारी व दरम्यानचे प्रदेशांत बाजरी हीं मुख्य पिकें होत. सिंध, गुजराथ, खानदेश व धारवाड जिल्हा या प्रदेशांत कापूस पिकतो. **खनिज संपत्ति**–**सोनें** धारवाड जिल्ह्यांत सांपडतें. **लोखंड** सह्याद्रीचे आसपास सांपडतें.

**विभाग**—१ सिंध, २ उत्तर भाग, ३ मध्य भाग, ४ दक्षिण भाग, आणि ५ मुंबई बेट.

**शहरें**–सिंध विभागांत **कराची** (११७) हें त्या विभागाचें मुख्य शहर होय. हें मुंबई इलख्यांतील दुसऱ्या नंबरचें व हिंदुस्तानांतील तिसऱ्या नंबरचें बंदर आहे. **हैदराबाद** [६९] सिंधूचे पूर्व तीरावर आहे. तें पूर्वीं सिंधच्या अमिरांची राजधानी होतें. हें व्यापाराविषयीं प्रसिद्ध आहे. गालिचांसंबंधानें या शहराची ख्याति आहे.

हैदराबादच्या उत्तरेस **मियानी** गांव आहे. तेथें सर चार्लस् नेपियरनें १८४३ सालीं अमिरांचा पराभव केला. **जाकोबाबाद**—या शहराइतका कडक उन्हाळा हिंदुस्तानांतील दुसऱ्या कोणत्याही शहरीं नसतो. उत्तर विभागांत—**अहमदाबाद** ( १८५ )—हें मुख्य शहर आहे. एथें लहान मोठ्या ३२ गिरण्या असून एथील रेशमी, सुती व किनखापाचें कापड फार प्रसिद्ध आहे. एथील जुन्या इमारती व देवालयें पाहाण्यासारखीं आहेत. **सुरत** (११९)—हें पूर्वीं प्रसिद्ध बंदर होतें. परंतु तापीचे पात्रांत गाळ सांचून तें उथळ झाल्यानें आतां त्यांत जहाजें येऊं शकत नाहींत. इंग्लिशांनीं आपली पहिली वखार १६१२ सालीं एथेंच स्थापन केली होती. हल्लींही हें मोठें व्यापाराचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. एथें जरीचे व किनखापाचे कारखाने आहेत. मध्य विभागांत–**नाशिक** (२१)–हें गोदावरीचे कांठीं प्रसिद्ध क्षेत्र असून एथें दरवर्षी पुष्कळ यात्रेकरू येतात. मध्यभागाचें मुख्य शहर **पुणें** (१५३)–हें पूर्वीं पेशव्यांची राजधानी होतें. यामुळें विद्या, कला, चालरीत, शुद्ध व सभ्य भाषा इत्यादि गोष्टींसंबंधानें तें सर्व मराठी जिल्ह्यांचें नाकें आहे. इतर मराठी जिल्ह्यांतील लोक सामान्यतः पुणें शहराचें अनुकरण करितात. हें शहर मुंबई शहरानजीक असून एथील हवा चांगली असल्यामुळें मुंबईचे गव्हर्नर व त्यांचे अधिकारी वर्षांतून चार महिने एथें राहातात. **सातारा** (२६)–पुण्यापूर्वीं हें शहर मराठी राज्याची राजधानी होतें. शिवाजी राजाचे वंशज अद्याप साताऱ्यास आहेत. (दक्षिणभागांत) **विजापूर** (२४)-हें शहर बहामनी राज्यांपैकीं एका राज्याची राजधानी होतें. त्या वेळीं या शहराची वस्ती मुंबईच्या दुप्पट होती असें म्हणतात. एथें जुन्या इमारती पुष्कळ असून त्यांपैकीं कांहीं फार भव्य आहेत. एथील इमारतींसारख्या पाहाण्यालायक इमारती मुंबई इलाख्यांतील दुसऱ्या कोणत्याही शहरीं नाहींत. एथील गोलघुमट ही इमारत बांधण्यांत अशी खुबी केली आहे कीं, तिच्या आंत एका बाजूस उभें राहून एकादा शब्द हळूच उच्चारला, तर तो समोर ७५ हातांवर बसलेल्या मनुष्यास जशाचा तसा ऐकूं येतो. ( मुंबई बेटांत ) **मुंबई**—हें शहर

मुंबई इलाख्याची राजधानी आहे. याची वस्ती सुमारें ९ लक्ष असून हें मोठें बंदर असल्यामुळें जगांतील महत्त्वाच्या शहरांपैकीं एक आहे. एथें मोठमोठ्या व्यापाऱ्यांची व कारखानदारांची वस्ती असून लोक फार संपन्न आहेत. मुंबई बंदर जगांतील अत्यंत प्रशस्त व सुरक्षित बंदरांपैकीं आहे. हें सर्व प्रकारच्या व सर्व देशांहून आलेल्या गलबतांनीं नेहमीं गजबजलेलें असतें. एथें सर्व प्रकारच्या मिळून सुमारें दोनशें गिरण्या आहेत. **थंड हवेचीं ठिकाणें (१)—महाबळेश्वर—** हें साताऱ्यापासून ३० मैलांवर सह्याद्रीच्या एका शिखरावर आहे. याची उंची ४॥ हजार फूट असल्यामुळें व एथें झाडी पुष्कळ असल्यामुळें एथील हवा उन्हाळ्यांत मजेदार थंड असते. म्हणून एथें गव्हर्नर साहेब, मोठे युरोपियन अधिकारी व श्रीमंत लोक हवा खाण्याकरितां उन्हाळ्यांत येतात. शिवाजीच्या इतिहासांतील प्रसिद्ध प्रतापगड किल्ला महाबळेश्वराजवळच आहे. **माथेरान** (२)–हें सह्याद्रींतच आहे. तें मुंबईपासून जवळ असल्यामुळें मुंबईचे पुष्कळ श्रीमंत लोक तेथें हवेसाठीं जातात. त्याची उंची २५०० फूट आहे.

**संस्थानें**—या इलाख्यांत लहान मोठीं मिळून सुमारें ३॥ शें संस्थानें आहेत. पैकीं पुष्कळ संस्थानें फार लहान आहेत. बाकीच्या संस्थानांत बडोदें संस्थान फार मोठें आहे. हें संस्थान हिंदुस्तान सरकाराचे ताब्याखालीं असल्यामुळें त्याचें वर्णन स्वतंत्र स्थळीं दिलें आहे. इतर संस्थानांत कोल्हापूर, भावनगर, नवानगर, जुनागड, कच्छ व पालनपूर, हीं मुख्य आहेत.

| | क्षेत्रफळ | लोकसंख्या (लाख) | उत्पन्न (लाख) | राजाची जात. |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर | ३००० | ९० | ४५ | मराठा. |
| भावनगर | २८६० | ४ | ३५ | रजपूत. |
| नवानगर | ४००० | ३ | २५ | रजपूत. |
| जुनागड | ३२८३ | ४ | २१ | मुसलमान. |
| कच्छ | ६५०० | ६ | १६ | रजपूत. |
| पालनपूर | ३१५० | २॥ | ५ | मुसलमान. |

# ८ मद्रास इलाखा.

**सीमा**—उत्तरेस मुंबई इलाखा, निजामचें राज्य, मध्यप्रांत व ओरिसा; बाकीच्या तिन्ही बाजूंस समुद्र आहे. आकार—त्रिकोणाकृति आहे.

**सखल मैदानें**:–सैबेरिया, पश्चिम तार्तरी (बालकाश सरोवरापासून कास्पियन समुद्रापर्यंतचा प्रदेश), सिंधु व गंगा या नद्यांचे कांठचा प्रदेश, टांकिनचे आखातापासून सयामचे आखातापर्यंतचा प्रदेश, व चीनचा पूर्व भाग. टैग्रिस व युफ्राटिस नद्यांचे कांठचा कांहीं भाग व मार्ताबानचे आखाताजवळील ब्रह्मदेशचा भाग हे कमी महत्त्वाचे सखल प्रदेश आहेत.

**वाळवंटें**—अरबस्तानांतील वाळूचें मैदान, इराणांतील खारें मैदान, गोबीचें प्रचंड वाळवंट, हीं सर्व वाळवंटें मिळून एक लांबच्या लांब पूर्व-पश्चिम पट्टा होतो. या प्रदेशांत शहरें कमी आहेत, यावरून तो नापीक असावा असें समजून येतें.

**नापीक प्रदेश**—वरील वाळवंटें, सैबेरियाचा बहुतेक उत्तर भाग (त्यांत थंडी अतिशय असते म्हणून), व पश्चिम तार्तरीचा बराच भाग हे नापीक प्रदेश आहेत.

**आशियाच्या किनाऱ्याची इतर खंडांचे किनाऱ्याशीं तुलना**:—आफ्रिकेपेक्षां या खंडाचा किनारा थोडा जास्त वेडावांकडा आहे. परंतु इतर खंडांचे मानानें या खंडाच्या किनाऱ्यास खांडी थोड्या आहेत. पूर्वेकडचा व दक्षिणेकडचा किनारा बराच वेडावांकडा असून त्यास पुष्कळ खांडी असल्यामुळें त्या बाजूंना बंदरें बरींच आहेत. सर्व वळणें धरून किनाऱ्याची लांबी ५१ हजार मैल आहे. उत्तरेकडील व ईशान्येकडील किनाऱ्याजवळचा समुद्र गोठत असल्यामुळें त्याचा व्यापारास मुळींच उपयोग होत नाहीं.

**भूशिरें**:–अतिशय उत्तरेकडील टोंक **चेलुस्किन** भूशिर हें होय. अतिशय पूर्वेकडील टोंकास **पूर्वभूशिर** म्हणतात. अतिशय दक्षिणेकडचें टोंक मॅले द्वीपकल्पांत **रोमानिया** हें आहे. हिंदुस्तानचे दक्षिणेस **कामोरिन** भूशिर आहे. अतिशय पश्चिमेकडील भूशिर **बाबा** हें आशिया मायनरमध्यें आहे.

**इतर भूशिरें**:–काम्चाट्काचे दक्षिणेस **लोपाटका**, कोचिन चायनाचे दक्षिणेस **कांबोडिया**, ब्रह्मदेशांतील पेगू प्रांताचे नैर्ऋत्येस **नेग्रेइस**, व अरबस्तानचे पूर्वेस **रासेल-हद**.

§ **समुद्र, आखातें, उपसागर, सामुद्रधुन्या, बेटें वगैरे***—

**उत्तरेस**—मुख्य समुद्र **आर्क्टिक** असून त्याचे फाटे **कारा समुद्र, ओबीचें आखात** व **येनिसेईचें आखात** हे आहेत. आर्क्टिक महासागरांत **लियाकोव्ह** बेटें आहेत. या बेटांत पूर्वी हत्तीसारखे परंतु हत्तीहून मोठे प्राणी राहात असत. त्यांचे मोठमोठाले दांत व हाडें जमीन खणीत असतां कधीं कधीं आढळतात.

**पूर्वेस**—**पासिफिक** महासागर असून त्याचे ( १ ) **बेहरिंगचा** अथवा **कामूचाट्काचा समुद्र**, ( २ ) **ओखाट्स्कचा समुद्र**, ( ३ ) **जपानचा समुद्र**, (४) **पीत समुद्र** व (५) **चिनी समुद्र** असे पांच भाग आहेत. या पांचही समुद्रांचे पूर्व बाजूस बेटांची मालिका आहे. ( १ ) बेहरिंगचे समुद्राचा **बेहरिंगच्या सामुद्रधुनीनें** आर्क्टिक समुद्राशीं संयोग झाला आहे. या समुद्राचे पूर्वेस **अल्यूशन** बेटें आहेत. ( २ ) ओखाट्स्कच्या समुद्राचे पूर्वेस **कूरिल** बेटें आहेत. ( ३ ) जपानच्या समुद्राचे पूर्वेस **सॅघॅलिन** व **जपानचीं बेटें** आहेत. जपानचा समुद्र ओखाट्स्कचे समुद्रास ला **पेरूजचे सामुद्रधुनीनें** जोडला आहे. ( ४ ) पीत समुद्राचे पूर्वेस **रियु कीयु** अथवा **लूचू** बेटें आहेत. हा समुद्र व जपानचा समुद्र यांचेमध्यें **कोरियाची सामुद्रधुनी** आहे. ( ५ ) चिनी समुद्राचे पूर्वेस **फोर्मोसा** व **फिलिपाईन** बेटें आहेत. चिनी समुद्राचा उत्तर भाग व दक्षिण भाग यांचेमध्यें **फोर्मोसाची सामुद्रधुनी** आहे. या समुद्रांत **टाँकीन** व **सयाम** हीं मोठीं आखातें आहेत. टाँकिनच्या आखातांत **हैनान** बेट आहे.

**दक्षिणेस**—मुख्य समुद्र **हिंदीमहासागर** असून त्याचे **बंगालचा उपसागर** व **अरबी समुद्र** असे दोन भाग आहेत. या दोन भागांचे मध्यें हिंदुस्तानचा दक्षिण भाग आहे. बंगालचा उपसागर **मलाकाच्या सामुद्रधुनीनें** चिनी समुद्राशीं जोडला गेला आहे. या उपसागराचे

---

§ समुद्र, आखातें, सामुद्रधुन्या, बेटें ह्यांसंबंधानें माहिती निरनिराळ्या सदरांखालीं देण्याची कांहीं पुस्तकांत वहिवाट आहे. परंतु यांचा परस्परांशीं निकट संबंध असतो, यास्तव तीं वेगवेगळालीं देणें बरोबर नाहीं. वरील वर्णनांत त्यांचा स्वाभाविक संबंध राखून माहिती दिली आहे.

पूर्वभागीं **मार्तीबानचें आखात** आहे. बंगालच्या उपसागरांत **अंदमान** व **निकोबार** हीं बेटें आहेत. **सिलोन बेट** हिंदुस्तानचे दक्षिणेस असून हें बेट व हिंदुस्तान ह्यांचेमध्यें **मानारचें आखात** व **पाल्कची सामुद्रधुनी** आहे. ही सामुद्रधुनी मानारचें आखात व बंगालचा उपसागर यांचा संयोग करिते. अरबी समुद्राचे दोन मुख्य भाग **इराणचें आखात** ( किंवा **इराणचा समुद्र** ) व **तांबडा समुद्र** हे होत. इराणचे समुद्रांत दक्षिणेकडून शिरतांना प्रथम **ओमानचें आखात** लागतें. हें आखात व इराणचा समुद्र यांचे मध्यें **आर्मझची सामुद्रधुनी** आहे. तांबड्या समुद्राचे तोंडाशीं **एडनचें आखात** असून त्या दोहोंच्यामध्यें **बाबेल मांडेबची सामुद्रधुनी** आहे. अरबी समुद्रांत **लखदीव** व **मालदीव** हीं बेटें आहेत.

बाबेल मांडेब याचा अर्थ अश्रूंची वेस असा आहे. या सामुद्रधुनींतून जाणें फार धोक्याचें आहे व हींतून जातांना आजपर्यंत पुष्कळ जहाजें बाजूच्या खडकांवर आपटून फुटलीं आहेत. म्हणून वरील नांव या सामुद्रधुनीस दिलें आहे.

**पश्चिमेस**—भूमध्यसमुद्राचे भाग **लीव्हँट**, **मार्मोराचा समुद्र**, व **काळा समुद्र** हे आहेत. लीव्हँटमध्यें **सायप्रस** बेट आहे. आशिया मायनरचे पश्चिमेस आर्किपेलॅगो नांवाचा बेटांचा समूह आहे.

**द्वीपकल्पें***—पूर्वेस काम्‌चाट्का व कोरिया. दक्षिणेस इंडो चायना (याचे दक्षिण फाट्यास मॅले द्वीपकल्प म्हणतात), हिंदुस्तान व अरबस्तान. पश्चिमेस काळा समुद्र व भूमध्यसमुद्र यांमध्यें आशिया मायनर. आशिया खंडांतील बहुतेक द्वीपकल्पांचीं टोंकें दक्षिणेकडे आहेत.

**संयोगिभूमि***–आशिया व आफ्रिका यांचेमध्यें सुएजची संयोगिभूमि आहे. तिच्यामधील सुएजच्या कालव्यामुळें ती सामुद्रधुनी झाली आहे.

**नद्या***—पूर्वगोलार्धांतील कोणत्याही खंडांत आशिया खंडांतील नद्यांएवढ्या मोठ्या नद्या नाहींत. या खंडांतील बहुतेक मोठ्या नद्यांचा उगम या खंडाच्या मध्यभागचे उंचवट्याचे प्रदेशांत होतो. तेथून त्या चाऱ्ही दिशांनीं वाहात गेल्या आहेत. पैकीं उत्तरेकडे व पूर्वेकडे वाहाणाऱ्या नद्या फार लांब आहेत, आणि पश्चिमेकडे व वाय-व्येकडे वाहाणाऱ्या नद्या सर्वांत कमी लांब आहेत. आशियांतील

बऱ्याच नद्या जोडीजोडीनें वाहातात. अशा नद्या पुढील होतः- ओबी व इर्तिश, होहँगहो व यांगत्सीकँग, सरदारिया व अमूदारिया, टैग्रिस व युफ्राटिस, गंगा व ब्रम्हपुत्रा.

**उत्तरवाहिनी नद्या**—**ओबी** (२६००) व तिला मिळणारी **इर्तिश**, **येनिसेई** (३२००) आणि **लेना** (३०००) या आर्क्टिक समुद्रास मिळतात. या नद्यांचें पाणी वर्षांतून बरेच दिवस गोठून राहातें; यामुळें त्यांचा जलमार्ग या नात्यानें उपयोग होत नाहीं.

**पूर्ववाहिनी**—**अमूर (३०००)**, **हो-हँग-हो (२६००)**, **यांगत्सीकँग** (३२००), **सिकांग** (११००), या पासिफिक समुद्रास मिळतात.

**दक्षिणवाहिनी**—**मेकांग** ऊर्फ **कांबोडिया** (१६००) चिनी समुद्रास मिळते. **इरावती** (१२००), **ब्रह्मपुत्रा** व **गंगा** बंगालच्या उपसागरास मिळतात. **सिंधु** अरबी समुद्रास मिळते. **युफ्राटिस** (१७००) व **टैग्रीस** (११००) यांचा संगम होऊन त्या इराणचे आखातास मिळतात.

**मध्यभागच्या नद्या**—**जक्झार्टिस** अथवा **सरदारिया**, **आक्सस** अथवा **अमूदारिया** या नद्या अरलचे समुद्रास मिळतात. **उरल** नदी कास्पियन समुद्रास मिळते. पूर्व तार्तरींतील **टारिम** नदी लाब नार सरोवरास मिळते.

होहँगहो, यांगट्सीकॅग यांचे, तसेंच गंगा, ब्रह्मपुत्रा व सिंधु यांचे आणि टैग्रिस व युफ्राटिस यांचे उगम शेजारीं शेजारीं आहेत.

**सरोवरें***—**कास्पियन** यास समुद्र म्हणतात, परंतु त्याचे चोहोंबाजूनें जमीन असल्यामुळें तें खरोखर खाऱ्या पाण्याचें सरोवर आहे. याच्याएवढें विस्तीर्ण सरोवर पृथ्वीवर दुसरें नाहीं. कास्पियनचे पूर्वेस ओळीनें **अरल** व **बाल्काश** हीं सरोवरें आहेत. पूर्वी आर्क्टिक समुद्राचा एक फाटा कास्पियन समुद्रापासून ओबीचे आखातापर्यंत पसरला होता. या फाट्याचें पाणी उत्तरेस हटून तेथें जमीन झाली, व या प्रदेशापैकीं जे भाग खोल होते त्यांमध्यें सांचलेलें समुद्राचें पाणी राहून वरील सरोवरें बनलीं. बाल्काशचे ईशान्येस बऱ्याच अंतरावर **बैकल** सरोवर आहे. याचें पाणी गोड असून याचे इतकें खोल सरोवर पृथ्वीवर दुसरें नाहीं.

कास्पियन, अरल, बाल्काश, व बैकल हीं सरोवरें क्रमानें एकापेक्षां एक उंच अशीं आहेत.

**इतर सरोवरें**—बाल्काशचे दक्षिणेस **इस्सिक् कुल**, पूर्व तार्तरींत **लाब नार,** तिबेटांत **मानस** व **तेंग्रि नार**, इराणांत **युरुमियः**, आशियाः मायनरमध्यें **तुझ्गोल** व **मृतसमुद्र** इत्यादि इतर सरोवरें आहेत. तुझगोल याचें पाणी अतिशय खारट आहे. मृतसमुद्र अतिशय सखल आहे. त्याचा पृष्ठभाग समुद्रसपाटीपासून १३०० फूट खोल आहे. मृतसमुद्राचें पाणी इतकें खारट आहे कीं, त्यांत मासेदेखील जगूं शकत नाहींत, व कांठीं झाडेंही उगवत नाहींत.

**हवा**—हें खंड विषुववृत्तापासून जवळ जवळ ध्रुवापर्यंत पसरलें असल्यामुळें त्यांत हवेचे सर्व प्रकार आढळून येतात. इतके प्रकार इतर खंडांत आढळून येत नाहींत. या खंडांत कांहीं ठिकाणीं हवामान १२० अंशांचें असतें, तर कांहीं ठिकाणीं तें उणे पन्नास अंश ही असतें. †

हवामानासंबंधानें या खंडाचे मुख्य ३ भाग होतात. ते येणें-प्रमाणें—[ १ ] **उत्तरेकडील पट्टा**—आशिया खंडाच्या मध्यभागच्या उंचवट्याचे प्रदेशाचे उत्तरेकडील प्रदेश या पट्ट्यामध्यें येतो. हा प्रदेश विषुववृत्तापासून फार दूर असल्यामुळें यांतील हवा फार थंड आहे. या प्रदेशांतील नद्यांचें पाणी वर्षांतून ९ महिने गोठलेलें राहातें. पुष्कळ ठिकाणीं तर थंडीच्या दिवसांत पारा शून्य अंशाचे खालीं ३० पासून ५० अंशांपर्यंत असतो. [ २ ] **दक्षिणेकडील पट्टा**—हिमालयाचे दक्षिणेकडील सर्व प्रदेश या भागांत येतो.

---

† फॅरनहीटच्या उष्णतामापक यंत्रांत ३२ पासून २१२ पर्यंत अंश मांडलेले असतात. यावरून ह्यापेक्षां कमी किंवा जास्ती अंशांची उष्णता असूं शकत नाहीं असें समजावयाचें नाहीं. थंडी उणे ३ शें ते ४ शें अंशांपर्यंतही उत्पन्न करितां येते. बर्फाची उष्णता ३२ अंश असते; पुण्यास थंडीच्या दिवसांत कमींत कमी उष्णता [ म्हणजे जास्तींत जास्ती थंडी ] ४२-४३ अंश व जास्तींत जास्ती १०८ असते; व आपल्या अंगाची उष्णता ९८॥ अंश असते; या गोष्टींवरून वरील उणे अंशांची कल्पना करावी.

हा भाग विषुववृत्ताचे जवळ आहे, व यांतून विषुववृत्ताकडून वाहात येणारे मान्सून वारे वाहातात; म्हणून यांतील हवा उष्ण व दमट आहे. [ ३ ] मधला पट्टा—अरबस्तानापासून पूर्वेकडे अमूरनदी-पर्यंतचा प्रदेश या भागांत येतो. या भागाची उत्तर सीमा आलताई पर्वत होय. मान्सून वारे शुष्क होऊन या भागांत येतात. यामुळें त्यांत पाऊस फारच थोडा पडतो. या कारणानें यांतील हवा फार कोरडी † आहे. तसेंच हा भाग विषुववृत्तापासून बराच दूर आहे, व या भागांतील बहुतेक प्रदेश फार उंचवट्याचे आहेत, म्हणून यांतील हवा थंड आहे. परंतु या प्रदेशांपैकीं जे भाग सखल किंवा थोड्या उंचीचे आहेत, त्यांतील हवा उष्ण आहे. तांबड्या समुद्राचे कांठचा प्रदेश व इराणाचे आखाताभोंवतालचा प्रदेश हे अशांपैकीं होत.

विस्तीर्ण भूमिप्रदेशाच्यामध्यें व अर्थात् समुद्रापासून दूर असे जे प्रदेश असतात, त्यांचे निरनिराळ्या ऋतूंतील हवामानांमध्यें फार फरक पडतो, असा नियम आहे. यामुळें आशियाच्या मध्यभागीं व पश्चिमभागीं उन्हाळा व हिंवाळा हे ऋतु ज्या मानानें कडक असतात, त्या मानानें ते पूर्वभागीं नसतात. अरबस्तानांतील उन्हाळा फारच कडक असतो.

आशिया खंडाच्या मध्य भागच्या कांहीं प्रदेशांत हिंवाळ्याचे व उन्हाळ्याचे उष्णमानामध्यें १०० ते १२० अंशांपर्यंत फरक असतो. [ हिंदुस्तानांत हा फरक जास्तींत जास्ती ७० ते ८० अंश आहे. ] सैबेरियांतील याकुतस्क या शहरीं उन्हाळ्यांत उष्णतामान ६२ व हिंवाळ्यांत उणे ४० अंश असतें. म्हणजे फरक सुमारें १०० अंश असतो. याच अक्षांशावर समुद्रास लागून जीं शहरें युरोपांत आहेत, तेथें हा फरक फक्त २० किंवा ३० अंश असतो. जों जों समुद्राकडे जावें तों तों हा फरक कमी होत जातो. उदाहरणार्थ, हाच फरक ओबीचे आखाताशेजारीं फक्त ५० अंश असतो.

**पाऊस**—समुद्रावरून वाहात येणारे नैर्ऋत्येकडील मान्सून वारे ईशान्येकडे वाहात असल्यामुळें, जे किनाऱ्याजवळील प्रदेश नैर्ऋ-

---

† कोरडी=जीमध्यें पाण्याची वाफ फार कमी आहे अशी. अशा प्रकारची हवा आपलेइकडे थंडीचे दिवसांत असते.

त्यभिमुख आहेत, त्यावरून हे वारे प्रथम जातात; म्हणून त्यांत पुष्कळ पाऊस पडतो. असे देश म्हणजे हिंदुस्तानचा पश्चिम किनारा, बंगाल व ब्रह्मदेश हे होत.

अरबस्तान, इराण वगैरे देशांतील हवा उन्हाळ्यांत फार तापलेली असते. म्हणून तेथें ढग आले तरी त्यांची फिरून वाफ होऊन जाते. यामुळें या वाऱ्यांपासून वरील देशांस पाऊस मिळत नाहीं.

हिमालय पर्वताच्या योगानें मान्सून वारे अडविले गेल्यामुळें हिमालयाच्या दक्षिण उतरणीवर पाऊस पुष्कळ पडतो; परंतु हिमालयाचे उत्तरेकडील प्रदेशांत पाऊस फारच थोडा पडतो. अरल समुद्राच्या उत्तरेकडील मैदानांत कधीं कधीं सबंध वर्षांत पाऊस पडत नाहीं.

**सुपीकपणा**—भूमीचा सखलपणा व सपाटपणा, मुबलक पाऊस, आणि उष्ण हवा या कारणांमुळें दक्षिणेकडील व आग्नेयीकडील सखल मैदानें फार सुपीक आहेत. सैबेरियांत थंडी व बर्फ हीं फार असतात; यामुळें तो प्रदेश जरी सखल मैदानाचा आहे, तरी सुपीक नाहीं.

**पिकें**—उष्ण व दमट हवा, किंवा उष्ण हवा व पुष्कळ पाऊस, या गोष्टी वनस्पतींचे वृद्धीस विशेष आवश्यक आहेत. म्हणून या खंडाचे दक्षिकडील व आग्नेयीकडील भागांत पुष्कळ प्रकारचीं झाडें व धान्यें होतात.

दक्षिण भागांतील हवा उष्ण असल्या कारणानें तांदूळ, ज्वारी बाजरी, कापूस, ऊस हीं त्यांतील मुख्य पिकें होत. थंड हवेच्या मध्य प्रदेशांतील मुख्य पिकें गहूं, सातू व ओट हीं आहेत. अगदीं उत्तरेकडल्या प्रदेशांत हवा अतिशय थंड असून तेथील जमीन बर्फानें आच्छादलेली असते. या कारणानें तेथें शेवाळ व लहान झुडपें यांशिवाय इतर वनस्पति उत्पन्न होत नाहींत. या खंडांतील अगदीं दक्षिणेकडील उष्ण हवेचे देश (स्ट्रेट्स् सेटलमेंट्स्, मलाया द्वीपकल्प, ईस्ट इंडीज बेटें इत्यादि) मसाल्यांविषयीं प्रसिद्ध आहेत. याच भागांत नारळांचें उत्पन्न बरेंच आहे. हिंदुस्तान, चीन, जपान, सिलोन या देशांत चहा पुष्कळ पिकतो. अरबस्तानांत व हिंदुस्तानच्या अगदीं दाक्षिणेकडील भागांत कॉफी होते. हिंदुस्तानांत नीळ पुष्कळ पिकते. अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान हे देश

द्राक्षें, खारका वगैरे फळांविषयीं प्रसिद्ध आहेत. ह्या फळांचें मूळ उत्पत्तिस्थान हेंच प्रदेश होत असें म्हणतात.

**प्राणी**—चतुष्पाद प्राण्यांचे बहुतेक सर्व प्रकार या खंडांत आढळतात. हिंस्र पशु, विषारी सर्प व सुंदर पिसाऱ्याचे पक्षी यांविषयीं या खंडाची प्रसिद्धि आहे. (१) **दक्षिणेकडील व आग्नेयीकडील प्रदेश**—या प्रदेशांत प्राण्यांची विशेष समृद्धि आहे. हत्ती, गेंडा, सिंह, वाघ, अस्वल, तरस, कोल्हा, माकड, रानडुक्कर, सांवर, काळवीट, अनेक प्रकारचीं हरणें, खोकड, ससा, व अनेक प्रकारचे सुंदर पक्षी ( मोर, पोपट वगैरे ) हे या प्रदेशांतील विशेष प्राणी होत. हवा उष्ण असून जेथें मोठालीं जंगलें आहेत, अशा भागांत हत्ती असतात. म्हणून हे हिंदुस्तान, सिलोन, ब्रह्मदेश, सयाम या देशांत आढळतात. **आग्नेयीकडील प्रदेशांत** रेशीम उत्पन्न होतें. कारण, या प्रदेशांतील हवा रेशमाचे किड्यांना मानवते, व रेशमाचे किडे ज्या तुतीच्या झाडांच्या पानांवर जगतात तीं झाडें या प्रदेशांतच विशेष होतात. (२) **मध्य प्रदेश**—आशियाच्या मध्यभागच्या पट्ट्यांत गवताळ प्रदेश फार आहेत; म्हणून गवत खाणारे व रवंथ करणारे प्राणी या प्रदेशांत मुख्यतः आढळतात. घोडा, गाढव, उंट, बैल, हरिण, बकरीं व मेंढरें हीं जनावरें या प्रदेशांत पुष्कळ आहेत. अरबस्तान व इराण हे देश घोड्यांविषयीं विशेष प्रसिद्ध आहेत. (३) **उत्तर प्रदेश**—उत्तरेकडील प्रदेशांत हवा फार थंड असल्याकारणानें मऊ, दाट व ऊबदार केसांच्या कातडीचे प्राणी तेथें विशेष आढळतात. कारण, थंड हवेंत अशा प्राण्यांचाच निभाव लागतो.

**खनिज पदार्थ**—**सोनें** सैबिरिया [ विशेषतः आलताई पर्वताचे आसपासचा भाग ], तिबेट व हिंदुस्तान या देशांत सांपडतें. **रुपें** सैबेरिया, चीन, जपान या देशांत सांपडतें. **लोखंड** हिंदुस्तान, चीन, जपान या देशांत सांपडतें. **तांबें** सैबेरिया, जपान, चीन या देशांत सांपडतें. **कथील** मॅले द्वीपकल्पांत सांपडतें. **दगडी कोळसा** जपान, चीन, हिंदुस्तान या देशांत सांपडतो. **राकेल** ब्रम्हदेश व काकेशिआ या देशांत सांपडतें.

**शिसपेन्सलीचे दगड** सिलोन, सैबेरिया या देशांत सांपडतात. **हिरे** हिंदुस्तान व सैबेरिया या देशांत सांपडतात. **माणकें व इंद्रनील** ब्रह्मदेश व सिलोन या देशांत सांपडतात. **मिठाच्या खाणी** हिंदुस्तान [ पंजाब ], आशिया मायनर, सैबेरिया या देशांत आहेत.

वरील माहितीवरून खनिज संपत्तींत सैबेरियाचा नंबर पहिला आहे असें दिसून येईल. तसेंच या खंडाच्या पश्चिमार्धापेक्षां पूर्वार्धांत खनिज संपत्ति जास्त आहे असेंही दिसून येईल.

**मोतीं** —कांहीं प्रकारच्या शिंपल्यांतील किडे मोतीं तयार करितात. असे शिंपले इराणच्या आखातांत व सिलोनचे आसपास सांपडतात.

**कलाकौशल्य**—या खंडामध्यें सैबेरिया खेरीजकरून जे जे नदीच्या कांठचे सखल व सुपीक प्रदेश आहेत, तेथें प्राचीनकाळीं मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं; म्हणून अशा भागांत प्राचीनकाळचीं प्रसिद्ध शहरें असून हे भाग प्राचीन तऱ्हेच्या कलाकौशल्याविषयीं प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारचे प्रमुख देश चीन, हिंदुस्तान, ब्रह्मदेश, आणि तैग्रीस व युफ्रातीस या नद्यांच्या कांठचा प्रदेश हे होत.

लोकरीचीं व रेशमी वस्त्रें, कलाबतूचें काम, नकशीचें व जडावाचें काम यांविषयीं आशिया मायनर, इराण, हिंदुस्तान, व चीन या देशांची प्रसिद्धि आहे. मातीचीं भांडीं, मिन्याचें काम व साधारणतः सर्व हस्तकौशल्याचीं कामें यांविषयीं चीन व जपान हे देश फार प्रसिद्ध आहेत.

**लोकवस्ती**—या खंडांत लोकवस्ती सुमारें ८६ कोट आहे. ही संख्या हिंदुस्तानांतील लोकसंख्येच्या सुमारें तिप्पट आहे. लोकवस्तीचें प्रमाण दर चौ० मैलीं ५० च्या वर आहे. पूर्वेकडील व आग्नेयीकडील भाग सुपीक असल्यामुळें त्यांत वस्ती फार दाट आहे. उत्तरेकडील भागांत वस्ती विरळ आहे. हिंदुस्तान, चीन, व जपान या देशांत मिळून सर्व आशिया खंडांतील लोकांपैकीं सुमारें सात अष्टमांश लोक आहेत. चीनच्या कांहीं भागांत वस्ती जितकी दाट आहे, तितकी ती पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही तेवढ्या मोठ्या भागांत नाहीं.

**लोकांच्या जाती**—या खंडाच्या पश्चिम टोंकापासून तों हिंदुस्तानापर्यंतच्या सर्व देशांतील लोक **कॉकेशिअन** वंशाचे आहेत. या प्रदेशांतील लोकांपैकीं अरबी लोक मात्र निराळ्या धंशाचे आहेत. या

खंडाच्या पूर्वभागांतील व उत्तरभागांतील लोक मंगोलियन जातीचे आहेत. मॅले द्वीपकल्प व शेजारचीं बेटें एथील लोक मॅले जातीचे आहेत.

**धर्म**—बौद्ध, हिंदू, मुसलमानी, व ख्रिस्ती हे या खंडांतील मुख्य धर्म होत. बौद्धधर्मी लोकांची संख्या ५० कोट आहे. हिंदुधर्मी लोकांची संख्या २० कोट व मुसलमानधर्मी लोकांची संख्या १० कोट आहे. हिंदुधर्मी लोक हिंदुस्तानांत आहेत. हिंदुस्तानापासून पश्चिमेकडे या खंडांत मुख्यतः मुसलमानांची वस्ती आहे. पूर्वेकडील व आग्नेयीकडील भागांत मुख्यतः बौद्धधर्मी लोक आहेत. ख्रिस्ती लोक हिंदुस्तानांत व आशिया मायनरमध्यें आहेत.

**लोकस्थिति**—युरोपखंडांतील लोकांप्रमाणें या खंडांतील लोक आपली सुधारणा करण्याविषयीं झटत नाहींत. विद्या व कलाकौशल्य यांमध्यें युरोपियन लोकांत सुधारणा झपाट्यानें होत आहे; परंतु या खंडांतील बरेच लोक शेंकडों वर्षांपूर्वीं होते तसेच राहिले आहेत. मात्र जपानी लोकांनीं अलीकडे ४०।५० वर्षांत फारच सुधारणा केली आहे. ती इतकी कीं, ते युरोपियन लोकांच्या बरोबरीचे झाले आहेत.

**दळणवळणाचीं साधनें**—रशियाचें राज्य, हिंदुस्तान, चीनचा कांहीं भाग व जपान यांत आगगाड्यांचे रस्ते आहेत. गाड्यांचे साधे रस्ते हिंदुस्तानांत पुष्कळ आहेत, व चीनच्या कांहीं भागांत आणि सैबेरियांत बरेच आहेत. चीनमध्यें नावांना जाण्यायेण्यास उपयोगी पडणारे कालवे पुष्कळ आहेत. बाकीच्या प्रदेशांत चांगले प्रशस्त रस्ते फारसे नाहींत. म्हणून मालाची नेआण बहुशा उंट व घोडीं यांवरून होते. तारायंत्रें हिंदुस्तान, जपान, चीन व रशियाचें राज्य या भागांत आहेत.

**व्यापार**—ह्या खंडाच्या पूर्व भागाचा व्यापार अमेरिकेशीं विशेष होतो. दक्षिणेकडील व पश्चिमेकडील देशांचा व्यापार युरोपखंडाशीं होतो. या खंडांतील सर्व देशांचा एकमेकांशीं व्यापारही बराच होतो. **निर्यातमाल**—पुष्कळसा कच्चा माल, व हातांनीं केलेले कारागिरीचे कांहीं पदार्थ निर्यात मालांत असतात. ते येणेंप्रमाणें:— **कच्चा माल**—कापूस, तांदूळ, गहूं, लाकूड, चहा, काफी, गळिताचीं धान्यें, रेशीम, मसाले, लोकर, गोणपाट, लाख. **कारागिरीचे पदार्थ**—

गालिचे; नकशीचें काम केलेलें सोनें, चांदी व हस्तिदंत यांचे पदार्थ; मिन्याचें काम. **आयात माल**—यंत्रांनीं तयार केलेले नित्य उपयोगीं पडणारे पदार्थ आयांत मालांत विशेष असतात. उदाहरणार्थ—कापड, धातु, धातूंचे पत्रे व भांडीं, यंत्रें ... ... इ०

**आशियाचीं बंदरें**—पश्चिम किनाऱ्यावर स्मर्ना. दक्षिण किनाऱ्यावर कराची, मुंबई, कोलंबो, मद्रास, कलकत्ता, रंगून, व सिंगापूर. पूर्व किनाऱ्यावर हाँगकाँग, कंतान, शांघाय, व योकोहामा.

**राज्यव्यवस्था**—हिंदुस्तान, जपान, तुर्कस्तान व इराण हे देश खेरीज करून बाकीच्या देशांतले राजे आपल्या मर्जीप्रमाणें राज्य करितात. वरील देशांत मात्र लोकांचे प्रतिनिधींचा सल्ला राज्यकर्ते घेतात. राज्यव्यवस्थेंत आपला हात असावा याबद्दल चीन देशांतील लोक खटपट करीत आहेत.

## विभाग—

| देशाचें नांव | क्षेत्रफळ चौ. मैल. ( हजार ) | लोकसंख्या. ( लाख ) | राजधानी. |
|---|---|---|---|
| तुर्कस्तान | ६१० | २०० | स्मर्ना. |
| अरबस्तान | १२०० | ११ | |
| इराण | ६२८ | ९५ | तेहरान. |
| अफगाणिस्तान | २१५ | ५० | काबूल. |
| बलुचिस्तान | १३० | ५ | किलात. |
| सिलोन | २५ | ३७ | कोलंबो. |
| हिंदुस्तान | १५०० | २८०० | कलकत्ता. |
| ब्रह्मदेश | २३६ | १०० | रंगून. |
| मॅले द्वीपकल्प | | | सिंगापूर. |
| फ्रेंच इंडोचायना | २५५ | २१२ | सायगांव-साईगॉन. |
| सयाम | २२० | ९० | बँकॉक. |
| चीनचें राज्य | ४३७६ | ४२६३ | पेकिन. |
| कोरिया | ८२ | १०० | सेऊल. |
| जपान | १४७ | ४६७ | टोकिओ. |
| रशियाचें राज्य. | ६५६४ | २२६ | ओम्स्क. |

## २ आशिया खंडांतील देशांचें सामान्य वर्णन.

१ **तुर्कस्तान**—हा देश युरोपमधील तुर्कस्तानचे सुलतानचे ताब्यांत आहे. या देशांत प्राचीन काळीं मोठे राजे व राज्यें होऊन गेल्यामुळें यांत इतिहासप्रसिद्ध स्थानें पुष्कळ आहेत. या देशांतील मुख्य लोक तुर्की होत. परंतु इतर अनेक जातींचे लोक आहेत. पैकीं व्यापार-धंदा करणाऱ्या लोकांमध्यें ग्रीक लोक विशेष आढळतात. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक **एशू क्रिस्त** याचा जन्म ज्या बेथ्लेम गांवीं झाला तें गांव या देशांतील पालेस्टाइन नामक प्रांतांत आहे. बेथ्लेम जवळील जेरुशलेम या शहरीं क्रिस्ताचें थडगें आहे. या प्रांतांतील मृत-समुद्र या सरोवराचें पाणी इतकें खारें आहे कीं, त्यांत मासेही जगूं शकत नाहींत. तुर्कस्तानांत बगदाद, बॅबिलॉन, दमास्कस हीं शहरें प्राचीन काळीं प्रख्यात होतीं. या देशांतील फळें फार प्रसिद्ध आहेत. तसेंच अंगोरा जातीच्या बकऱ्यांची लोकर मऊपणासंबंधानें फार नामांकित आहे. राजधानी—**स्मर्ना** (२००).

२ **अरबस्तान**—या द्वीपकल्पाचा आकार मनुष्याचे पावलाप्रमाणें आहे. ह्या देशाचा बहुतेक भाग वाळूचें ओसाड मैदान आहे. दक्षिण व पश्चिम भागचा व थोडासा मध्यभागचा प्रदेश सुपीक असून लोकवस्ती मुख्यतः त्याच भागांत आहे.

अरब लोक इतिहासांत फार प्रसिद्ध आहेत. मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद हा अरब होता. या धर्माचा प्रसार अरब लोकांनींच केला. अरब लोक फार शूर व उमद्या स्वभावाचे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनीं एके काळीं अर्धें युरोप खंड जिंकलें होतें. विद्या व शास्त्रें यांमध्यें त्यांची बरीच गति झाली होती.

रसायनशास्त्र, बीजगणित वगैरे कांहीं शास्त्रें युरोपियन लोक प्रथम अरबांपासून शिकले.

अरबी घोडे फार नामांकित आहेत. या देशांत खारका व खजूर यांचें पीक अतिशय होतें. उत्कृष्ट कॉफी या देशांत होते. या देशांत उंट फार आहेत.

अरबस्तानचा कांहीं भाग इजिप्तचे ताब्यांत, कांहीं तुर्कस्तानचे,

कांहीं इंग्लिशांचे, व कांहीं अरबी संस्थानिकांचे ताब्यांत आहे. तुर्कस्तानचे ताब्यांत जो प्रदेश आहे त्यांत **मक्का** व **मदीना** हीं मोठीं शहरें आहेत.

**शहरें**–**मक्का** (४५)–ही महंमदाची जन्मभूमि होय. तेथें मुसलमान यात्रेकरू नेहमीं जातात. **मदीना** (४२)–एथें महंमदाचें थडगें आहे.

अरबस्तानचे दक्षिणेकडील **एडन** प्रांत इंग्लिशांचे ताब्यांत आहे. त्यांतील मुख्य शहर **एडन** ( **आदन** ) हें होय.

**३ इराण**–हा देश प्राचीन काळापासून प्रसिद्ध असून यांत झर्सिस, डरायस,† नादिरशहा यांसारखे मोठमोठे बलाढ्य राजे होऊन गेले. परंतु हल्लीं या राष्ट्राचें महत्त्व विशेष राहिलें नाहीं.

याचा बराच भाग ओसाड व नापीक आहे. लोक शोकी असून बुद्धिमान् व कलाकुशल आहेत. तुर्की किंवा अफगाण लोकांप्रमाणें ते शूर व कडवे नाहींत.

गालिचे, शाली, मद्य, अत्तरें, घोडे, फळें यांविषयीं या देशाची प्रसिद्धि आहे. इराणचे आखातांत मोतीं सांपडतात.

**शहरें**–**तेहरान** (२१०)–राजधानी. **शिराझ**–या शहरीं उत्तम प्रकारचें मद्य व गुलाबी अत्तर हे जिन्नस तयार होतात. **बुशायर** हें इराणचें मुख्य बंदर होय.

ह्या देशांत पार्लमेंट नुकतेंच स्थापन झालें आहे व पार्लमेंटच्या सल्ल्यानें राजानें राज्यकारभार करावा असें ठरलें आहे.

हिंदुस्तानांतील पार्शी लोकांचें मूलस्थान हाच देश होय.

**४ अफगाणिस्तान**–हा देश डोंगराळ आहे. लोक धिप्पाड व शूर आहेत. खुनशीपणाविषयीं अफगाणांची प्रसिद्धि आहे. राजास 'अमीर' असा किताब आहे. फळांविषयीं या देशाची प्रसिद्धि आहे. द्राक्षें, डाळिंबें, सफरचंद वगैरे फळें व हिंग हे जिन्नस या देशांतून हिंदुस्तानांत येतात.

परदेशांतून हिंदुस्तानांत येण्याचे खुशकीचे मार्ग या देशांतून जात असल्याकारणानें हिंदुस्तानचे संरक्षणास या देशाचा उपयोग आहे.

---

† डरायस यानें इसवी सनापूर्वी ६ व्या शतकांत व नादिरशहानें १८ व्या शतकांत हिंदुस्तानावर स्वारी केल्याचें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

**काबूल** (७०), **कंदाहार** (६०), **हिरात** (५०) व **गिझनी** हीं मुख्य शहरें होत. (ह्यांपैकीं पहिल्या तीन शहरांचीं स्थानें अशीं आहेत कीं, तीं सांधलीं असतां त्रिकोण होतो). **हिरात**—मध्य आशियांतून हिंदुस्तानांत येण्याच्या मार्गावर हें शहर आहे; म्हणून यास 'हिंदुस्तानची वेस' असें म्हणतात. **गिझनी**—अकराव्या शतकांतील एका मोठ्या विस्तीर्ण राज्याची राजधानी हें शहर होतें.

५ **बलुचिस्तान**—हा देशही डोंगराळ असून लोक रानटी आहेत. एथील राजास 'खान' म्हणतात. तो इंग्लिशांचे सल्ल्यानें वागतो. राजधानी **किलात** शहर आहे.

६ **ब्रिटिश बलुचिस्तान**—हा प्रांत इंग्लिशांचे ताब्यांत आहे. त्यावर मुख्य अधिकारी चीफ कमिशनर आहे. राजधानी—**क्वेटा**. सिंध प्रांतांतून या प्रांतांत आगगाडीचा रस्ता नेला आहे.

७ **सिलोन**—ह्या बेटांत चहा पुष्कळ पिकतो. कॉफी, नारळ, मसा-ल्याचे पदार्थ ह्यांचें ह्या देशांत उत्पन्न बरेंच होतें. या बेटाच्या वायव्यभागीं मोतीं सांपडतात. **कोलंबो** (१२७) व **पॉइंट-डि-गाली** हीं चांगलीं बंदरें आहेत. राजधानी—**कोलंबो**.

८ **ब्रह्मदेश**—हा देश ब्रह्मदेशाचे राजापासून इंग्लिशांनीं १८८६ सालीं जिंकून घेतला. हा देश सुपीक असून त्यांत तांदूळ व साग-वान यांचें मोठें उत्पन्न होतें. मुख्य नदी इरावती. ब्रह्मी लोकांत स्त्रियांना स्वातंत्र्य पुष्कळ आहे. दुकानांत बसून माल विकण्याचें काम बहुतेक स्त्रियाच करितात. माणकें व राकेल यांच्या खाणी या देशांत आहेत. कांहीं ठिकाणीं दगडी कोळसा सांपडतो. **रंगून** (१८०)—हल्लींची राजधानी असून तें प्रसिद्ध बंदर आहे. या बंदराचा युरोपशीं मोठा व्यापार चालतो. **मंडालें** (१९०)—हें पूर्वीच्या ब्रह्मदेशच्या राजाची राजधानी होतें.

९ **मॅले द्वीपकल्प**—यांत अनेक लहान लहान संस्थानें आहेत. **स्ट्रेट्स सेटलमेंटस्**—हा प्रदेश इंग्लिशांचे ताब्यांत आहे. हा फार सुपीक व संपन्न आहे. यांत तांदूळ व मसाल्याचे पदार्थ पुष्कळ तील कथलाच्या खाणी फार समृद्ध आहेत. एथून

७ कोट रुपयांचें कथील दरवर्षीं परदेशीं जातें. **सिंगापूर** (१८४)–हें शहर या प्रांताची राजधानी व मुख्य बंदर होय.

**१० सयाम व फ्रेंच इंडो चायना**–हा सर्व प्रदेश सुपीक व संपन्न आहे. यांतील लोक बौद्धधर्मी असून ते हस्तकौशल्याविषयीं प्रसिद्ध आहेत. (१) **सयाम**–हा देश एका स्वतंत्र राजाचे ताब्यांत आहे. ह्यांतील प्रदेश चांगला सुपीक आहे. परंतु पुष्कळ भागांत जंगल असून वस्ती फार विरळ आहे. यांत तांदूळ फार पिकतो. या देशांत पुष्कळ चिनी व्यापारी आहेत. राजधानी **बँकॉक** (५००)–हें शहर नदीचे दोन्ही काठांवर वसलें असल्यामुळें त्याचा देखावा फार रमणीय आहे. ( २ ) **फ्रेंच इंडो चायना**–हा प्रदेश फ्रेंचांचे ताब्यांत आहे. ह्यांतील अनाम व कांबोडिया हे भाग एतद्देशीय राजांचे अमलाखालीं असून त्यांचे राजे फ्रेंचांना खंडणी देतात. **कोचीन चायना** भागांत खुद्द फ्रेंचांचें राज्य आहे. या प्रदेशांत तांदूळ पुष्कळ पिकतो.

**११ चीनचें राज्य**—लोकसंख्येच्या मानानें हें राज्य आशियांतील सर्व राज्यांमध्यें मोठें आहेच, पण जगांतील सर्व राज्यांमध्येंही मोठें आहे. चीन, तिबेट, मंगोलिया, मांचूरियाचा कांहीं भाग व पूर्व तार्तरी हे या राज्याचे मुख्य विभाग होत. पैकीं खुद्द चीनदेश चीनच्या राज्याचा सुमारें अर्धा भाग व्यापितो. प्राचीनकाळीं जे देश सुधारलेले म्हणून प्रसिद्ध होते त्यांपैकीं चीन देश आहे. विद्या व कलाकौशल्य यांची वाढ प्राचीनकाळीं या देशांत बरीच झाली होती असें दिसून येतें. बंदुकीची दारू, होकायंत्र, छापण्याची कला, वगैरे बऱ्याच गोष्टी चिनी लोकांस युरोपियन लोकांचे पूर्वींच माहीत होत्या. चीनचा पूर्वभाग फारच सुपीक आहे. हस्तकौशल्याचे कामाविषयीं चिनी लोक प्राचीन काळापासून फार प्रसिद्ध आहेत. चिनी मातीचीं भांडीं व चिनी रेशमी कापड अद्याप प्रसिद्ध आहे. या लोकांना अफू खाण्याचें मोठें व्यसन आहे. **राजधानी–पेकीन**–(१०००). **कंतान** (१८००) व **शांघाय** (६२०)–मोठीं बंदरें.

तार्तार लोकांच्या हल्ल्यापासून आपला बचाव करण्याकरितां प्राचीन काळीं चिनी लोकांनीं तट बांधिला होता. त्याची लांबी दीड हजार मैल

रुंदी असून गाडीच्या रस्त्याएवढी आहे. एवढा प्रचंड तट जगांत दुसरा कोठेंही नाहीं.

परकीय लोकांस चीन देशांतील वाटेल त्या बंदरांशी व्यापार करण्याची मोकळीक नाहीं. तर त्यांतील कांहीं बंदरांशींच व्यापार करण्याची परवानगी युरोपियन लोकांस दिली आहे. अशा बंदरांपैकीं मुख्य बंदरें पुढील होतः—टिएन्ट्सिन्, चंगकिंग्, हॅन्को, नांकिन्, शांघाय, फूचाऊ, ॲमॉय, व कंतान. पैकीं शांघाय व कंतान हीं महत्त्वाचीं आहेत.

**हॉंगकॉंग**—हें बेट चीनच्या दक्षिण भागीं असून तें इंग्लिशांचे ताब्यांत आहे.

**१२ कोरिया**—ह्या देशांतील कोरियन लोक जपानी व चिनी लोकांच्या जातीचे आहेत. ह्या देशाचा राजा नांवानें स्वतंत्र आहे. परंतु त्यास वस्तुतः जपानच्या राजाच्या तंत्रानें चालावें लागतें. कोरियन लोक जपानी लोकांसारखे उद्योगी व शूर नाहींत. राजधानी–**सेऊल**.

**१३ जपान**–आशिया खंडाचे अत्यंत पूर्वेकडील हा देश होय. चार मोठीं बेटें व चार हजार लहान बेटें मिळून हा देश झाला आहे. केवळ बेटांच्या प्रदेशाचें जपानाएवढें मोठें राज्य या खंडांत दुसरें नाहीं. या देशाचें साम्य इंग्लंड देशांशीं बरेंच आहे. ४० वर्षांपूर्वी हा देश आशियांतील इतर देशांप्रमाणेंच मागसलेला होता. परंतु अलीकडे जपानी लोकांनीं सुधारणा करून आपला देश युरोपियन देशांचे बरोबरीस आणिला आहे. शिक्षण, शास्त्रें, व कला या बाबतींत जपानी लोक जवळ जवळ युरोपियन लोकांइतके सुधारलेले आहेत. या देशाच्या बादशाहास ‘ मिकाडो ’ म्हणतात. त्यास जपानी लोक अत्यंत पूज्य मानतात. बादशाह पार्लमेंटचे संमतीनें राज्यकारभार चालवितो. जपानी लोक शूर, उद्योगी, धाडसी, व देशभक्त म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्याइतके विनयशील व सभ्य लोक जगांत दुसरे कोणी नाहींत, असें युरोपियन प्रवासी म्हणतात. या देशांत धरणीकंप वारंवार होतात. म्हणून एथील घरें बांबू व जाड कागदी पुठ्ठे यांचीं केलेलीं असतात. तेणेंकरून घर पडलें तरी लोकांस फारसा अपाय होत नाहीं. राजधानी–**टोकिओ**–( १५०० ). जपानचें मुख्य

बंदर यॉकोहामा (१४४)–हें टोकिओपासून थोड्या अंतरावर आहे. किओटो (३०८)–पूर्वींची राजधानी व कलाकौशल्याचें आगर आहे.

**१४ रशियाचें राज्य**–या राज्याचा विस्तार हिंदुस्तानचे चौपट आहे. पण याची लोकसंख्या हिंदुस्तानच्या दहाव्या हिश्शानें आहे. यांतील बराच भाग नापीक आहे, यामुळें लोकवस्ती कमी आहे. युरोपमध्यें रशिया नांवाचा देश आहे, त्याचा जो बादशाह तो या देशाचा बादशाह होय. त्यास ' त्सार ' ( अथवा झार ) असा किताब आहे. आशियांतील रशियाच्या राज्याचे मुख्य तीन भाग आहेत. ते येणेंप्रमाणें:–१ काकेशिया. २ रशियन तार्तरी किंवा मध्य आशिया. ३ सैबेरिया. काकेशियांत काकेशस पर्वताचे आसपास राकेल तेलाच्या मोठमोठ्या खाणी आहेत. सैबेरियांतील उत्तरभागीं हिंवाळा पराकाष्ठेचा कडक असतो. इतकी थंडी जगांतील कोणत्याही देशांत नाहीं.

**मुख्य शहरें–ओम्स्क** ( ५० )–पश्चिम सैबेरियाची राजधानी. **इर्कुटस्क**–पूर्व सैबेरियाची राजधानी. **ताशकंद** ( १२१ )–मध्य आशियांतील रशियन मुलखामधील मुख्य शहर. **टिफ्लिस** (१४६)–काकेशियाची राजधानी.

**१५ ईस्ट इंडीज अथवा मलाया द्वीपसमूह**–हीं बेटें फारच संपन्न असून त्यांमध्यें मुख्यतः मसाल्याचे जिन्नस पिकतात. ह्या बेटांपैकीं मुख्य बेटें **सुमात्रा, जावा, बोर्निओ, मोलक्का, सेलिबीस, अंबोयना,** व **फिलिपाईन** हीं होत.

यांपैकीं महत्त्वाचीं बरींच बेटें डच लोकांचे ताब्यांत आहेत. कांहीं इंग्लिशांचे ताब्यांत आहेत. फिलिपाईन बेटें अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या ताब्यांत आहेत.

या बेटांपैकीं कांहीं बेटांत खनिज संपत्ति फार विपुल आहे. मसाले, नीळ, साबूदाणा, तांदूळ, तंबाकू हे जिन्नस या बेटांतून परदेशीं रवाना होतात. **बटेव्हिया** (१७०)–हें या द्वीपसमूहांतील सर्वांत मोठें शहर होय.

# परिशिष्ट अ ( प्रश्न. )

## हिंदुस्तानचे भूवर्णनासंबंधीं प्रश्न.

परकीयांना हिंदुस्तानांत भूमिमार्गानें येणें झाल्यास कोणत्या दिशेनें येणें विशेष सोपें आहे ? कोणत्या बाजूनें येणें विशेष अवघड आहे? कां? हिंदुस्तानचा किनारा व्यापारास विशेष सोईचा कां नाहीं? सातान्याहून पश्चिमेकडे, रत्नागिरीहून पूर्वेकडे, पंढरपुराहून पूर्वेकडे व पश्चिमेकडे, सुरतेहून पूर्वेकडे व उत्तरेकडे, आणि हैदराबाद, कराची, पुणें, धुळें, सोलापूर, बेळगांव, धारवाड या शहरांहून चाऱ्ही दिशांनीं गेलें असतां चढ लागेल किंवा उतार लागेल हें सकारण सांगा. हिंदुस्तानांतील मुख्य पाणलोट सांगा. पुढील पर्वतांची तुलना कराः—हिमालय व विंध्य; पूर्वघाट व पश्चिम घाट; विंध्य व सातपुडा; हिंदुकुश व काराकोरम. पुढील जोड्यांतील नद्यांची तुलना करा—गंगा व सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा, सिंधु व ब्रह्मपुत्रा, महानदी व कृष्णा, कृष्णा व गोदावरी, नर्मदा व तापी......इ०. उगम, प्रवाहाची दिशा व मिळण्याचें ठिकाण यांस अनुसरून नद्यांचें वर्गीकरण करा. हिंदुस्तानांतील अतिशय सुपीक प्रदेश कोणते ? कां ? अतिशय नापीक कोणते ? कारण काय ? हिंदुस्तानचे निरनिराळे भाग घेऊन त्यांस हवामान ठरविणारे नियम लावून त्यांतील हवामान कसें असलें पाहिजे हें सांगा. उत्तर बंगालची हवा व दक्षिण बंगालची हवा यांमध्यें फरक काय आहे ? त्याचें कारण काय ? दळणवळणाचीं साधनें कोणत्या प्रदेशांत उत्कृष्ट आहेत ? तीं कोणत्या भागांत फार कमी आहेत ? मुंबईहून नाशिक, काशी, सिंधहैदराबाद, सिमला, श्रीनगर, कलकत्ता, पाटणा, मद्रास, ग्वाल्हेर इंदूर, अलाहाबाद, अमृतसर, पेशावर, लाहोर, पुणें, बेळगांव, धारवाड, म्हैसूर, कालिकत, रामेश्वर, मदुरा, निजाम हैदराबाद इ० ... गांवीं जाणें असेल, तर कोणत्या रस्त्यानें जावें, हें रेल्वेचा नकाशा पाहून सांगा. हिंदुस्तानांतील अतिशय महत्त्वाचीं पांच पिकें कोणतीं ? तीं कोणत्या प्रदेशांत होतात ? तीं तेथेंच होण्याचें कारण काय ? हिंदुस्तानच्या कोणत्या भागांत फळांची उत्पत्ति विशेष होते ? हिंदुस्तानच्या दक्षिणार्धांत महत्त्वाचें लाकूड कोणतें होतें ? हिंदुस्तानच्या कोणत्या

भागांत खनिज संपत्ति अतिशय आहे ? कोणत्या भागांत फार थोडी आहे? खनिज संपत्तीसंबंधानें मुख्य विभागांचे नंबर लावा. हिंदुस्तानच्या भिन्न भागांत कोणकोणते कारखाने आहेत हें सांगून ते तेथेंच कां आहेत यांचीं कारणें द्या. कोणत्या लोकांची वस्ती कोणत्या भागांत विशेष आढळते? शौर्याविषयीं कोण लोक प्रसिद्ध आहेत? बुद्धिमत्तेविषयीं कोणते लोक प्रसिद्ध आहेत ? शरिरानें धिप्पाड कोणते लोक आहेत ? कोणत्या भागांतील लोक गौर वर्णाचे आहेत ? कोणत्या भागांतील लोक काळे आहेत ? हिंदुस्तानच्या भिन्न विभागांतील मुख्य भाषा कोणत्या ? पंजाब या नांवाची व्युत्पत्ति काय? कालव्यांचें महत्त्व पंजाबांत विशेष कां आहे ? संयुक्त प्रांत हें नांव कां दिलें आहे ? आग्र्याची हवा अत्यंत विषम कां आहे ? मुंबई इलाख्याइतके हवापाण्याचे भिन्न प्रकार दुसऱ्या कोणत्याही इलाख्यांत नाहींत असें म्हणतात तें कसें हें सकारण दाखवा? मद्रास इलाख्याच्या कोणत्या भागांत दोन्हीं मान्सुनांचा पाऊस पडतो ? कोणत्या भागांत पाऊस अनिश्चित आहे ?

## आशिया खंडाचे भूवर्णनासंबंधीं प्रश्न.

आशिया खंडांतील बहुतेक पर्वतांची दिशा कशी आहे ? दक्षिणोत्तर पर्वत कोणते आहेत ? या खंडांतील कोणत्या नद्या जोडी-जोडीनें वाहतात ? जोडीनें न वाहाणाऱ्या नद्या कोणत्या ? कोणत्या नद्यांचा जलमार्ग या नात्यानें उपयोग होतो ? अतिशय सुपीक प्रदेश कोणत्या नद्यांचे कांठीं आहेत ? इंडो चायना व सैबेरेया यांचे हवेंत फरक काय ? अरबस्तान व चीन यांच्या हवेंत फरक काय ? ज्या ठिकाणीं पाऊस पडत नाहीं असे आशियाचे भाग कोणते ? तेथें पाऊस कां पडत नाहीं ? आशिया खंडांतील सुपीक प्रदेश कोणते ? त्यांच्या सुपीकपणाचीं कारणें काय ? हिमालयाचा परिणाम त्याचे उत्तरेकडील देशावर काय होतो ? आशिया खंडांतील विशेष दाट वस्तीचे प्रदेश कोणते ? सोनें, दगडी कोळसा, व राकेल हे खनिज पदार्थ या खंडाच्या कोणत्या भागीं सांपडतात?

**ज्या देशाचा अथवा प्रांताचा भूगोल शिकविणें आहे त्याचे संबंधानें सामान्य प्रश्न—**

† °देश कोणत्या खंडांत अथवा भागांत आहे? त्याच्या सीमा कोणत्या ?. कोणत्या सीमा स्वाभाविक आहेत ? विशेष उपयोगी सीमा कोणत्या आहेत ? °दिशेकडील सीमा-संबंधानें विशेष गोष्ट काय ? °देशाची लांबी किती ? रुंदी किती ? °बाह्यरेषेचें वर्णन करा. बाह्य रेषेसंबंधानें विशेष काय दिसतो ? किनाऱ्याच्या कोणत्या भागांत आखातें विशेष आहेत ? कोणतीं आखातें... ...बेटें विशेष उपयोगीं आहेत ? बंदरें कोणत्या भागांत विशेष आहेत ? किनाऱ्याचा कोणता भाग व्यापारास विशेष उपयोगी आहे ? °साऱ्यांत उंच प्रदेश कोणता ? साऱ्यांत सखल प्रदेश कोणता ? डोंगराजवळ असल्यामुळें अथवा दोन डोंगरांच्यामध्यें असल्यामुळें उंचवट्याचे असे प्रदेश कोणते ? सखल मैदानें कोणतीं ? उतार कोणीकडे आहे ? विशेष उताराचे प्रदेश कोणते ? कमी उताराचे किंवा सपाट प्रदेश कोणते ? मुख्य पाणलोट कोणते दिसतात ? मुख्य पर्वत कोणते ? त्यांचे मुख्य समूह किती आहेत? °पर्वताची दिशा व लांबी सांगा. °पर्वताची जास्त उतरती बाजू कोणती ? °पर्वताची °पर्वताशीं तुलना करा. मुख्य नद्या कोणत्या? °प्रवाहाचा कोणता भाग विशेष उपयोगी आहे ? °नदीची °नदीशीं तुलना करा. °देशाची हवा सामान्यतः कशा प्रकारची असावी ? कोणत्या भागांतील हवामान विषम आहे ? कोणत्या भागांतील सम आहे ? [ ज्या हवामानांत उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत विशेष फरक असतो त्यास विषम हवामान म्हणतात. ] कोणत्या मान्सून वाऱ्यापासून पाऊस मिळतो ? विशेष पावसाचे प्रदेश कोणते ? कमी पावसाचे प्रदेश कोणते ? जेथें पाऊस अनिश्चित आहे असे प्रदेश कोणते ? सपाट अथवा खोलगट असल्यामुळें व पाण्याचा पुरेसा पुरवठा असल्यामुळें सुपीक असे प्रदेश कोणते ? नापीक प्रदेश कोणते ? मुख्य पिकें कोणतीं ? तीं होण्यास अनुकूल कारणें

---

† ° हें चिन्ह अमुक देश, नदी, पर्वत, दिशा इ० शब्द अध्याहृत आहे असें दाखवितें.


बंगालचा
उपसागर
हि मा ल य
मं गो लि
याकुत्स्क
कलकत्ता
मुंबई
मद्रास
रंगून
मंडाले
कंदाहार
हिरात
तेहरान
बगदाद
मदीना
मक्का
एडन
पीत समुद्र
स्केल
५००
५००

आशिया खंडाचा
नकाशा.




आशियांतील मुख्य पर्वतांचें केंद्र अथवा पामीरचा उंचवट्याचा प्रदेश व त्यापासून निघणारे पर्वत.




सैबेरियांतील सरोवरें.

हिंदुस्तानांतील

भाषा.

(१ चौरस = १ कोट लोक)






गंगेच्या मुखापासून येनिसेई नदीचे मुखापर्यंत आशिया खंडाचा दक्षिणोत्तर छेद.




हिमालयापासून कामोरिन भूशिरापर्यंतचा छेद.

(उंचीचें स्केल लांबीच्या स्केलापेक्षां १॥ दोंपट मोठें आहे.)

कोणती आहेत ? विशेष (त्या स्थळाशिवाय इतर) ठिकाणी क्वचित् होणारी) पिकें कोणती ? मुख्य खनिज पदार्थ कोणते ? खाणी कोठें चालू आहेत ? खनिज संपत्ति कोणत्या भागांत विशेष आहे ? पिकें व खनिज संपत्ति यांच्या स्थितीवरून लोकांचे मुख्य उद्योगधंदे कोणते असले पाहिजेत असें समजून येतें ? ० धंद्यास अनुकूल कारणें कोणती आहेत ? ० धंदा ० भागांतच कां चालतो ? दळणवळणाचीं मुख्य साधनें कोणती ? हीं साधनें कोणत्या भागांत विशेष अनुकूल दिसतात ? कां ? त्यांचा व्यापारास काय उपयोग होतो ? महत्त्वाचा आयात माल कोणता ? महत्त्वाचा निर्यात माल कोणता ? देशांतील पिकें व उद्योगधंदे यांवरून आयातनिर्यात मालाच्या स्वरूपासंबंधानें काय अनुमान निघतें ? आयात मालापेक्षां निर्यात माल कमी कां अधिक कां ? कोणकोणत्या देशांशीं व्यापार होतो ? व्यापारास सोईचे असे नजीकचे देश कोणते ? लोकवस्ती दाट कोठें आहे ? कां ? जास्त वस्ती कोणत्या लोकांची आहे ? अमुक भागांत कोणत्या लोकांची वस्ती विशेष आढळते ? कां ? लोकांचा स्वभाव कसा आहे ? ... ... ... ... ... ... इ०.

---

## परिशिष्ट ब.

### कांहीं संज्ञांचें स्पष्टीकरण.

[पुढील माहिती केवळ शिक्षकांसाठीं आहे. ती त्यांनीं जरूरी प्रमाणें मुलांना समजावून सांगावी.]

आखात—जमिनीच्या चिमट्यांत सांपडलेला जो समुद्राचा भाग; त्यास आखात म्हणतात.

उपसागर—आखाताचें तोंड रुंद असल्यास त्याला उपसागर म्हणतात.

सामुद्रधुनी—दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा अरुंद भाग त्यास सामुद्रधुनी म्हणतात.

भूशिर—समुद्रांत गेलेलें जमिनीचें टोक.

संयोगिभूमि—दोन भूप्रदेश सांधणारा जमिनीचा अरुंद भाग.

**विषुववृत्त**–पृथ्वीचे (कृत्रिम) गोलाभोंवतीं, दोन्ही ध्रुवांपासून सारख्या अंतरावर जें वर्तुल काढलेलें असतें, त्यास **भूमध्यवृत्त** किंवा **विषुववृत्त** म्हणतात. ( भू=पृथ्वी; वृत्त=वर्तुल. )

**अक्षांशवृत्तें**–विषुववृत्तापासून ध्रुवापर्यंत जो वर्तुळाचा चतुर्थांश आहे, त्याचे ९० भाग कल्पिलेले आहेत. त्यास **अंश** म्हणतात. हे भाग दाखविणाऱ्या बिंदूंतून पृथ्वीचे गोलाभोंवतीं, विषववृत्ताशीं समांतर जीं वर्तुलें काढतात, त्यांस अक्षांशवृत्तें अथवा अक्षांशांचीं वृत्तें म्हणतात. कारण, त्यांचे योगानें पृथ्वीच्या अक्षाचे म्हणजे आंसाचे अंश म्हणजे भाग होतात. अक्षांश मोजण्यास प्रारंभ विषुववृत्ता-पासून करण्याची चाल आहे. या वृत्ताचे उत्तरेकडील अक्षांशांस उत्तर अक्षांश व दक्षिणेकडील अक्षांशांस दक्षिण अक्षांश म्हणतात. विषुववृत्तापासून ध्रुवापर्यंत ९० अंश होतात. अक्षांशांचीं सर्व वृत्तें समांतर असतात.

**रेखांशवृत्तें**–पृथ्वीचे गोलाभोंवतीं एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवा-पर्यंत, अक्षांशांचे वृत्तांना लंबरूपानें छेदून जाणारीं, जीं अर्धवर्तुलें काढतात त्यांस रेखांशवृत्तें म्हणतात. अक्षांशांचीं वृत्तें (आडव्या) रेखा असतात व त्यांचे अंश वरील वृत्तें दाखवितात; म्हणून त्यांस रेखांशवृत्तें म्हणतात.

ध्रुवापासून विषुववृत्ताकडे जों जों जावें तों तों अक्षांशांचीं वृत्तें मोठीं होत जातात. म्हणून दोन रेखांशांमधील अंतर विषुववृत्तापर्यंत वाढत जातें. या कारणानें दोन रेखांशवृत्तांमधील अंतर सर्व ठिकाणीं सारखें नसून, तें विषुववृत्ताकडे वाढत जातें. ८९ अक्षांशाजवळ रेखांशांच्या एक अंशाचें अंतर फक्त एक द्वितीयांश मैल आहे; तेंच ४५ अक्षांशांजवळ सुमारें ४९ मैल आहे; व विषुववृत्ताजवळ सुमारें ६९ मैल आहे.

रेखांशवृत्तांपैकीं कोणतें तरी एक रेखांशवृत्त मूळ कल्पिल्याशिवाय एकादें रेखांशवृत्त कितवें आहे हें सांगतां यावयाचें नाहीं. याकरितां कोणतें तरी रेखांशवृत्त मूळ मानिलें पाहिजे. इंग्लंड देशांत **ग्रीनिच** गांवांत असलेल्या वेधशाळेंतून जें रेखांशवृत्त जातें, त्यास इंग्रजी राज्यां-तील लोक मूळ रेखांशवृत्त समजतात, व तेथून इतर रेखांश मोजतात.

नकाशावर रेखांशवृत्तेंच दक्षिणोत्तर दिशा दाखवितात; व अक्षांशवृत्तेंच पूर्वपश्चिम दिशा दाखवितात. म्हणून नकाशावरील एक स्थळ दुसऱ्या स्थळाचे कोणत्या दिशेस आहे हे अक्षांशवृत्ताच्या व रेखांशवृत्ताच्या रेषांवरून ओळखलें पाहिजे. ही गोष्ट पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल—

लियाकोव्ह हीं बेटें आशियाचे नकाशांत जपानचे वायव्येस दिसतात; परंतु अक्षांशवृत्त व रेखांशवृत्त यांच्या धोरणानें पाहिलें असतां (अथवा हीं बेटें आपणांसमोर येतील अशा बेतानें पृथ्वीचा गोल समोर धरला असतां), तीं जपानचे उत्तरेस आहेत असें दिसून येईल. तसेंच काम्चाट्का द्वीपकल्प टोबालस्क शहराचे ईशान्येस दिसतें. परंतु अक्षांशाचे अनुरोधानें पाहिलें, तर तें पूर्वेस आहे असें आढळून येईल. यावरून अक्षांशरेखांश दाखविणाऱ्या रेषांचें महत्त्व ध्यानांत येईल.

**गोलार्ध**–विषुववृत्तानें पृथ्वीच्या गोलाचे जे दोन समान भाग होतात, त्यांपैकीं उत्तरेच्या भागास **उत्तरगोलार्ध** व दक्षिणेच्या भागास **दक्षिणगोलार्ध** अशीं नांवें दिलीं आहेत.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४८ | शेवटची | दान | दोन |
| ५० | ७ | वंशजां | वंशजा- |
| ५६ | १६ | शहर | शहर |
| ५७ | २ | ते | तो |
| ,, | २७ | सांपढतें. | सांपडतें. |
| ६० | ६ | आपणांकडे | आपणाकडे |
| ८१ | १९ | गांठलले | गांठलेले |
| ,, | २८ | अशा व | अशा व उन्हाळ्यांत |
| ९२ | [illegible] | रुंदी असून | असून रुंदी |
| ९३ | १५ | रशियन | रशियन |

मराठी ग्रंथ
क्र. ८९५

REFBK 0000650

REFBK-0000650